


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ७ मे २०२३


## राष्ट्रवादी काँग्रेसचे निवृत्तीचे नाट्य!

# पक्षाच्या सातबाऱ्यावर साहेबच!

**आधुनिक केसरी**


**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा विचार माडले होते. त्यावरुन पक्षात चार दिवस नाराजीचे नाट्य चालले. शेवटी पवारांनी निवृत्तीचा निर्णय मागे घेतला आहे. पवारांनी मारल्याने खडा ! पक्ष मजबूत असल्याचे सिध्द झालेच. त्याचबरोबर पक्षाचा सातबारावर अजूनही साहेबांचे नाव कायम असणार आहे.**

महाराष्ट्रातील राजकारणात शरद पवार म्हणजे प्रदीर्घ अनुभव, दूरदृष्टी, संघटन कौसल्य असलेले नेते ओळखले जातात, तसेच दुसऱ्या बाजूने ते महत्वाकांक्षी, धूर्त, अविश्वासू नेते म्हणून त्यांचेकडे पाहिल जाते. महाराष्ट्र दिनाच्या दुसरे दिवशी मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रात 'लोक माझ्या सांगती' या राजकीय आत्मकथेच्या सुधारित आवृत्तीचा प्रकाशन सोहळा होता. यावेळी काँग्रेसभक्त दोन ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते. आत्मकथा पुस्तक




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


म्हंटले, की स्वतःच्या गुण व दोषांची स्पष्टपणे कबुली असते. पण पवारांनी मोदी, ठाकरे व अजित पवार यांचे दोषांवर टिप्पणी केली आहे. पण आत्मकथेत स्वतः चे दोष प्रामाणिकपणे मांडलेले नाहीत. स्वतःची आरश्यात प्रतिमा पाहून लिहिण्याचे धाडस त्यांनी दाखविले नाही! असेच दिसतेय! आत्मकथा पुस्तकाचा विषय वेगळा आहे. पण या पुस्तकाच्या प्रकाशाचे निमित्त साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरुन निवृत्तीचा निर्णय होण्याचा जाहीर केला. पवारांचा निर्णय धक्कादायक व आश्चर्यकारक असल्याचे पक्षातील नेत्यांना, कार्यकर्त्यांना वाटत होते. त्यामुळे निराश झाले, काहींना गहिवरुन आले! काही कार्यकर्ते रडत होते, तर काही उर बडवत होते. पवारशिवाय पक्ष चालणार नाही.हा नेत्यांचा विश्वास म्हणायचा का ? पक्षातील नेत्यांनी आत्मविश्वास गमवला आहे, असे समजावयाचे! यावरुन राष्ट्रवादी पक्ष २४ वर्षात सक्षम नेतृत्व उभा करू शकलेला नाही. देशात राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस व भाजपा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सतत बदलत आलेले आहेत, पण पक्षाचा एवढा तमाशा कधी झालेला नाही. पक्ष हा निरंतर चालणारा आहे, म्हणून घटना व नियम तयार केले जातात! पक्षात नेते येतात, जातात, पक्ष हा कायम राहतो! नेता बदलला तर, पक्ष बुडेल हिच भीती निरर्थक आहे, भविष्यात पक्षासाठी घातक आहे. पक्षाचे नेतृत्व परिवाराकडे करावे. लोकशाहीतील ही मानसिकता अंधश्रध्दाच आहे. पक्षाचा प्रमुख नेता जर सर्व सामान्य कार्यकर्त्यांतून निवडला तर पक्षाला चालना मिळते. नवीन कार्यकर्त्याला संधी मिळते! पक्षात एकाची मक्तेदारी असेल तर मग तेथे अंतर्गत संवाद संपतो. एकाधिकारशाहीला सुरुवात होते! इतर नेत्याला त्याच व्यक्तीचा आदेश मान्य करावा लागतो! मग पक्षात 'होय बा' म्हणणारे नेते तयार होतात!तेथे इतराच्या मताला व विचाराला किंमत नसते. पवारांच्या निवृत्तीचा निर्णयाचे पक्षातील नेत्यापेक्षा काँग्रेसभक्त पत्रकारांना अधिक दुःख झालेले दिसते आहे. आता देशाचे व महाराष्ट्राचे कसे होईल ? याची त्यांना चिंता आहे. साहेबांनी !अजून थोडे थांबावयाला हवे, असे वाटत आहे. पंडित नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी यांचे निधनानंतर भारताचे कसे होईल ? असा प्रश्न तेंव्हाही केला गेला होता. मग देश बुडाला काय ? या निर्णयाचे सर्व सामान्यांना याचे मुळीच आश्चर्य वाटलेले नाही. पवारांच्या प्रत्येक निर्णयात राजकीय रहस्य दडलेले असते! त्यामुळे त्या निर्णयाची चर्चा होते. २०१९ मध्ये लोकसभेची निवडणूक लढविणार नाही, असेच जाहीर केले होते. त्यावर संभ्रम निर्माण झालेला होता. तेंव्हा कुटुंबातील किती जणांनी निवडणूक लढवावी ? ते म्हणाले होते! पण ते स्वत ः राज्यसभेवर, मुलगी लोकसभेवर तर महाराष्ट्रात एकाच परिवारातील सदस्य व आमदार नेतेपदावर आहेत.हे परिवाराच्या भल्यासाठी नाही काय ? पवारांच्या निवृत्तीतही स्वार्थ दडलेला आहे. दि. १६ सप्टेबर २०२२ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय अधिवेशन दिल्लीत झाले होते. त्यात पवारांची पक्षाच्या अध्यक्षपदी ४ वर्षासाठी पुनश्च निवड झालेली होती. तसेच उपाध्यक्षपदी प्रफुल पटेल, सरचिटणीसपदी सुनील तटकरे, जितेंद्र आव्हाड, नरेंद्र वर्मा यांची निवड करण्यात होती. त्यावेळेस पवारांनी नकार दिला नाही. मग एक वर्षात असे काय घडले की ? त्यांना पक्षात भाकरी फिरवावी वाटली ? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडते की काय ? पक्ष परिवाराच्या हातून जातो की काय ? याची चिंता लागली होती, म्हणून दि.२६ एप्रिल २३ च्या मुंबई युवक काँग्रेस मेळाव्यात त्यांनी आता' पक्षात भाकरी फिरविण्याची वेळ आलेली आहे,ती फिरवली नाही तर करपते' असे वक्तव्य केले होते. तेंव्हापासून त्यांच्या मनात पक्षाचे नेतृत्व सोडण्याच्या विचार होता. शासकीय अथवा खासगी, राजकारणात नेतृत्व करताना वयाची मर्यादा असते. तेंव्हा निवृत्ती घ्यावी लागते,याचे प्रत्येकाने भान ठेवले पाहिजे. पवारांनी निवृत्तीचा निर्णय पक्षातील नेत्यांशी चर्चा करूनच जाहीर करावयाला पाहिजे होता. पण त्यांनी अचानकपणे निवृत्तीची निर्णय जाहीर केला, तोही सार्वजनिक कार्यक्रमात असे का ? तो पक्षातील नेत्यांना रूचलेला नाही. त्यामुळे हा गोंधळ उडाला! त्यांना हा निर्णय पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत घेता आला असता, दुसऱ्या नेत्याची निवड करता आली असती! हे पवारांनी माहित नाही काय ? त्यांना पक्षाबद्दल नेते, कार्यकर्त्यांच्या काय भावना आहेत, तसेच पवार पॉवर आहे काय ? याचा कानोसा घ्यावयाचा होता. म्हणून त्यांनी निवृत्तीची गुगली टाकली. यातून पक्ष मजूबत आहे. पक्षाचे बहूसंख्य नेते व कार्यकर्ते आपल्या बाजूने खबीरपणे उभे आहेत. जरी उद्या पक्षात एखाद्या नेत्याने जरी बंडखोरी त्यांना पक्षाची साथ मिळणार नाही! हे त्यांना दिसून आले आहे. एका बहुरूपाने बैलाचे हुबेहुब सोंग घेतल होत! बघे सुध्दा आश्चर्यचकीत झाले ! हे बैलाचे सोंग नाही,तर खरा बैल आहे, असे म्हणू लागले! तेंव्हा एका चाणाक्ष बघ्याने एक खडा बैलाला मारला व म्हणाला, हे बैलाचे सोंग आहे. तेंव्हा लोकांनी विचारले तुम्ही कसे ओळखले ? तो म्हणाला, मी या बैलाला खडा मारला तेंव्हा या बैलाची कातडी थरारली नाही. खरा बैल असता कातडी थरारली असती. तेंव्हा केवळ पवारांनी खडा टाकून बघितला आहे! त्यांनी राजकीय संन्यास घेतलेला नाही. त्यांचे शिवाय पक्षाचे पान हलणार नाही,हे सर्वांना माहित आहे. पवार निर्णय जाहीर करुन बुचकळ्यात सापडले होते! असे वाटले! लगेच नेते अजित पवार यांनी पवारांच्या निवृत्तीचे समर्थन केले. हे सुध्दा अनेकांना खटकले!त्यांनी काँग्रेसचे अध्यक्ष खडगे असले तरी पक्ष सोनिया गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली चालतो! याचा त्यांनी दाखला दिला. पक्षाला नवीन नेतृत्व नको आहे काय ? असा सवाल त्यांनी केला. यात शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊतांनी भर टाकली. काँग्रेसचे खरगे पक्षाचे अध्यक्ष असले तरी राहूल गांधी हे निर्णय घेतात, अशी प्रतिक्रिया दिली. तेंव्हा काँग्रेसचे अध्यक्ष नाना पाटोलेंनी राऊतांचे कान उपटले! यापूर्वी अजित पवारांनी आमच्या राऊतांनी आमच्या पक्षाची वकिली करण्याची गरज नाही,आम्ही समर्थ आहोत, अश्या शब्दात सुनावले होते.तरीही राऊतांची रोज बरबड चालू आहे. तेंव्हा राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस व शिवसेनेत नाराजी आहे, असे स्पष्ट आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय पातळीवर विस्तार झालेला नाही. या पक्षाने राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करावे, असे त्यांची इच्छा होती, पण निवडणूक आयोगाने पक्षाची राष्ट्रीय पक्षाची मान्यता रद्द केली.यामुळे पवारांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. कारण २०१४ व२०१९ या निवडणुक काळात पक्षाची झालेली मोठी घसरण झाली. राष्ट्रीय पक्षाला एकूण मतांच्या किमान दहा टक्के मते मिळणे बंधनकारक असताना पक्षाला सहा टक्यापेक्षा कमी मते मिळाली आहेत. देशातील प्रादेशिक पक्षाच्या नेत्यांनी आपल्या राज्यात स्वत ःच्या बळावर सत्ता मिळविली आहे. पण पवारांनी २४ वर्षात पक्षाचा विस्तार व महाराष्ट्रात पक्षाला ७५ आकडा सुध्दा गाठता आलेला नाही. पक्ष १९९९ पासून २०१४ पर्यत काँग्रेसच्याच कुबड्या घेवून सत्तेत आला आहे.राष्ट्रीय व राज्यात राष्ट्रवादी पक्षाचा प्रगतीचा आलेख घसरत आहे. पक्षाचे लोकसभेत पाच व राज्यसभेत चार सदस्य आहेत तरी पवारांना राष्ट्रीय व राज्याचे नेते मानले जातात! वास्तविक पवार नेतृत्वाचे व पक्षाचे अपयशच आहे. ते लपविले जात आहे. त्यात पंतप्रधान होण्याचे जे स्वप्न होते, ते आता पूर्णपणे मावळले आहे. तरीही 'त्यांच्या नेतृत्वाची देशाला व महाराष्ट्राला गरज आहे',हे पक्षाच्या काही नेत्यांना वाटते, ती भोळीभाबडी आशा आहे. पवारांचा ४५ वर्षाचा राजकीय अनुभव महाराष्ट्राने घेतला आहे! तेंव्हा पुढील कांही वर्षे देशाला पंतप्रधान मोदी महाराष्ट्राला फडणवीस यांचा राजकीय अनुभव घेवू द्या! मोदी सामान्य कार्यकर्ता, गुजरात मुख्यमंत्री व त्यांचे नेतृत्वाखाली देशात भाजपाची अनेक राज्यात सत्ता व पक्षाला हातात एक हाती सत्ता व दोन वेळेस पंतप्रधानपदावर आहेत.जगाला त्यांच्या नेतृत्वाची गरज वाटते! तेंव्हा पवारांची मोदींच्या नेतृत्वाशी तुलनाच होऊ शकत नाही. पवारांनी सत्तेत असताना अनेक महत्वाची निर्णय घेतले आहेत, हे मान्य जरी केले तरी ते राजकारणात सरड्याप्रमाणे भूमिका बदलत गेले आहेत. तेंव्हा त्यांचे राजकीय गुरू स्व.यशवंतराव चव्हाणांनी सयुंक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर महाराष्ट्राला जातीपातीत न बांधता तो एकसंघ राहिल असे वचन दिले. संयुक्त महाराष्ट्र हा मराठ्यांचे ऐवजी मराठी भाषिकांचे असेल, अशी स्पष्टपणे भूमिका घेतली. त्यांनी महाराष्ट्र एकसंघ ठेवला! तर राष्ट्रवादी काँग्रेसने तर जातीयतेला खतपाणी घातले आहे, असा आरोप मनसे नेते राज ठाकरे केला,उगाच नाही! राष्ट्रवादी काँग्रेस मराठ्याचा समाजाचा अशीच प्रतिमा आहे. ही 'व्होटबँक' टिकून राहावी,म्हणून पक्षाचे नेते वादग्रस्त विधाने करत असतात.पक्षाची ही भूमिका गुरू यशवंतराव चव्हाणांच्या आदर्श तत्वाला छेद देणारी आहे! या पक्षाने समविचारी पक्ष एकत्र यावेत, काँग्रेसप्रमाणे हिंदू धर्मांला लक्ष्य करत आला आहे, तसेच तुष्टीकरणाच्या राजकारण करून पक्ष जीवंत ठेवला आहे. पक्षाच्या विचाराचा पाया मजबूत असला की, पक्षाचे नेते पक्ष सोडून कधीच जात नाहीत. मुळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विचाराचा पाया कच्चा आहे. पक्षाचा जन्म हा महत्वाकांक्षेतून झालेला आहे. तो आता जातीवर, भष्टाचारावर आधारावर उभा आहे. पवारांनी १९७८ मध्ये काँग्रेस पक्षाच्या विरोधात बंड केले ? वसंतदादा पाटीलांचे सरकार पाडले! पुलोद आघाडी स्थापन करून सत्ता हाती घेतली. तेंव्हा' त्यांचेवर 'पाठित खजीर खूपसणारा नेता' असा ठपका मारला गेला! तो त्यांना आजपर्यंत पुसता आलेला नाही. त्यांनी स्व. राजीव गांधी यांच्या नेतृत्वावरच प्रश्न निर्माण केले. नंतर त्यांचे नेतृत्व मान्य करावे लागले!काँग्रेसवासी झाले. पुन्हा १९९९ मध्ये काँग्रेसचे नेतृत्व सोनिया गांधी यांचेकडे जात आहे, असे दिसताच! 'विदेशी महिला देशाचे नेतृत्व कशा करू शकतात ?' असे विधान केले. त्यामुळे काँग्रेसने त्यांची पक्षातून हाकालपट्टी केली होती. त्यानंतर त्यांनी संगमा,तारिक अन्वर यांच्या मदतीने नवीन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. त्यानंतर संगमा पक्ष सोडून गेले तर अन्वर यांना पवारांनी राफेलबाबत घेतलेल्या भूमिकेला विरोध केला,त्यामुळे त्यांना पक्षातून बाहेर केले गेले. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचाराची नाळ एकच आहेत, तर मग राष्ट्रवादी काँग्रेसची स्वतंत्र चूल व वेगळा संसार कश्याकरिता ? नंतर समविचारी पक्ष एकत्र आले पाहिजे, असे म्हणत ते सोनियांच्या घरांचे उंबरवठे झिजवत आहेत. त्यांचेसोबत छबी काढण्यात कमीपणा वाटत नाही. पवार हे मोदींना काय ? कोणत्या ही नेत्यावर टीका करावयास सोडत नाहीत.महाराष्ट्राचे नेतृत्व करताना पश्चिम महाराष्ट्र विरुध्द मराठवाडा असा विदर्भ असा प्रादेशिक वाद उफळून होता. यातून मराठवाड्याचे नेते शंकरराव चव्हाण यांच्या नेतृत्वाला शह देण्याचे प्रयत्न झाला! चव्हाणांनी राज्याच्या नेतृत्वावरून पायउतार व्हावे,म्हणून पवारांच्या समर्थकांनी तर पक्षाच्या बैठकीत शंकररावांचा आक्रमकपणे विरोध करून अवमान केला होता. पण आज त्यांचे पूत्र आशोक चव्हाण हे राजकीय स्वार्थासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओंजळीपणा पाणी पीत आहेत. राष्ट्रीय व राज्य पातळीवर इतर सर्व नेत्यांची माझा सल्ला घेतला पाहिजे, माझे नेतृत्व मान्य केले पाहिजे, त्यांच्या या मोठेपणाच्यावृत्तीने घात केलेला आहे. त्यांच्या धरसोड वृत्तीने पक्षाला फटका बसला आहे! ते जर काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले, असते तर पंतप्रधान, राष्ट्रपती या सर्वोच्चपदाचा मान मिळाला असता!पवारांना शेतकऱ्यांचे कैवारी व जाणता राजा म्हंटले जाते!पण त्यांनी कृषी मंत्री असताना देशातील शेतकऱ्यांच्या हिताचा स्वामीनाथन आयोगाचा अहवाल आडगळीत टाकला. वास्तविक त्याच वेळेस देशात शेतकर्यांच्या आत्महत्येचे प्रमाण अधिक होते.त्यांनी केंद्र सरकारला कर्जमाफीचा निर्णय घेण्यास भाग पाडले! यामुळे देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या काय ? कर्जमाफीचा फायदा तोट्यात असलेल्या बँकांना व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अधिक झाला. मराठवाडा व विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण अधिक असताना त्या शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडले नाही.उलट या कर्जमाफीत भ्रष्टाचार झाला, याचे 'कॅग'च्या अहवालात ताशेरे ओढले गेले. नेते शरद पवारांच्या राजकारणात चूका झालेल्या असतानाही त्यास विरोध करण्याचा ताकद पक्षातील नेत्यात नाही. साहेब,त्या दिशेला सूर्याला माळवतो, असे म्हणाले तर नेते व समर्थक तेच म्हणतील. तेंव्हा नेते, कार्यकर्ते पवारांची चूक कधीही मान्य करणार नाहीत. साहेब हे राजकारणातील चाणक्य आहेत, मानले जायचे. पण भाजपाचे नेते फडणवीस चाणक्यनीतीत त्यांच्यापेक्षा सरस ठरले आहेत. त्यांची २०१४ व २०१९ राजकीय कामगिरी पहा! २०१४ मध्ये भाजपाला १२२ तर राष्ट्रवादीला ४१ तर २०१९ मध्ये भाजपा १०५ तर राष्ट्रवादीला ५४ जागा जिंकता आलेल्या आहेत. तेंव्हा महाराष्ट्रातील जनतेने पवार ऐवजी फडणवीस यांचे नेतृत्व मान्य केले. मग कर्तृत्व कोणाचे मोठे ? पण येथे फडणवीस यांची जात आडवी येते ना! यात पवारांच्या सल्यानुसार महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले ?ते पवारांना समजले नाही. मग खरा चाणक्य कोण ? उध्दव ठाकरे हे राजकीय चातुर्यात कमी पडले! असे खापर फोडले जात आहे. आता काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उध्दव ठाकरे यांच्या महा विकास आघाडीचा डंका वाजविला जात आहे! आता मुख्यमंत्री आमच्या पक्षाचा होणार! अशी आरोळी ठोकली जात आहे! महाराष्ट्रात विधान सभेच्या २८८ जागा आहेत! यात समान जागा वाटप केले,तीन पक्षाला वाट्याला प्रत्येकी ९६ जागा मिळतील! यात मोठा व छोटा भाऊ असा वाद होणार! त्यांच्यात जागा वाटवावरुन भांडण होणार! निश्चितच आहे! एकत्रित लढले तर कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही, तेंव्हा महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता येणार नाही! हे पवारांना लक्षात आले आहे. पवारांनी शिवसेना समविचार पक्ष नसताना त्यांना सोबत घेवून सत्ता मिळविली. पक्षाचे मंत्री भ्रष्टाचारात अडकले असताना त्यांना पक्षाने जाहीरपणे समर्थन केले.पक्षाचे नेते भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलत नाहीत. कारण पक्षाने नैतिकता हा शब्द गुंडाळून ठेवला आहे. या पक्षाला स्वच्छ चारित्र्याचा चेहरा नाही.यातून पक्ष बदनामी होत आहे, याची त्यांना चिंता नाही.आपले व नेत्यांचे घर भरते आहेत ना ? बस्स झाले! २०१९ मध्ये प्रारंभी नेते अजित पवार यांनी आपले नाव घेवून भाजपाबरोबर सत्ता स्थापन करण्याची मोठी चूक केली, असे त्यांचे म्हणणे आहे! सकाळचा शपथविधी पवारांना सल्याने झालेला होता! नंतर त्यांनी भूमिका बदलली व अजित पवारांना तोंडघाशी पाडले. हे अजितदादा विसरले नाहीत! राज्यात अस्थिर सरकार असू नये म्हणून २०१४ मध्ये पवारांनी फडणवीस सरकारला प्रारंभी जीवदान दिले होते. सत्तेसाठी पवारांना समविचारी नसलेला व हिंदुत्ववादी शिवसेना चालते! मग राजकारणात भाजपा अस्पृश्य का ? सरकारच्या धोरणाबाबत मतभेद असू शकतात! मग मोदी व्यक्ती द्वेष का ? जनतेने मोदींना सत्ते बसविले व उद्या ते त्यांच्या मनातून उतरले सत्तेत राहणार नाहीत. पण देशात व राज्याच्या राजकारणात आपण करतो, ते पुण्य दुसरे करतात ते पाप.! असे म्हणणे असते. महाराष्ट्राच्या आता अजितदादा व फडणवीस यांची मैत्री घट्ट होत चालली आहे, ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुळावर कधीही येऊ शकते! याची अंतर्गत माहिती पवारांना असावी. यातून पक्षाचा कधीही धोका होऊ शकतो,या भीतीने त्यांनी पवारांनी निवृत्तीचा निर्णय घेतलेला आहे! आता निर्णय मागे घेतला तर हस्से होईल!त्यामुळे नवीन अध्यक्षाची निवडीसाठी पक्षाची समितीचा खेळ खेळला गेला आहे. वास्तविक शरद पवारांनी राजीनामाचा लेखी स्वरूपात पक्षाकडे दिलेला नाही, केवळ त्यांनी विचार मांडले आहेत. 'अगा जे घडलेचि नाही' त्या राजीनाम्यावर चर्चा होते! राजीनामा फेटाळला जातोय! याचे आश्चर्य वाटते! समितीचे प्रमुख प्रफूल पटेल यांनीही 'साहेबांनी निवृत्तीचे विचार मांडला, असे सांगितले. पक्षाकडे राजीनामा दिल्याचे सांगितलेले नाही. तेंव्हा पवारांना राजीनामा द्यावयाचा असता तर आजारी असताना दिला असता. शेवटी पक्षाचे सर्वेसर्वा तेच व अध्यक्ष आहेत. पक्षाच्या समितीला पंधरापैकी बारा नेत्यांनी पक्ष नेतृत्वाच्या बदण्याचा विरोधात होता, तर तीन नेते पक्षाचे नृतत्व बदल्याचे बाजूने होते ?ते नेते कोण ? जरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष नवीन आवडला असता तरी तो काँग्रेसप्रमाणे नामधारी राहिला असता .राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाची सूत्रे ओ.बी. सी. किंवा अथवा मागासवर्गीय,अल्पसंख्याक समाजाच्या नेत्याकडे दिले असते काय ? शाहू- फुले- आंबेडकरांचे विचार मांडावयाचे असतो,ते कधीच कृतीत आणले जात नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचा वारसदार कोण ?असा प्रश्न पडला होता. अहो! राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार साहेब आहेत! हेच आधीच ठरलेल होते! तुम्हाला 'एप्रिल फूल' बनवल ! हेच कसे कळले नाही! शेवटी साहेबांच्या मनाप्रमाणे झाले आहे. या राजकीय नाट्यात मात्र अजितदादा मात्र एकाकी पडल्याचे दिसते आहे. त्याची साहेबांच्या अनुपस्थिती अनेकांना खटकली आहे. पक्षात अजितदादांची कोंडी केली जात आहे, हे लक्षात येत आहे. तेंव्हा भविष्यात ते काहीही निर्णय घेवू शकतात! काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांना जसा आत्मसाक्षात्कार झाला होता, तसाच साहेबांनी लोकांच्या व नेत्याचा विचारांचा मान ठेवत पक्षाचे अध्यक्षपद स्वतः ठेवणे मान्य केलेले आहे. अखेर! पवारांनी ''पक्षाचे लोक माझ्या सांगती' याचा अनुभव आला व त्यांनीच पक्षाच्या या राजकीय नाट्यावर पडदा टाकला. तेंव्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष साहेबांचा व साहेब पक्षाचे आहेत! यालाच 'लोकशाही' म्हणतात!




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

आधुनिक केसरी





या योजनेत प्रशिक्षणासाठी विविध धर्म, भाषा आणि वंशाचे तरुण एकत्र येतात. या प्रशिक्षणादरम्यान त्यांच्यातील धर्म, भाषा आदींच्या जाणीवा बोथट होऊन आपण सगळे सिंगापूरवासी आहोत, सिंगापूरचे नागरिक आहोत आणि त्या राष्ट्राच्या भल्यासाठी आपल्याला काम करायचे आहे अशी राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते. ली आणि त्यांचे मंत्रिमंडळातील सगळेच सहकारी आपल्या देशासाठी झटणारे होते. अर्थात ली आणि त्यांचे बुद्धिमान सहकारी गोह केंग स्वी, लिम किन स्विम आणि इतरांनी सिंगापूरसाठी अथक कष्ट तर झेललेच पण आपल्या सहकाऱ्यांमध्ये आणि देशातील नागरिकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यात ते यशस्वी ठरले. सिंगापूरमधील लोक मेहनती तर होतेच. ली सरकारच्या धोरणांमुळे अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या सिंगापूरमध्ये



आल्या. अनेक नवीन उद्योग सुरु झाले. लोकांच्या हातांना रोजगार मिळाला. सिंगापूरमध्ये उपलब्ध असलेली जमीन फार कमी होती. जी काही थोडीफार जमीन होती, तिची धूप मोठ्या प्रमाणात होऊन ती नापीक झाली होती. अशा जमिनीच्या वरच्या थरात भर घालून त्या जमिनीची सुपीकता वाढवण्यात आणि धूप थांबविण्यात त्यांनी यश मिळवले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन त्या जमिनीवर वृक्ष लागवड केली. सिंगापूरला जगातील सर्वात जास्त हरित शहरांपैकी एक बनवण्याचा चमत्कार करून दाखवला.

देशाच्या नेतृत्वाकडे दूरदृष्टी असेल तर असलेल्या समस्यांवर रडत न बसता हातात जे काही उपलब्ध असेल,त्याच्या साहाय्याने कशी प्रगती करता येते हे सिंगापूरकडे पाहिले तर आपल्याला कळू शकते. सिंगापूरच्या पर्यटन व्यवसायाला ली यांनी चालना दिली. सिंगापूरला आज पर्यटन व्यवसायातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त होते. सिंगापूर हे जगातील अनेक लोकांच्या दृष्टीने उत्तम पर्यटनस्थळ आहे. ( क्रमशः )



## आनंदी पहाट

# आभासी दुनियेचे आकर्षण मर्यादित असावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या काही काळापासून अनेकांना अभासी दुनियेचं प्रचंड आकर्षण वाटू लागलं असल्याचं स्पष्ट होतं. सोशल मिडिया इतका विश्वास, भरवसा इतरांवर तर लांबच परंतू स्वतःवर देखील ठेवला जाऊ नये, ह्यापेक्षा दुसरी उणिव आणि शोकांतिका नाही. शोकांतिका अशासाठी कारण, अनेकदा सोशल मिडीयाच्या माध्यमातून झालेला त्रास, मनस्ताप, दुःख, नुकसान, फसवणूक आणि कालांतरानं पश्चाताप भोगण्याची वेळ अनेकांवर येत असल्याचं आपण सर्वच ऐकत आहोत. सोशल मिडीयाच्या आहारी जाण्यामुळे आणि फसगत झाल्यामुळे सोशल मिडिया आपल्याला सोसत नाही, हे अभ्यासपूर्वक समजून घेण्याची गरज असते. गुगल काहीवेळा गुगली टाकत असतं, हे लक्षातच घेतलं जात नाही. सोशल मिडिया, गुगल, विविध वेबसाईट अनेकदा आपल्याला अत्यंत योग्य, चांगली, गरजेची, आवश्यक माहिती पुरवतात, परंतू नेहमीच तसं घडेल असंही नाही, हे अभ्यासण्याची अधिक जरुरी असते. गुगलवर जेव्हढा विश्वास ठेवावा असं अनेकांना वाटतं तेव्हढा ते कोणावरही अगदी स्वतःवर देखील ठेवायला काहीवेळा तयार होत नाहीत. अनेकांना गुगलवर एखादा पत्ता शोधताना मनस्ताप झाल्याचं अनुभवायला येत असतं, सोशल मिडीयाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या खोट्यानाट्या जाहिरातींना भुलून आजवर अनेकांची आर्थिक, मानसिक, शारीरिकदृष्ट्या फसवणूक झाल्याचं आपल्याला अलीकडच्या काळांत अगदी रोजच वृत्तपत्रांमध्ये वाचायला मिळत आहे. काही व्यावसायिक वेबसाईटच्या माध्यमातून खोटे आर्थिक व्यवहार करून, बँक खात्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे ती खातेदाराकडून लबाडीनं, खोटेपणानं मिळवून नकळत आर्थिक फसवणूक केली जात असल्याचंही आपण अलीकडच्या दिवसांमध्ये ऐकत आहोत. अर्थात, ह्या अभासी दुनियेत सहभागी व्हायला काहीच हरकत नाही, परंतू प्रथमतः त्याची सविस्तर माहिती करून घेऊन, सखोल अभ्यास करून आणि योग्य दक्षता बाळगून मगच सावधपणे विचार, वर्तन आणि व्यवहार करणं हिताचं ठरतं.

# जपलं तर वाढेल....

आधुनिक केसरी

जपलं तर वाढेल रोप... जपलं तर टिकेल नातं... जपलं तर राहील घर... जपले तर टिकतील संस्कार... मूल्य जपली तर देशाचा विकास होईल. म्हणजे जपण्याला किती महत्त्व आहे. प्रत्येक गोष्ट जपून ठेवली तर ती टिकेल, वाढेल, रुचेल, पचेल, राहील. जसे आपण वस्तूला जपतो तसेच नात्यालाही जपलं पाहिजे. नात्याला हळुवारपणे प्रेमाने जपले तर ते अखंड राहील. आठवणी जशा आपण कडू गोड दोन्हीही जपत असतो. कडू आठवणीने डोळ्यात पाणी येते तर गोड आठवणीने चेहरा खुलतो. चेहऱ्यावर हास्य फुलते. तेव्हा गोड आठवणीच जपल्या पाहिजे. जसे की माणूस आहे तोवर काही किंमत नसते. पण माणूस गेल्यानंतर त्याच्या सगळ्या चांगल्या आठवणी येतात. त्याच्या कर्तुत्वाची किंमत तो गेल्यानंतरच कळते. तोपर्यंत पिकते तिथे विकत नाही.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-73

असंच आपल्या मुलांना जपलं पाहिजे. त्यांचं बालपण, त्यांचे आरोग्य, त्यांचा आनंद, त्यांच्या बाललीला, त्यांच्या कलाकृती सगळंच कसं जपलं पाहिजे. खास करून मुलांचे बालपण आणि त्यांचे मानसिक आरोग्य जास्त जपावे.

त्याचवेळी आपलं त्यांच्याकडे बारीक लक्ष असावं. आईला मुलांचा चेहरा वाचता आला पाहिजे. नातं निरामय भावनेने जपावं. ज्ञानेश्वर माऊलीने मुक्ताईला जपले तसे. सागरासारखं मुलांना अथांग राहायला शिकावं .भरतीचा गर्व नाही, ओहोटीची लाज नाही. आयुष्यात हजारो सुखदुःखाच्या पायऱ्या असतात. प्रत्येक पायरीवर यश मिळेलच असं नाही. पण प्रत्येक पायरी चढलीच पाहिजे. तेच आपले यश आहे. जसे की चावीने कुलूप उघडते व बंद सुद्धा होते. तसेच शब्दाने तोंड बंदही होते. तर कधी मनमोकळेही होते. एखाद्या वस्तूला आपली नजर ठरवत असते ती कशी आहे ? कोणाला तीच वस्तू खूप उपयोगी वाटते, तर कोणाला निरोपयोगी. वाचण्यासाठी पेपर असतो, भजेवाल्यांसाठी तो रद्दी असतो. जपला तर पेपर, फेकला तर रद्दी. आपल्याला मुलांना जपायचं आहे .उद्याचे सुजान नागरिक घडवायचे आहे. मानवतेचा सागर होऊन.....

# शेतकऱ्याचा घोडा

आधुनिक केसरी

एके दिवशी एका शेतकऱ्याचा घोडा शेतातल्या कोरड्या विहिरीत पडला, जखमी झाल्यामुळे तो मोठ्याने ओरडत होता.लोकं जमा झाले शेतकरी धावत आला त्याने बराच विचार केला फार प्रयत्न केले. त्या घोड्याला त्या विहीरीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न केले, पण काही करता त्याला बाहेर काढणे जमत नव्हते. दिवस मावळायला आला होता.शेतकरीही आता थकला होता आणि कंटाळला होता त्याने विचार केला.आता हा घोडातर तसाही म्हातारा झाला आहे असेही निरुपयोगी आहे आणि ती विहिरही कोरडीचं आहे ... त्याला बाहेर काढण्या पेक्षा त्याला बुजून द्यावे... विहीरीत माती लोटावी...घोड्याचा प्रश्न ही सुटेल आणि शेतातली ही विहिरही बुजली जाईल...

मग काय जमलेल्या सर्व लोकांकडून त्याने मदत मागीतली आणि सगळे कामाला लागले,कुदळ फावड्यांनी माती टाकायला सुरुवात झाली..... मध्ये पडलेल्या त्या जखमी घोड्याला काही कळेनासे झाले ...विहीरीत पडल्याने शरीराला



झालेल्या जखमांची वेदना आणि त्यात भर म्हणजे आयुष्यभर ज्या मालकाची चाकरी केली. त्याची ओझी वाहीली आज तोचं मालक जिवावर उठला... ते दुखाःने अजून मोठयाने ओरडू लागला वरुन माती पडतचं होती...काही वेळाने घोड्याचा ओरडण्याचा आवाज थांबला.....सागळ्यांना वाटले घोडा मेला बहुतेक शेतकर्याने सहज विहीरीत डोकावून पाहीले,तर तो पहातचं राहीला... अंगावरची माती झटकत घोडा उभा राहीला होता. लोकांनी अजून पटापटा माती टाकणे सुरु केले...परत पाहीले तर घोडा त्याचा तोच मग्न होता तो वरुन माती पडली की, झटकायचा आणि त्या पडलेल्या मातीच्या थरावर उभा रहायचा.....

# निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**प्रकाशनाय सत्यस्य**
**चाल्पं भवति जल्पनम्।**
**आच्छादनाय चासत्यं**
**दीर्घं प्रलपनं किल।।४।।**
**खरं सांगण्यासाठी कमी बोलणं पुरे होतं. खोटं लपविण्यासाठी अधिक बोलावं लागतं.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ब्रह्मचर्य सुख हेत है, वीतराग सब त्याग ।**
**सुख का कारण हरिभजन, सदाचार सुख जाग ।।४९।। (स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/४९**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
सुखाचे कारण ब्रह्मचर्य आणि समस्त विषयांचा त्याग आहे. सुखाचे कारण हरिभजन म्हणजेच परमेश्वराची भक्ती आहे. सदाचरणाने सर्व सुख साधनांमध्ये जागृती रहाते. म्हणून सदाचरणाचे अत्यंत महत्त्व आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.**

# मुर्तीमंत भगवंत भेटला

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


12 वर्षे त्याने घोर तपश्चर्या केली व भगवंत त्यांना प्रसन्न झाले. या व्रताची सांगता होणार होती. महर्षी नारदांनी त्यांना "साधनद्वादशीचं व्रत करायला सांगितले. फक्त आचमनाचे तिर्थ प्राशन करून द्वादशी सोडायची हे ते व्रत होते. आणि त्याने ते पार देखील पाडले. अंबरीषाच्या भक्तिने इंद्राचं आसन डळमळीत झाले माझ्या पेक्षा श्रेष्ठ भक्त आहे हे आहे इंद्र देवांना सहन झाले नाही. त्यांनी अंबरीषाचे व्रत मोडण्यासाठी दुर्वास ऋषींना सांगितले.

# सदवस्तू साध्य करुन घेण्याचा उपाय सत्संगती

आधुनिक केसरी

एखाद्या दारूबाजाप्रमाणे विषयी मनुष्य वागत असतो. त्याला सर्व कळते, पण वळत नाही. एकीकडे स्वतःला जो परमात्म्याचा अंश म्हणवितो, आणि दुसरीकडे विषयांच्या आहारी जातो. खरोखर, भक्तीशिवाय सर्व काही वाया आहे. संताजवळ राहावे आणि भक्तीचे साधन करावे. आपल्याला काही करायचे उरले आहे असे जे वाटते, ते न वाटू लागले, म्हणजे साधनात प्रगती झाली असे समजावे. भगवंताची भक्ती घडायला गुरुसेवा हे एक मुख्य साधन आहे. जो शिष्य आज्ञा पाळतो त्याला भेटणे गुरूला भागच पडते. वास्तविक, गुरू मनात काही इच्छाच येऊ देत नाही; म्हणून कामधेनूपेक्षाही गुरू श्रेष्ठ आहे.

अत्यंत तळमळीशिवाय भगवंताचा योग शक्य नाही. संतसमागम प्रारब्धाने होतो, पण ‘सम’ रीतीने जाता आले तर खरा ‘समागम’ घडतो. पण आमचा मार्ग विषय आहे; म्हणून संत भेटूनही त्याचा ‘समागम’ आपल्याला होत नाही. विषयांमध्ये धुंद असलेल्या आम्हांला पाहून संतांच्या मनात कालवाकालव होते; त्याची आपल्याला कल्पनाही येणार नाही.



आपली बुद्धी आपल्याला समाधानाप्रत नेत नाही, तर दुसऱ्याची मदत घेणे आवश्यक आहे. अशा वेळी, ज्यांची मदत आपण घेतो त्यांचे आपण ऐकायला नको का ? भगवंताच्या जिज्ञासेचा मार्ग आक्रमायला संतांनी सांगितले. संतांना जिज्ञासा मूळचीच असते. आपल्याला ती नाही, म्हणून ती उत्पन्न करणे भाग आहे. काही केल्याशिवायच सद्वस्तू साध्य करून घेण्याचा उपाय, म्हणजे सत्संगती हा होय. सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. ज्याचे भाग्य थोर असेल त्यालाच ती लाभेल. एखादा मनुष्य भोवऱ्यात सापडला तर त्याला बाहेर काढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग असा की, दुसऱ्या चांगल्या पोहणाऱ्याने त्या भोवऱ्यामध्ये उडी मारून तो फोडायचा आणि बुडत्याला बाहेर ओढून काढायचे. पण यासाठी शक्ती फार लागते. दुसरा मार्ग असा की, आपणच भोवऱ्यामध्ये बुडी मारून तळाशी जायचे आणि खालून बाहेर निघायचे. विद्वत्ता ही भोवऱ्यासारखी आहे. वर वर पाणी फिरत असते तरी तळाशी ते संथ असते. तसे, जे लोक वरवर विद्या शिकतात ते वादाच्या आणि मतांतराच्या चक्रात सापडतात; पण जे खोल तळाशी जातात त्यांना खरे काय ते आपोआप कळते, आणि ते सगळीकडे एकच असते. विद्येच्या भोवऱ्यामध्ये सापडणाऱ्यांना बाहेर ओढून काढण्याचे काम फार मोठ्या संतांचे असते. शहाण्याने त्या भानगडीत न पडावे. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हे खरे संतांचे काम होय.

**आजचे बोधवचन आहे - कोणत्याही सत्पुरुषाची परंपरा रक्षण केली पाहिजे. त्यात आपले घुसडू नये.**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**देखोनि पुराणिकांची दाढी । रडे स्फुंदे नाक ओढी ॥१॥**
**प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥ध्रु.॥**
**आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥२॥**
**बोलों नयें मुखावाटां । म्हणे होतां ब्यांचा तोटा ॥३॥**
**दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥४॥**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**वनानि दहतो वह्नेः सखा भवति मारुतः ।**
**स एव दीपनाशाय कुशे कस्यास्ति सौहृदम् ॥**
**स्पष्टीकरण - तुम्ही स्वतःचे बळ निर्माण केलेत, म्हणजे तुम्हाला साथ द्यायला अनेक मित्र पुढे येतील. मग तुम्हाला त्यांचे आणि त्यांना तुमचे सहकार्य मिळून परस्परांचा उत्कर्ष होईल. दुर्बळाची मैत्री कोणालाही नको असते आणि 'मी तुझा मित्र' म्हणून कोणी पुढे आलाच, तर तो तुम्हाला वेठीला धरून आपले काम साधून घेतो. तुम्ही मात्र जिथे होता, तिथेच राहता.**

**पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे**

रविवार, ७ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२४१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 7 MAY 2023
adhunikkesari.com Adhunik Kesari
● YEAR-02 ● ISSUE-241 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5


# म्हणजेच एकनाथ शिंदेंसाठी चिंतेची बाब

## फडणवीस म्हणतात पुन्हा येईन : जयंत पाटलांची खोचक टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यात राजकीय भूकंपाची शक्यता वर्तवली जात असतानाच मी पुन्हा येईन असा नारा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. तर त्यांच्या याच वक्तव्यानंतर राजकीय भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान यावरुन काही राजकीय प्रतिक्रिया देखील समोर येत आहे. तर देवेंद्र फडणवीस यांचे मी पुन्हा येईन म्हणणे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी चिंतेची बाब असल्याचे म्हणत राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी खोचक टोला लगावला आहे.**



देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा येईन केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना जयंत पाटील म्हणाले की, त्यांच्या या वक्तव्याची आम्हाला भीती नाही. त्यांच्या त्या वक्तव्याची भीती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना असायला पाहिजे. पुन्हा येईन म्हणतायत आणि आलेलेच आहेत. फक्त दोन नंबरला बसलेले आहेत. त्यामुळे ते मी पुन्हा येईन म्हणत असतील आणि एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदावरुन बाजूला ढकलून स्वतः बसत असतील तर त्याची चिंता एकनाथ शिंदे यांनी केली पाहिजे. तसेच एकनाथ शिंदे यांच्यासोबत जे 40 वीर गेले आहेत, त्यांनी देखील याची चिंता केली पाहिजे, असे जयंत पाटील म्हणाले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगडमध्ये बोलताना फडणवीस म्हणाले होते की, मी पुन्हा येईन म्हटलं की येतोच. मी कसा येतो हे तुम्हाला देखील माहित आहे. आपलं कुलदैवत नरसिंह आपण कुठूनही प्रगती करतो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंदगडमधील निट्टूर गावात हे वक्तव्य केले होते. दरम्यान याचवेळी बोलताना जयंत पाटील यांनी बारसू वादावर देखील प्रतिक्रिया



दिली आहे. महाविकास आघाडी चांगल्या कामांना कधीच विरोध करणार नाही. राज्यात नवीन उद्योग आले पाहिजेत, रोजगार निर्माण झाला पाहिजे हे सर्व आम्हाला मान्य आहे. मात्र केंद्र सरकारने तयार केलेल्या कामगार कायद्यामुळे कामगारांना संरक्षण राहिलेले नाही. तसेच बारसूमध्ये शेती कसणाऱ्या शेतकऱ्याचे शोषण होऊ नयेत. तसेच या भागात पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याचा विश्वास सरकारने लोकांमध्ये निर्माण केला पाहिजे, हिच महाविकास आघाडीची भूमिका असल्याचे जयंत पाटील म्हणाले आहेत.



# फाटक दांपत्याला मिळाला घराचा ताबा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भाडेकरूच्या मुजोरीला कंटाळून आर्थिक विवंचनेत सापडलेल्या वृद्ध दाम्पत्याने गेल्या महिन्यात गांधीवादी मार्गाने लाक्षणिक उपोषण आंदोलन करत 'भाडेकरू, आम्हाला आमचं घर देता का घर?' अशी आर्त हाक दिली होती. आंदोलनाची माध्यमांनी, तसेच सामाजिक कार्यकर्ते वसंत मोरे यांनी दखल घेत मध्यस्थी केली. आमदार नितेश राणे आणि आमदार दिलीप मोहिते यांनीही फोनवरून संवाद साधला. परिणामी, या वृद्ध फाटक दाम्पत्याला आपल्या स्वतःच्या घराचा कायदेशीर ताबा मिळाला. बिबवेवाडीतील आपल्याच घरासमोर बसून उपोषण करण्याची वेळ सत्तरीतल्या डॉ. अविनाश फाटक व माधुरी फाटक या वृद्ध दांपत्यावर आली होती. फाटक दाम्पत्याने सदानंद सोसायटीतील आपला 'सरस्वती' हा बंगला आतिश जाधव यांना पाच वर्षांच्या भाडेकरारावर 'किडझी' हे नर्सरी स्कुल चालवण्यासाठी दिला होता. मात्र, गेल्या साडेतीन वर्षांपासून जाधव यांनी भाडे न देता फाटक दाम्पत्यास वेठीस धरले होते. याबाबत त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. या सगळ्या त्रासाला कंटाळून फाटक दाम्पत्याने गेल्या महिन्यात लाक्षणिक उपोषण केले. इलेक्ट्रॉनिक व प्रिंट माध्यमांनी हा संवेदनशील विषय उचलून धरला. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते वसंत मोरे यांनी मध्यस्थी करत अतिश जाधव यांच्याकडून बंगल्याचा ताबा फाटक दाम्पत्याला दिला. याबाबत बोलताना डॉ. अविनाश फाटक म्हणाले, आमच्या या लढ्याला माध्यमांनी व मोरे यांनी, तसेच आमची मुलगी सुप्रिया आणि जावई डॉ. असित अरगडे यांनी मोलाची साथ दिली. त्यांच्या पाठिंब्यामुळेच आज आम्हाला स्वतःच्या घरात राहण्याची संधी मिळाली आहे. गेल्या तीन-चार वर्षात झालेला सगळा त्रास विसरून आम्ही आनंदाने आमच्या घरात आलो आहोत. प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमे, मोरे, तसेच शेजारील लोक आणि असंख्य हितचिंतकांच्या पाठिंब्याबद्दल आम्ही दोघेही सर्वांचे आभार व ऋण व्यक्त करतो.

# तत्कालीन पो. निरीक्षक माईनकर यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल

## महाराष्ट्रदिनी उत्कृष्ट कामगिरीबद्दल मिळाले होते विशेष पदक

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महाराष्ट्र दिनी उत्कृष्ट कामगिरी बद्दल विशेष पदक प्राप्त उपनगर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पो.निरीक्षक निलेश माईनकर यांच्यावर न्यायालयाच्या आदेशाने गंगापूर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. सन २०१६ मध्ये महात्मानगर येथील रहिवासी असलेल्या एका महिलेने फसवणुकीसंदर्भात फिर्याद दिली होती. त्यानुसार हा दाखल गुन्हा पुढील तपासासाठी निलेश माईनकर प्रभारी निरीक्षक असलेल्या गुन्हे शाखा युनिट दोनकडे वर्ग करण्यात आला होता. या प्रकरणात तक्रारदार यांनी संशयित माईनकर यांनी वेगवेगळ्या स्वरूपात पैशांची मागणी केल्याचा दावा न्यायालयात केला आहे. त्रयस्थ व्यक्तीमार्फत चार लाखांची खंडणी मागितल्याचे न्यायालयात दाखल दाव्यावर नमूद आहे. फिर्यादी महिलेच्या वकिलांनी न्यायालयाकडे कलम ३८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याचबरोबर खंडणीच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी आमदार सुहास कांदे यांच्या वकिलांकडूनही करण्यात आली होती. त्यानुसार माईनकरांवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्याचा आदेश न्यायालयाने दिल्याने पोलिस आयुक्तालयाने त्यांची नियंत्रण कक्षात बदली करीत गुन्हा दाखल केला. दोन दिवसांपूर्वीच उपनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नीलेश माईनकर यांची नियंत्रण कक्षात बदली करून प्रभारी निरीक्षकपदाची सूत्रे आर्थिक गुन्हे शाखेचे अशोक शरमाळे यांच्याकडे देण्यात आली होती.

वडाळा गावातील सादिकनगरमधील एका महिलेचा एका डॉक्टरने विनयभंग केला होता. या भागातील काही महिला आ.फरांदे यांचेकडे तक्रार घेऊन आल्या. आ.फरांदे लोकप्रतिनिधी म्हणून उपायुक्तांना भेटण्यासाठी इंदिरानगर पोलिस ठाण्यात गेल्या. त्या महिलाही तक्रार देण्यासाठी पोलिस ठाणे येथे आलेल्या होत्या, परंतु पोलिस निरीक्षक माईनकर यांनी महिलांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्याशी उद्धटपणाचे बोलणे व लाठीमार सुरू केला.




**माईनकरांची वादग्रस्त भूमिका आणि आमदारांची कार्यवाहीची मागणी**

निलेश माईनकर यांना महाराष्ट्र दिनी उत्कृष्ट कामगिरी बद्दल विशेष पदक प्राप्त झाले असून महाराष्ट्र दिनानिमित्त राज्य पोलिस दलातर्फे जाहीर झालेल्या पोलिस महासंचालक पदकाच्या यादीत निरीक्षक माईनकर यांचाही समावेश होता . असे असले तरी त्यांची कारकीर्द नेहमीच वादग्रस्त राहिली आहे . इंदिरानगर ठाण्याचे पोलिस अधिकारी हे आपल्या पदाचा दुरुपयोग करून विनयभंगासारख्या घटनांना दाबण्याचा प्रयत्न करीत आहेत . पोलिस स्टेशनला तक्रार करायला आलेल्या महिलांवर लाठीचार्ज करणे ही दंडूकशाही असून महिलांवर लाठीमार करणाऱ्या पोलिस निरीक्षक निलेश माईनकर यांची तात्काळ बदली करण्यात यावी, या प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करावी तसेच महिलांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीसंदर्भात आमदार प्रा .देवयानी फरांदे यांनी डिसेंबर २०२० मध्ये मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व गृहमंत्री अनिल देशमुख यांची भेट घेऊन तक्रार केली होती .

बेकायदेशीर जमाव गोळा केल्याची माहिती देत सदर प्रकरणी आ.फरांदे यांचेसह महिलांवर खोटे गुन्हे दाखल केले. यामुळे भविष्यात महिला तक्रार देण्यासाठी पोलिस स्टेशन येथे जाणे सुरक्षित नसल्याची भीती प्रा.फरांदे यांनी व्यक्त केली होती. माईनकर कार्यरत असलेल्या उपनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारी फोफावत चालली होती. माईनकर हे गुन्हे दाखल करण्याच्या प्रक्रियेत टाळाटाळ करत असत, ओळखीतल्या, वरिष्ठ स्तरीय व्यक्तींच्या फिर्यादी त्वरित दाखल व्हायच्या. इतरांना मात्र खेटा माराव्या लागायच्या. अनेकदा माईनकरांच्या टोलवाटोलवीमुळे तक्रारदार त्रस्त व्हायचे. या सोयीच्या भूमिकेमुळे त्यांच्याविषयी सामान्य नागरिकांमध्ये त्यांच्या कार्यपद्धती विषयी नाराजी होती. तीन दिवसांपूर्वीच या पोलिस ठाण्यातील सहाय्यक निरीक्षक सागर डगळे यांना जिल्हा रुग्णालयात सात हजारांची लाच घेताना अटक झाली. यासह देवळाली गाव परिसरात एका तरुणावर तलवारीने सशस्त्र हल्ला करण्यात आला होता. लासलगाव ता.निफाड येथे स.पो.नि.म्हणून कार्यरत असतांना पत्रकारास अपमानास्पद वागणूक प्रकरणी त्यांचे विरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती.

# सुदानमध्ये अडकलेले सर्व भारतीय मायदेशी परतले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सुदानमधील देशांतर्गत युद्धात अडकून पडलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाने २४ एप्रिलपासून 'ऑपरेशन कावेरी'ही मोहीम सुरू केली होती. या मोहिमेद्वारे जल आणि हवाई मार्गाने हजारो भारतीयांना मायदेशात परत आणण्यात भारत सरकार यशस्वी झाले आहे. या मोहीमेअंतर्गत तब्बल ३,८६२ भारतीय सुखरूप मायदेशी परतले आहेत. त्यानंतर आता ही मोहीम बंद करण्यात आली आहे. भारतीय वायूसेनेचे शेवटचे विमान शुक्रवारी ४७ भारतीय नागरिकांना घेऊन मायदेशी परतले. त्यानंतर ही मोहीम थांबवत असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे. सुदानचे लष्करप्रमुख जनरल अब्देल फताह बुरहान आणि 'रॅपिड सपोर्ट ग्रुप' (आर.एस.एफ.) या निमलष्करी दलाचे प्रमुख जनरल मोहम्मद हमदान दगालो या दोन बलवान नेत्यांमध्ये सत्तेसाठी संघर्ष पेटला आहे.






प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# कौटुंबिक तणाव

आधुनिक केसरी

**आंखोमे जलन सिनेमे तुफानसा क्यों है, इस शहर मे हर शक्स परेशानसा क्यों है असा एक हिंदी शेर आहे. माणूस परेशान असण्याची अनेक कारणे असू शकतात. सत्ता, संपत्ती, स्त्री सहवासाचा अभाव, अहंला ठेच पोहचणे, संतती चांगली न निघणे आणि बरेच काही असू शकते. अलीकडच्या काळात शिकून सवरून आपल्या लायकीप्रमाणे काम नमिळणे, मिळाले तरी वरिष्ठांचा नाहक त्रास किंवा कोणाचे काही कारणामुळे व्यसनाच्या आहारी जाणे या सर्व गोष्टी त्रासदायक वाटू शकतात व माणसास परेशान करण्यास पुरेशा असतात. या सर्व कारणापेक्षा कौटुंबिक ताण नावाचा एक वेगळाच प्रकार माणसात असतो. तो का असतो आणि त्याचे परिमार्जन कसे करायचे हा या लेखाचा उद्देश.**





## क्षितिजापल्याड

माणूस बाहेरचे हजार वार झेलायला तयार असतो, पण कौटुंबिक कलह मात्र त्याच्या जिव्हारी लागतो. भाऊकीची धुरा बांध्याची भांडणे, ऑफिसमधील कामाचा व्याप किंवा कोणाचे कर्जाऊ देणे या सर्व गोष्टींना तो निधड्या छातीने सामोरे जातो. परंतु घरात मात्र त्याला शांतता हवी असते. आपण जे करतो ते कुटुंबाच्या भल्यासाठी हे त्याच्या नेहमी मनात असते, मात्र त्याच्या वर्तनव्यवहारावर कोणी संशय घेतल्यास त्याचा तोल ढळण्यास सुरुवात होते. व्यवहारातील पारदर्शकता हा यावरील उपाय आपणास वाटण्याचा संभव नाकारता येणार नाही, पण काही गोष्टी पुरुष घरात सांगत नाही. सांगत नाही म्हणण्यापेक्षा त्या कुटुंबातील व्यक्तींसाठी महत्त्वाच्या नसतात किंवा अमुक गोष्ट सांगितली तर कुटुंब नाहक चिंता करेल, ही एक त्याची धारणा असते. पुरुषाचे घरात कमी बोलणे यामागे जी अनेक कारणे आहेत त्यापैकी एक म्हणजे कोणताही पुरुष मनापेक्षा डोक्याने विचार करतो आणि भावनेपेक्षा त्याला विचार जवळचा वाटतो. याला वाटल्यास आपण पुरुषी मानसिकता म्हणू शकतो. कोणत्याही स्त्रीला आपला नवरा आपल्याशी मनमोकळे बोलावा, हितगुज साधावे असे वाटणे नैसर्गिक आहे. स्त्रीचे असे वाटणे जेवढे नैसर्गिक आहे तेवढेच त्याचे घरात शांत असणे नैसर्गिक आहे, हे देखील समजून घेतले पाहिजे. या प्रकारच्या असमंजसपणातून घरात वाद होण्यास सुरुवात होतात. बाहेर बरे गुलूगुलू बोलणे येते आणि घरी आले की दातखिळी बसते, कोण्या मित्राचा फोन आला की तासभर बोलता आणि माझ्यासाठी मात्र मुका भूलोबा, हा टोमणा त्याला नेहमी खावा लागतो. मग सुरू होते महाकाव्याचे वाचन. अमुक अमुक माझ्या मैत्रिणीचा नवरा तिच्याशी किती बोलतो, तिला शेजारीपाजारी बायकांना बोलायला देखील सवड नसते, किती छान राहतात दोघे आणि तुम्ही. हे ज्या मैत्रिणीच्या नावावर खपवले जाते त्या घरी देखील हीच परिस्थिती असते, हे कुठे माहीत असते. शेवटी घरोघरी मातीच्या चुली. दुसरी कौटुंबिक तणाव वाढण्याची गोष्ट म्हणजे संशय. कुटुंबात कोणाच्याही मनात संशय आला तर त्याची परिणती कलहात होणार हे नक्की. कारण मनातला संशय माणसास स्वस्थ बसू देत नाही. तुम्ही कितीही समजून सांगण्याचा प्रयत्न करा किंवा बॉण्डपेपरवर लिहून द्या, मनातला संशय असं दुसऱ्याने सांगून जाणार नाही. स्वतःच्या मनाची व्यपकता हाच त्यावर उपाय असू शकतो. एखाद्या महिलेने पुरुषाशी बोलणे किंवा पुरुषाने महिलेशी बोलणे हे आधुनिक काळात तुम्ही टाळू शकत नाही. अशा परस्परांच्या अविश्वासामुळे कित्येक घरे उद्ध्वस्त झाली आहेत आणि पुढेही होत राहतील. कारण संशयावर कोणतेच औषध नाही, तिथे कोणतीच मात्रा चालत नाही. त्याने किंवा तिने समजून घेतले पाहिजे की, संशयाचा शेवट हा फक्त आणि फक्त मृत्यू असतो. म्हणून माऊलींनी ज्ञानेश्वरीत म्हटले आहे, म्हणुनी संशयाहुनी थोर, आणिक नाही पाप घोर, हा विनाशची वाघूर, प्राणियाशी. मथितार्थ असा की, संशय म्हणजे विनाश. आजकाल वर्तमानपत्रात फक्त आणि फक्त संशयावरून जीव घेतल्याच्या बातम्या वाचतो. मनाची व्यापकता, समजूतदारपणा किंवा परस्पर विश्वास याशिवाय यातून सुटका नाही. आपल्या स्वचे वर्तुळ विस्तीर्ण केले पाहिजे. आपला स्व म्हणजे फक्त आपला अहं आहे हा गैरसमज अगोदर आपण काढून टाकला पाहिजे. या स्व चा आणि जगाचा काहीच संबंध नसतो का ? तत्त्वज्ञानाच्या मुळाशी जे काही गहन प्रश्न आहेत, त्यापैकी हा एक स्व आहे. या लेखात अवघड किंवा तत्त्वज्ञानात्मक काही लिहायचे नाही, साध्या सोप्या शब्दात मांडणी करायची, हे ठरविल्यामुळे तत्त्वज्ञानात जाणे नको. कुटुंबात तणाव वाढण्याचे तिसरे आणि तेवढेच महत्त्वाचे कारण म्हणजे पैसा. व्यवहारासाठी पैसा आवश्यक असला तरी तो कोणत्याही मार्गाने कमवावा आणि कसाही उधळावा असे नसते. संत तुकाराम महाराज म्हणतात, जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी. म्हणजे पैसा उत्तम मार्गानेच कमावला पाहिजे आणि हा कमावलेला पैसा आपला नाही याच भावनेतून खर्चही केला पाहिजे. परंतु समाजात आपण नेमके याउलट परिस्थिती पाहतो. कुटुंबात कोणीही व्यक्ती फक्त पैशावरच प्रेम करत असेल आणि तो मिळविण्यासाठी त्याची काहीही करायची तयारी असेल तर वाद होणार, ते विकोपाला जाणार. कारण हा पैसा फक्त एकट्याने येत नाही तर ज्याच्याकडून तुम्ही तो जबरदस्तीने मिळवला त्याच्या भावना त्यात गुंतलेल्या असणारच. नको त्या मार्गाने कमावलेला पैसा नको त्या उचापती करण्यास प्रवृत्त करणारा ठरतो आणि यातून कौटुंबिक स्वास्थ्य बिघडण्यास सुरुवात होते. चार पुरुषार्थापैकी महत्त्वाचा असणारा अर्थार्जन पुरुषार्थ कौटुंबिक स्वास्थ्य प्रदान करणारा, मने जोडणारा आणि सामाजिक सलोखा आणि उत्तरदायित्व सांभाळणारा कसा ठरेल याचा विचार केल्यास परस्परांमध्ये कटुता निर्माण होणार नाही. कौटुंबिक तणावास कारणीभूत ठरणाऱ्या अनेक गोष्टी असू शकतात. त्याचे व्यवस्थापन हे फक्त परस्परांच्या आदरातून, विश्वासातून आणि प्रेमातून निर्माण होऊ शकते, दुसरा मार्ग नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८

# गाव-खेड्यातील प्रखर वास्तव : ' उसवण '


आधुनिक केसरी

**बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यातील बीडसांगवी या गावचे लेखक श्री.लक्ष्मण दिवटे यांचा ' उसवण ' हा सतरा ग्रामीण लघुकथांचा पहिला संग्रह राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानामधून नुकताच अमरावतीच्या पायगुण प्रकाशनातर्फे प्रसिध्द झाला असून या कथा वर्तमानकालीन भेदक ग्रामीण वास्तवाचे जिवंत चित्रण करणाऱ्या आहेत. शेतकरी व शेतमजूर यांचे कृषिक्षेत्राशी निगडित जगणे आणि त्यांच्या जगण्यातील विविध ताणे-बाणे, संघर्ष, त्यांची सुख-दुःखे व हर्ष-विमर्ष, असा आशयाचा विस्तृत परीघ असलेल्या या कथा कृषिवलांच्या कष्टप्रद जगण्याचा सार्थ वेध घेण्याच्या आशयसूत्राभोवती गुंफल्या आहेत.**

.. दत्तू पाटील जेंव्हा कांदा मार्केटला घेऊन येतो तेव्हा कांद्याचे भाव पडतात आणि त्यामुळे त्याच्या मुलीचे जमलेले लग्न मोडते ,याची दर्दभरी कहाणी ' ठिगळ ' कथेत आली आहे. तर पावसाळी दिवसात पाऊस आल्याने शेतातून परतताना गावच्या ओढ्याला आलेल्या पुराच्या पाण्याचा अंदाज न आल्यानं वाहून जाणाऱ्या बळीची कहाणी ' आसवांचा पूर ' कथेत चितारली आहे.गावात पोळ्याच्या सणानिमित्ताने स्वतःची पाटील म्हणून प्रतिष्ठा वाढावी या हेतूने खिल्लारी बैलं भाड्याने आणणाऱ्या विष्णू पाटलाचे हे गुपित उघडे पडल्यानंतर त्याची होणारी नाचक्की ' बेगड ' कथेत नेमकी वर्णिली आहे,तर लक्ष्मी आईच्या नवसानं मूल झाले म्हणून पोतराज बनलेला मरीबा डोक्याचे केस कापून आणि आभरान त्यागून शिक्षणाची कास धरतो,असा आशय असलेली ' खीळ ' ही कथा अंधश्रध्देवर प्रहार करते.कलाकेन्द्रातल्या चंपाबाईच्या नादी लागून भिकेला लागलेल्या मोहनराव सावकाराची डोळ्यात अंजन घालणारी कहाणी ' रुतलेला काटा ' कथेत आली असून ही कथा चंगळवादी मानसिकतेची लागण आज ग्रामीण भागालाही कशी झाली आहे,याची चुणूक दर्शवते. ' आईचं घर ' आणि ' जोडवं ' या कथांतूनही शहरी संस्कृतीच्या प्रभावामुळे पोटी मुलं असुनदेखील कष्ट करून जगण्याची पाळी आलेल्या वृद्धांच्या जगण्याचे मनाला चटका लावणारे चित्र साकारले आहे,तर गरीब ऊसतोड मजूरांचे मुकादमांकडून होणारे मानसिक,आर्थिक व शारीरिक शोषणाचे चित्रण ' उसवण ' या शीर्षक कथेत रेखाटले असून ही कथा ऊसतोडमजूरांचे कष्टमय जीवन उजागर करते,तर ' वंशाला मुलगाच हवा ' या मानसिकतेतून उद्भवणाऱ्या स्त्रीभ्रूण हत्येसारख्या गंभीर समस्येवर प्रकाशझोत टाकणारी ' हीच माझी मुलं ' ही कथा आहे.सततच्या अस्मानी आणि सुल्तानी अरिष्टांमुळे आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू पाहणाऱ्या हरिला त्याची छोटी मुलं कशी आत्महत्येपासून रोखतात,याचे वाचक मनाला दिलासा देणारे चित्रण ' आपण सारे जगूया ' या कथेत आले आहे,तर ' थोरली बहीण ' आणि ' आई ' या कुटुंबकथा घरोघरच्या अंतर्गत कलहाचे दर्शन घडवतात.गावातल्या धनिक पाटलाच्या विरोधामध्ये रणशिंग फुंकत गावकीची पारंपरिक गलिच्छ कामं नाकारणाऱ्या मातंग समाजातील परिवर्तनाचे चित्र ' गावकी ' कथेत उमटले आहे,तर उन्मत्त आणि अहंकारी माणसाचे गर्वहरण कधीतरी होतच असते,असा मौलिक संदेश ' मातीचं इमान ' या कथेतून दिला आहे.गावाच्या शीवेवर आलेला मरीआईचा गाडा स्वप्नात पाहिल्याच्या लक्षूदादाच्या अंधश्रध्देवर प्रहार ' शीवंवरचा गाडा ' कथेत केला आहे,तर एकतारी वाजवत भजन गाऊन पोट भरणाऱ्या गरीब तुकादादाची करुण कहाणी ' गोधडी ' या कथेत रंगवली आहे.

..थोडक्यात लक्ष्मण दिवटे लिखित ' उसवण ' या संग्रहातील कथा शेतकरी आणि शेतमजूरांच्या बारोमास कष्ट करीत जगण्याचे भयावह आणि प्रखर वास्तव त्यांच्याच बोली भाषेतून अगदी जिवंतपणे साकारणारी आहे.ही कथा कालबाह्य रुढी,अंधश्रद्धा,परंपरा यांवर आघात करून दलित समाजात घडून येणाऱ्या सामाजिक परिवर्तनाची नोंदही घेणारी आहे.सशक्त आशय,नेटके प्रसंग आणि ओघवत्या निवेदन शैलीमुळे ही कथा मनाचा ठाव घेते.पण असे असले तरी एक-दोन उणिवा मात्र जाणवतात.' पाचर ' व ' आपण सारे जगूया ' या दोन कथांतील पात्रे अकृत्रिम न वाटता रचलेली वाटतात आणि या दोन्ही कथांचा घाटही काहिसा विसविशीत झाला आहे.असो. . . मलपृष्ठावर प्रसिद्ध लेखक श्री.विलास सिंदगीकर म्हणतात त्याप्रमाणे ' या कथा संग्रहातून अस्सल ग्राम जीवनाची जाण आणि भान सामर्थ्यानिशी प्रकट झालेले आहे ', हे नक्की ! हेच श्री. लक्ष्मण दिवटे यांच्या लेखणीचे यश आहे.त्यांच्या पुढील लेखनास मनःपूर्वक शुभेच्छा !

**उसवण - ( कथासंग्रह )**
**लेखक - लक्ष्मण दिवटे**
**प्रकाशक - पायगुण प्रकाशन,अमरावती ( मो.९०११३९४९०५ )**
**पृष्ठे - १५६**
**मूल्य - ७२ रु.**
**मुखपृष्ठ - सरदार जाधव**




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आत्मचरित्र लिहिण्याची हिंमत बाळगली पाहिजे : गोडबोले

## डॉ. उज्ज्वला गोखले लिखित 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्वरूप व चिकित्सक विवेचन' ग्रंथाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** थोरामोठ्यांनीच आत्मचरित्र लिहावीत, हा परंपरेचा पगडा झुगारून आपल्या जगण्याचे अनुभव मांडणारे आत्मचरित्र लिहिण्याची हिंमत बाळगली पाहिजे. भूतकाळाची पुनर्मांडणी, सत्याकडे तटस्थपणे पाहत सुट्यासुट्या तुकड्यांची कलात्मक गुंफण करत त्याला ललितलेखनाचा धागा जोडला, तर आत्मचरित्र वाचनीय होते. त्यात विशेषणांचा योग्य वापरही गरजेचा असतो," असे मत ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले यांनी व्यक्त केले. संस्कृती प्रकाशनातर्फे डॉ. उज्ज्वला गोखले लिखित 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्वरूप व चिकित्सक विवेचन' ग्रंथाच्या प्रकाशनावेळी गोडबोले बोलत होत्या. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'मसाप'चे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. समीक्षक डॉ. रेखा साने-इनामदार, प्रकाशिका सुनिताराजे पवार आदी उपस्थित होत्या.

डॉ. रेखा-इनामदार म्हणाल्या, "गोखले यांनी या ग्रंथात स्त्रियांची आत्मचरित्रे, त्यांची प्रेरणा, भावविश्व, विवेचन अत्यंत चिकित्सकपणे मांडले आहे. भाषा, आशय वाचकाला धरून ठेवणारी असावी. स्त्रियांचे आत्मचरित्र पतीच्या निधनानंतर का लिहिले जाते, याचा विचार व्हावा. गोखले यांनी आत्मव्याधीग्रस्त लोकांच्या लेखनावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या लेखनात आक्रमकता, अट्टाहास, अभिनिवेश नाही.

मंगला गोडबोले म्हणाल्या, "सीमारेषेवरील वाङ्मय प्रकार असलेल्या आत्मचरित्रात लवचिक, मुक्त, कबुलीजबाबाची भावना, संघर्ष, हळहळ मांडता येते. कोरोनाचा काळ आणि हाताशी असलेली माध्यमे यामुळे आत्मचरित्रांसाठीचा कच्चा माल मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. तरीही लिहायला कोणी धजावत नाही. बदलत्या काळात बायकांनी स्वत्व कसे सांभाळले, हे दाखवणारा हा ग्रंथ आहे. महिलांची आत्मचरित्रे ही महिला शक्तीचे प्रखर दर्शन घडवणारी आहेत. अध्यक्षीय भाषणात प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, "तत्व आणि भावनांच्या संघर्षात स्वत्व न हरवता अंतःस्वर जपत लिहिलेली आत्मचरित्रे समाजाला प्रेरक असतात. आज भूगर्भापासून अंतरिक्षापर्यंत स्त्रिया गगनभरारी घेत आहेत. परंतु शोषण पाठ सोडत नाही.



त्याचे स्वरूप, व्यवस्था बदलत राहते. मानवमुक्ती, वेदना, विद्रोह आणि नकारात्मकता यातून आत्मकथन लिखाणाचा प्रवास होतो. ज्यांनी आत्मसन्मान जपला, त्यांची आत्मचरित्रे काळाच्या कसोटीवर टिकली. राजकीय लोकांची, त्यातही महिलांची आत्मचरित्रे का येत नाही, याचा विचार व्हावा. स्त्रियांना सत्तेवर बसवले जात असले, तरी अजूनही पुरुषांचा त्यात होणार हस्तक्षेप, वर्चस्व दिसून येते. दुसऱ्यांच्या आयुष्याचे मूल्यमापन करताना स्वतःच्या आयुष्याचे मूल्यमापन करणे मात्र कठीण वाटते. आत्मचरित्र हा स्वमूल्यांकनाचा भाग आहे. मराठी साहित्यात आत्मचरित्राला १५० वर्षांची परंपरा असून, अंतःस्वर जपणारी आत्मचरित्रे लिहिली जावीत, असे प्रा. मिलिंद जोशी यांनी नमूद केले. सुनिताराजे पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उज्ज्वला गोखले यांनी ग्रंथाविषयी विवेचन केले. शलाका माटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आशय गोखले यांनी आभार मानले.



# भाजपाच्या 'पश्चिम महाराष्ट्र : माध्यम प्रमुख'पदी अमोल कविटकर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारतीय जनता पार्टीच्या 'पश्चिम महाराष्ट्र : माध्यम प्रमुख'पदी टिव्ही पत्रकारितेत गेली ११ वर्षे कार्यरत असलेले पत्रकार अमोल कविटकर यांची नियुक्ती करण्यात आली असून, निवडीचे पत्र भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. प्रसंगी 'महाविजय २०२४' अभियानाचे प्रमुख आमदार श्रीकांत भारतीय, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये उपस्थित होते.

कविटकर यांनी 'एबीपी माझा'मध्ये मुंबई आणि छत्रपती संभाजीनगरसह 'जय महाराष्ट्र' आणि 'साम टिव्ही'मध्ये पुणे ब्युरोमध्ये काम केले आहे. दैनंदिन घटनांसह शहरीकरणाचे प्रश्न, ग्रामीण समस्या आणि शेती प्रश्नांच्या वार्तांकनाचा अनुभव आहे. शिवाय सांगली आणि चिपळूणच्या महापुराचे त्यांनी केलेले वार्तांकन चर्चेचा विषय ठरले होते. 'आपला प्रसार माध्यमांशी असलेला संपर्क पक्ष संघटनेतील माध्यम विभागाच्या कामास गती देण्यास निश्चितपणे उपयुक्त ठरेल, असा विश्वास असून ही जबाबदारी पार पाडताना माध्यम विभागातील सर्वांना सोबत घेऊन भाजपाचे कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अथक परिश्रम कराल', अशी अपेक्षा व्यक्त करत प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी कविटकर यांना शुभेच्छा दिल्या.

# बुद्ध जयंतीनिमित्त सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरापासून जवळच असलेल्या पारडी येथे बुद्ध जयंती निमित्त बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी ( दि.५ मे ) रोजी शुक्रवारी सायंकाळी लुंबिनी बौद्ध विहारात गावातील सर्व आजी माजी कर्मचारी यांच्या वतीने सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी उद्घाटक म्हणून प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. मिलिंद धनसडे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अध्यक्ष स्थानी माळाकोळीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांची उपस्थिती होती.

प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्धांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करून मेणबत्त्या लावून वंदन करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प पुजा, धुपपुजा करून तद्नंतर आजी माजी कर्मचारी बांधवांच्या अर्थसहाय्यातून सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन व वर्तमानपत्राचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध हृदयरोग डॉ. मिलिंद धनसडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, मंगल सोनकांबळे, प्रसेनजीत कांबळे, आर.जी.वाघमारे, गणपती जोंधळे, संजय हंकारे, गौतम गायकवाड, माजी सैनिक संजय गायकवाड,आजी माजी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, जेष्ठ नागरिक आदींची उपस्थिती होती. उपस्थितांना संबोधित करताना प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.मिलिंद धनसडे म्हणाले कि, डॉ. आंबेडकर म्हणजे ज्ञानाचा अथांग महासागर आहेत व त्या महासागरातून विचारांचे दोन थेंब जरी आपण चाखले तरी आपले सर्वांचे जीवन सन्मार्गी लागेल व वाचनालयाचे उद्घाटन केल्यानंतर वाचनालयाला शुभेच्छा देऊन पुढे वाचनालयाचे ग्रंथालयात रुपांतर व्हायला हवे अशी अपेक्षा व्यक्त केली.

तर अध्यक्षीय समारोप करतांना सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकला,पुढे बोलतांना ते म्हणाले की, तरूणाईने व्यसनाधीनतेपासून दूर राहून बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला सुसंस्कृत समाज घडवावा. माझ्या हातून वाचनालयाचे उद्धाटन होणे हे माझं भाग्य समजतो. यानंतर विकासकुमार जोंधळे व संच यांचा भीम- बुद्ध गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मंगल सोनकांबळे, प्रसेनजीत कांबळे,आर.जी. वाघमारेयाप्रसंगी गावातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, सर्व ग्राम पंचायत सदस्य, जयंती मंडळाचे अध्यक्ष,पदाधिकारी उपस्थित होते. डॉ.मिलींद धनसडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक निलपत्रेवार यांनी उपस्थितांना आपल्या मार्गदर्शनाने मंत्रमुग्ध केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मंगल सोनकांबळे तर आभार माधव गायकवाड यांनी मानले.




# पावसाने ८ हजार हेक्टर पिकांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती:** जिल्ह्यात एप्रिल महिन्यात ३ हजार २०० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झालेले असताना मे मध्ये अवघ्या तीन दिवसांतील वादळी पावसाने तब्बल ४ हजार ९७१ हेक्टरमधील पिकांची हानी झाली आहे. आता शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. मार्च महिन्यापासून जिल्ह्यात बारा वेळा अवकाळी पावसाने हादरा दिला. यात रबी पिकांसह भाजीपाला आणि फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# पावसाला आवाहन : पयोदवर्षा



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**पयोदवर्षा हा कोल्हापूर येथील कवी लेखक मंचने प्रकाशित केलेला ८४ ते ८५ कवी आणि कवयित्रींचा प्रातिनिधिक कवितासंग्रह आहे. गेली पाच वर्षे कार्यरत असलेल्या या समूहावरील अनेक कवी- कवयित्रींना एकत्र आणणे ही कष्टाची बाब. अपर्णा सचिन पाटील आणि शर्मिष्ठा ताशी यांनी पाठपुरावा करून, त्यांच्या मागे लागून हे काम करवून घेतले. पाऊस हा तसा सर्वांचा आवडता. पृथ्वीचा तो पयोददाता. खरे तर तो पोशिंदा. पाऊस सर्वांचा लाडका असतो. परंतु तो कधी कधी नकोसे करून सोडते. जिवाला त्रास देतो परंतु तरीही तो आवश्यक असतो.**

पावसावरच सारे जिणे अवलंबून असते. पाऊस खरे तर हंगामी असतो. मग नेमेचि येतो पावसाळा असं एक कवीनं का म्हटलं असावं असा प्रश्न पडण्याजोगा. पाऊस धरित्रीला खुलवतो, जीवसृष्टी सजवतो आणि तिला ‘जीवन’दान देत असतो. असा विविधरंगी पाऊस या संग्रहात रसिकांना भेटतो, त्यात रसिक चिंब न्हाऊन निघतो. अशा सरींमागून सरी या संग्रहात कोसळताना दिसतात.

पहिलीच कविता ज्येष्ठ कवी, गझलकार श्रीराम पचिंद्रे यांची आहे, ये जलवंती नावाची. वैशाखाची फुले उन्हाची तुझ्या कृष्णवर्णी कुंतलात ( काळ्या काळ्या केसात ) माळून घे असे ते जलवंतीला म्हणतात. नादमयी अशी लयबद्ध शब्दांनी नटलेली ही कविता. अवकाशात नक्षी कोरीत ये असे आवहन कवी करतो. अपर्णा पाटील यांनी श्रावणमासातील पावसाचे वर्णन केले आहे.. किती ताजेतवाने आणि बहरलेलं धरणीचं रूप पाहायला मिळतं ते नजरेला सुखावणारं असतं असं त्या म्हणतात. पाऊस जसा हसवतो तसाच तो रडवतोही. त्याचं ते रूपडं त्यांनी वर्णिलं आहे. सुजाता पेंडसे यांचा पाऊस धो धो येतो आणि त्यामुळं पाखर चिंब भिजून पंखात चोच मिटून बसतात असं वर्णन त्यांनी केलं आहे सुगीचे दिवस आणून शेतकऱ्यांना आनंदित करणारा पाऊस. शर्मिष्ठा ताशी यांनी माझा नि तुझा पाऊसमधून पाचूच्या धरतीवर आनंदाची वृष्टी करणारा, त्या निवळशंख पाण्यात नाहताना किती मज्जा येते हा तिचा पाऊस. त्याचा पाऊस मात्र नीरस, निरुत्साही असतो असं त्या म्हणतात. पावसाची दोन रूपं त्या दाखवतात. दुसऱ्या पावसात मात्र श्रावण ओथंबून आला आहे. अष्टमीच्या रात्री गोकुळात आलेला रौद्र पाऊस त्या दाखवतात. माझा पाऊस तुझा पाऊस ही वैष्णवी अंदकर यांची कविता दोन्ही पावसात किती फरक आहे ते दाखवतो. तुझा पाऊस तुझ्या केसांत आणि ओठात माझा पाऊस माझ्या उरात, श्वासात असं कवयित्री म्हणते. माझा पाऊस हा काचेचा झुला तर तुझा पाऊस पायात शृंखला वाटतो. तिला तो लडिवाळ वाटतो तर त्याला बुजलेला वाटतो. नीता क्षीरसागर यांचा पाऊस मात्र पन्हाळाखाली भांडी ठेवायला लावणारा, डोळ्यातील ढग मोजायला लावणारा असा उदासही वाटतो. पूजा दिवाण यांनाही तो भावतो. श्रीकांत भानगावकर यांचा पाऊस अष्टाक्षरीतून कोसळतो. तो कधी सोसायट्याचा तर कधी मोर पिसारा फुलवणारा असतो. दीप्ती कुलकर्णी यांचा पाऊस मात्र गातच येतो. पाऊस आला पाऊस आला घेऊन मृदुगंधाला अशी थेंबातून प्रकटणारा जीवनदाता पाऊस त्यांना वाटतो. संयोगिता महाजन म्हणतात आसवांशी तुझं बरं जमतं तर सीमा पाटील यांचा पाऊस श्रावणात रमतो. नसीम इकबाल जमादार यांचा पाऊस मात्र वाट पाहायला लावणाऱ्या प्रियकरासारखा वाटचो. मात्र तो बरसू लागला की सगळी उणीव प्रियकरासारखाच भरून काढतो. क्रांती तानाजी पाटील, मीनल कुलकर्णी, अपूर्वा पाटील, उमा रवींद्र मठपती वैभव चौगुले आदींचा पाऊस मात्र मनभावन आहे. आश्विनी कुलकर्णी जोशी यांची कविता तनाला भिजवणारा व मनाला रडवणारा आहे. डोळ्यांत साचलेलं पाणी तो बरसून टाकायचा. ती त्याच्या भेटीला आतूर झालेली मग ती त्याला म्हणते बरसून भिजव रे अवघे हे चराचर. आदर्श पाटील यांचा पाऊस शेतकऱ्याचे आवाहन आहे. किशोरी यांचा अभंगरूपी पाऊस भावतो. तर प्रेमा कुलकर्णी यांचा पाऊस निळा सावळा कृष्ण सखा आहे. पल्लवी बाबूराव माळींचा पाऊस हा शेतकऱ्यांचा पाऊस आहे. मृदुला बापट यांचा पाऊस विरहात्मक आहे. नलीनी जुगारे कवितेतून पावसाला आश्वासन देतात प्रदूषण करणार नाही.

सुभाष मधुकर तोंडोळकर यांना कधी पाऊस हा भोग तर कधी शाप वाटतो. कीर्ती हवालदार, वीणा पाटील, रेखा दीक्षित, लक्ष्मण शिंदे, नीलिमा ताटके, एकनाथ गायकवाड यांचाही पाऊस अनुभवायला हवा.

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या गझल पावसाचे मनमुराद वर्णन करतात. आता उन्हाळा घालवाया ये असे ते म्हणतात. पत्रकार अरुण कोरे यांचा पाऊस थेंबाथेंबात ओलाचिंब येऊन खुलासा करतो. काळजावरची काजळी पाऊस वाहून नेतो. बी. अनिल यांचा पाऊस मनमुराद कोसळतो. तरी विद्यादेवी देशिंगे यांचा पाऊस तिचा, त्याचा व माझा अशी तुलना करतो. चित्रा क्षीरसागर यांचा पाऊस मात्र मृद्गंधाच्या मनात शिरतो.

हाच पाऊस विठ्ठलाच्या गाभाऱ्यातला त्यांना वाटतो. वृंदा करमरकर, श्रद्धा पाटील, डॉ. प्रियदर्शिनी चोरगे, डॉ. योगिनी कुलकर्णी , युवराज कदम, वनिता पाटील, डॉ. स्वाती पाटील, पल्लवी भागवत यांनीही पावसाची विविध रूपे आपल्या कवितेतून रेखाटली आहेत. इला माटे मात्र आजोबांच्या नजरेतून पाऊस पाहतात. तो त्यांना लहान मुलांसारखा निरागस वाटतो.

छोटेखानी परंतु देखणा असा संग्रह आहे. शर्मिष्ठा ताशी यांचे मनोधेवक मुखपृष्ठ आहे.

पयोदवर्षा
**अपर्णा पाटील व शर्मिष्ठा ताशी**
**पृष्ठे १०५, मूल्य १५० रुपये**
**प्रकाशक - युवराज कदम व वनिता कदम**
**वाचनकट्टा प्रकाशन, कोल्हापूर**




# दूरदृष्टिकोन असलेला राजातील माणूस



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**राजर्षी शाहू महाराज हे अआधुनिक भारतातील पुरोगामी, परिवर्तनकारी चळवळीतील एक अग्रगण्य नाव आहे. शाहू महाराजांच्या कार्य व विचार वगळून आधुनिक भारताताचा इतिहास अपूर्ण राहतो. छत्रपती शाहू महाराज हे राजा जरी असले तरी त्यांचे कार्य लोककल्याणकारी व राष्ट्रहिताचे होते. राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर संस्थानाचे राजे असून त्यांचे कार्य, विचार देशभर पसरलेले आहे राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण, आरोग्य, नोकरी, आरक्षण भर देऊन बहुजन समाजातील लोकांना प्रगतीचे द्वार उघडे करून दिले. राजश्री शाहू महाराज हे समतावादी, न्यायवादी राजे होते.**

विषमता, जातिवाद, पाखंड व अंधश्रद्धा या गोष्टीला थारा न देता, व राज्यामध्ये कुठेही अशा गोष्टी घडू नये म्हणून जागृती करणारे महान राजा होते. हजारो वर्षापासून शिक्षण नोकरी व सत्ता अल्पसंख्यांक लोकांच्या हाती असून ती जोपर्यंत बहुजन लोकांच्या हाती येणार नाही तोपर्यंत राष्ट्रहित साध्य होणार नाही. राजर्षी शाहू महाराज हे एक स्पष्ट वक्ता सुद्धा होते. त्यांनी कर्मकांड, जातीभेद, अंधश्रद्धा यावर कठोर शब्दात टीका करून, समाजामधून त्या नष्ट व्हायला पाहिजेत याचा आग्रह धरला. राजर्षी शाहू महाराज शिक्षणाला अत्यंत महत्त्व द्यायचे. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार बहुजन समाजात व्हावा म्हणून आपले संस्थान छोटे जरी असले तरी त्या ठिकाणी अनेक विद्यालय सुरू केले. विद्यार्थ्यांचा राहण्याचा प्रश्न व समाजामध्ये असलेली जातीय विषमता यामुळे विद्यार्थ्यांना अनेक बाबींना सामोरे जावे लागत असे. याही प्रश्नावर तोडगा म्हणून राजश्री शाहू महाराजांनी आपल्या संस्थांना मध्ये अनेक वस्तीगृहाची निर्मिती केली. वसतिगृहामध्ये राहून विद्यालयात विद्यार्थी शिकतील व स्वतःच्या विकासासोबतच राष्ट्रहित साध्य करतील. हा त्यामागचा उद्देश होता. राजर्षी शाहू महाराज एकटे असून संस्थान लहान असून, शिक्षण मात्र महाराष्ट्रभर पसरवले. बहुजनांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले शिक्षणासाठी अनेक लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केली. शिक्षणाशिवाय लढाऊ पिढी निर्माण होणार नाही हा सार्थ विश्वास शाहू महाराजांना होता. आणि म्हणून त्यांनी आपल्या प्रत्येक भाषणांमधून शिक्षणाचे महत्त्व विशद करताना बहुजन समाजातील लोकांनी शिक्षण घ्यावे हा आग्रह धरत होते. शाहू महाराजांबद्दल बोलायचे झालेच तर आज स्वतःला हिंदू समजणारे सरकार पक्ष व नेते राजर्षी शाहू महाराजांना हिंदू म्हणायला तयार नाहीत. मग सत्ताधारीने पक्षांचे नेत्यांचे नेमके पर्यंत कोणते हा प्रश्न निर्माण होतो. कारण या लोकांनी जर शाहू महाराजांना हिंदू मानले असते तर, हिंदूचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सरकारने शिक्षणावर ती जोर दिला असता, हिंदूच्या एका राजाने समस्त बहुजनांना शिक्षणाची सुविधा निर्माण केली, परंतु त्याच राज्यामध्ये हिंदूंचे अनेक आमदार खासदार असताना हिंदूंचा मुख्यमंत्री असताना, शिक्षण बंद केले जाते ही खूप मोठी खंत आहे. शाहू महाराज यांच्यामते जातिभेद नष्ट झाला तरच राष्ट्राची उन्नती होईल. स्वार्थासाठी किंवा धर्मासाठी जाती-जातीमध्ये, द्वेश व मत्सर पसरवणे हे कदापिही सहन करू नये. अशी शिकवण शाहू महाराजांची असताना या ठिकाणी जातीजातीमध्ये जाती धर्मामध्ये द्वेष पसरवून राजकीय पोळी भाजून घेतले जात आहे. राजश्री शाहू महाराज हे आपल्या संस्थानांमध्ये दरवर्षी 200 सैन्यांची भरती करून त्यांना रोजगार देत होते. शाहू महाराजांचे संस्थान छोटे जरी असले तरीही मनामध्ये लोककल्याणाची भावना असल्याने दरवर्षी फक्त सैन्यांमध्ये 200 लोकांची भरती केली जात होती. स्वतःच्या संस्थानांमध्ये उद्योगाभिमुख शिक्षण देऊन, तरुणांना उद्योग करायचे शिकवले जात होते. शिक्षण व नोकरीमध्ये बहुजन समाजाला 50 टक्के आरक्षण देऊन बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम राजश्री शाहू महाराजांनी केले.

परंतु त्याच राज्यांमध्ये शाहू महाराजांच्या धर्मातील स्वतःला धर्माचे उपासक मानण्याचे सोंग करणाऱ्या लोकांनी राज्यातील रोजगार, उद्योग बंद केले. शाहू महाराज छोट्याशा संस्थानांमध्ये एकटे असून 200 लोकांना नोकरी द्यायचे. आता तर आमदार खासदार व महाराष्ट्र मध्ये सत्तेत हिंदू असतानाही हिंदूंच्याच मुलांना रोजगार मिळत नाही, शिक्षण मिळत नाही, ही खूप मोठी शोकांतिका आहे. राजर्षी शाहू महाराजांची नेहमी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे असा आग्रह धरत होते, आज जर आपण बघितले खाजगीकरणाच्या नावाखाली शिक्षणाचा बाजार करून सर्वसामान्य लोकांना शिक्षण मिळणार नाही अशी व्यवस्था या ठिकाणी निर्माण केलेली आहे. राजर्षी शाहू महाराज स्पष्ट बोलत होते. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या मुद्यांविषयी राजर्षी शाहू महाराज यांचे मत होते की, ब्रिटिशांकडून आपण स्वराज्य घेऊ, परंतु स्वराज्य घेण्याच्या व ते टिकवण्याच्या लायक आम्ही आहोत का ? हजारो वर्षांपासून ज्या लोकांनी धर्म, अर्थ सत्ता स्वतःकडे ठेवली तेच अल्पसंख्यांक लोक स्वतंत्र भारत स्वतःच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि जर या अल्पसंख्यांक लोकांनी भारत देश स्वतःच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तर बहुजन समाजातील अडचणी तशाच राहून पुन्हा पेशवाई येण्यास उशीर लागणार नाही. असे वक्तव्य राजर्षी शाहू महाराजांनी केलेले होते. आणि आज पुन्हा तीच परिस्थिती आल्याचे दिसत आहे. याची साधे उदाहरण म्हणजेच सत्तेतील एका महिलेचा वादग्रस्त व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला म्हणून, तरुणांना अटक केली. परंतु दुसरीकडे देशासाठी खेळणाऱ्या महिला, देशाला सुवर्णपदक मिळवून देऊन, देशाच्या जगामध्ये सन्मान करणाऱ्या महिला, जेव्हा सत्ताधारी खासदाराने लैंगिक शोषण केले यासाठी एफ आय आर करतात, आंदोलन करतात, तर बलात्काराचे



आरोप असलेल्या खासदाराला सोडून ज्यांनी देशाचे नाव रोशन केले न्यायासाठी आंदोलन करता आहेत त्यांनाच पोलीस पकडून, आंदोलन दाबण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणजे धर्माच्या व सत्तेच्या नावाखाली बलात्कारी लोकांचे संरक्षण व देशाचा सन्मान करणाऱ्या महिलांचे शोषण हीच नीती या ठिकाणी सुरू आहे. या ठिकाणी न्यायाची अपेक्षा पूर्ण झालेली आहे. सत्ताधारी पक्षाच्या जवळची व्यक्ती ज्यांनी महत्त्वपूर्ण पद भूषवले होते अशी व्यक्ती 44 सैनिकांच्या मृत्यूला जबाबदार प्रधानमंत्री आहेत, असे सांगतोय त्यावेळेस प्रधानमंत्री यांची चौकशी होण्या अपेक्षित असताना ज्यांनी प्रधानमंत्री दोषी आहे असे सांगितले त्याची चौकशी केली जातेय. म्हणजेच या ठिकाणी न्याय हा शिल्लक राहीलाच नाही. राजर्षी शाहू महाराज हे न्यायिक राजे होते. ते जात, धर्म बघून नव्हे तर गुन्हा बघून शिक्षा करायचे. परंतु आज त्यांच्याच राज्यामध्ये अशी अवस्था बघून मनाला दुःख होते. स्वतःला हिंदू समजणारे लोक, हिंदू धर्म फक्त राजकीय लोकांकडून समजून घेतात. राजकीय लोक स्वतःच्या फायद्यासाठी चुकीचा धर्म सांगून, लोकांना गुलाम बनवतात. परंतु कधीही लोकांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज वाचले नाहीत. व त्यांचे कार्य समजून घेतले नाहीत. आणि म्हणून आजही अनेक लोकांना छत्रपती शाहू महाराज हे हिंदूंचे आहेत हेच माहिती नाहीत. स्वतःला हिंदू समजणारे लोकांच्या घरामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे फोटो, पुस्तके, विचार काहीही नाही. मग हिंदू धर्मातील परिवर्तन कारी महापुरुषांचे विचार पुस्तके जर घरामध्ये नाहीत, तर मग घरामध्ये नेमकं आहे तरी काय ? शाहू महाराजांनी सांगितले होते जोपर्यंत आपण ब्राह्मणी व्यवस्था नाकारणार नाही तोपर्यंत आपला विकास होणार नाही. आज स्वतःला हिंदू समजणाऱ्या लोकांनी हिंदूंचे महापुरुष नाकारले, परंतु विषमतावादी जातीवादी वर्णवादी ब्राह्मणांची व्यवस्था आजही कायम आहे. म्हणून हिंदू लोकांना अजूनही महापुरुष समजलेले नाहीत. आणि याचाच परिणाम ते जातीभेद, विषमता, पाखंड भोंदूगिरीच्या जाळ्यामध्ये अडकलेले आहेत. आणि शिक्षणामध्ये पाहिजे तसे अस्तित्व निर्माण करू शकले नाही. शिक्षण म्हणजे केवळ अ ब क ड वाचता येणे म्हणजे शिक्षण नाही तर, वाचलेले काय आहे ते समजणे व त्याची शहानिशा करणे म्हणजे शिक्षण होय. जे शिक्षण हिंदू असलेल्या महात्मा फुले, हिंदू असलेल्या राजश्री शाहू महाराज यांना अपेक्षित होते. शाहू महाराजांच्या जीवनाला व कार्याला एका लेखांमध्ये एका पुस्तकांमध्ये बंद करणे शक्य नाही. तरीही त्यांच्यावरती प्रबोधन करणे हे क्रमप्राप्त ठरते. म्हणून होईल त्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज, समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करून राजर्षी शाहू महाराजांचे विचार समाजामध्ये रुजवले तरच शाहू महाराजांना खरी आदरांजली ठरेल. स्वतःला हिंदू समाजणाऱ्यांनी एकदा तरी राजर्षी शाहू महाराज वाचावीत. कारण ते हिंदूंचे राजे होते. परंतु सत्तेची पोळी भाजणाऱ्या लोकांनी राजश्री शाहू महाराज हे हिंदूंचे राजे होते, व त्यांचे कार्य हे विषमतावादी ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरोधात होते याची माहिती लोकांना होऊ दिली नाही. अर्थात सर्वच हिंदु आज अज्ञानात आहेत असे मुळीच नाही. अनेक लोक वैचारिक परिपक्व होऊन पुरोगामी विचारधारेचा स्विकार करून महापुरुषांच्या विचाराचे प्रबोधन करत आहेत. एक राजा कल्याणकारी संकल्पना राबवून अनेक शाळा, अनेक वस्तीगृह बांधून, सर्वांना आरक्षण देऊ शकतात, तर आज अनेक हिंदुचे प्रतिनिधी असताना, हिंदूंना न्याय का मिळू शकत नाही ? हिंदूना जर खरी सत्ता मिळवायची असेल तर हिंदूंनी राजश्री शाहू महाराज समजून घेऊन त्या प्रमाणात समाज व्यवस्था निर्माण होण्यासाठी आपल्या नेत्यांना प्रश्न विचारले तरच राजश्री शाहू महाराजांचे कार्य आपल्याला समजले हे साध्य होईल. व हेच त्यांना वैचारिक मानवंदना ठरेल.

# आपले संविधान कधी आणि कसे तयार झाले ?




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी 'ब्रिटिश' सरकारबरोबर दीर्घकाळ 'लढा' झाला आणि त्यांच्या बरोबर वाटाघाटींचे सत्रही सुरू राहीले. त्याच्याच एका टप्प्यावर 'ब्रिटिश सरकारने' पाठविलेल्या 'कॅबिनेट मिशनने' भारतात 'घटनात्मक राज्यपद्धती' आणण्यासाठी 'संविधानसभा' निवडण्याचा निर्णय घेतला. संविधान सभा:- आतापर्यंतच्या ब्रिटिशांनी भारतासंदर्भात पास केलेले विविध 'कायदे' आणि त्यांच्या अंमलबजावणीमुळे भारतामध्ये 'लोकशाहीची मुल्ये' अधिक चांगल्या प्रकारे रुजली होती. असे म्हटले जाते की, भारतामध्ये 'आधुनिकता' ही ब्रिटिश घेऊन आले आणि कालांतराने त्याचा परिणाम म्हणजे भारतात निर्माण झालेले 'आधुनिक संविधान'.**

भारत आता स्वतःचे 'संविधान' बनवून सक्षमपणे ते राबवू शकते, असा निर्धार भारतीय जनतेत निर्माण झालेला होता. आणि म्हणूनच 'भारताचे संविधान' भारतातील लोकांनीच बनवावे, यासाठी एक 'संविधान सभा' असावी, अशी सर्वात अगोदर 'एम्. एन्. राव' यांनी १९३४ मध्ये मागणी केली. त्यांच्यानंतर १९३५ मध्ये 'सी. राजगोपालचारी' यांनी देखील या मागणीचा पुनरुच्चार केला. भारतीयांच्या मागणीचा विचार करून इंग्रजांनी पहिल्यांदा 'ऑगस्ट प्रस्तावा'मध्ये १९४० साली भारताच्या संविधान निर्मितीसाठी 'संविधानसभा' बनविण्यात येईल, असा उल्लेख केला. त्यानंतर १९४२ मध्ये आलेल्या 'क्रिप्स मिशन' मध्ये देखील संविधानसभा बनविण्यासंदर्भात आश्वासन देण्यात आले होते. परंतु ती कधी आणि कशी बनवली जाईल, या संदर्भात काहीही नियोजन त्यात नव्हते. या संदर्भातले संपूर्ण नियोजन पहिल्यांदा आले, ते १९४६ मध्ये आलेल्या 'कॅबिनेट मिशन' मध्ये. कॅबिनेट मिशनच्या शिफारसीनुसार संविधान सभेसाठी संपूर्ण भारतातून '३८९ सदस्य' निवडले जाणार होते. परंतु त्यावेळी पूर्ण भारत एक सारखा नव्हता. काही ठिकाणी 'ब्रिटिश प्रांत' होते, तर काही ठिकाणी 'संस्थानिक' होते. तर काही ठिकाण हे 'कमिशनर प्लेसेस' म्हणून गणले




भाग - २

जात. त्यामुळे '२९२ सदस्य' हे ब्रिटिश प्रांतातून निवडून येतील, '९३ सदस्य' हे 'संस्थानिकांचे नामनिर्देशित प्रतिनिधी' असतील, तर '४ सदस्य' हे 'कमिशनरी प्लेसेस' मधून घेण्यात येतील, अशी तरतूद कॅबिनेट मिशनमध्ये होती. ज्याप्रमाणे हे सदस्य निवडीसंदर्भात कॅबिनेट मिशनने राज्यांचे वर्गीकरण केले होते, त्यावरून हे स्पष्ट दिसत होते की, त्यांनी एक प्रकारे देशाच्या विभाजनाला अप्रत्यक्षपणे मान्य करून घेतले होते. '६ डिसेंबर १९४६' रोजी 'फ्रेंच मॉडेल' ( म्हणजेच फ्रेंच संविधानसभा ज्याप्रमाणे स्थापन झाली होती ) प्रमाणे आपली भारतीय 'संविधान सभा' अस्तित्वात आली. त्यानंतर ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक 'नवी दिल्ली' येथील 'कॉन्स्टिट्युशनल हॉल' मध्ये ( सध्याचा 'सेंट्रल हॉल ऑफ पार्लमेंट हाऊस' ) येथे झाली. या पहिल्या बैठकीला 'जे. पी. कृपलानी' यांनी सर्वप्रथम 'संबोधित' केले. या बैठकीत सर्वात जेष्ठ असल्याने 'सच्चिदानंद सिन्हा' यांना 'हंगामी अध्यक्ष' म्हणून निवडण्यात आले. ११ डिसेंबर १९४६ च्या संविधान सभेच्या बैठकीत सभेचे अध्यक्ष म्हणून 'डॉ. राजेंद्र प्रसाद' तर उपाध्यक्ष म्हणून 'एच्.सी. मुखर्जी' यांची निवड करण्यात आली. 'बी.एन्. राव' यांना संविधान सभेचे 'घटनात्मक सल्लागार' म्हणून निवडण्यात आली.

# बालकवीच्या कवितेतील सोज्वळ-निर्मळ स्त्री



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**हिरवे हिरवेगार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे; त्या सुंदर मखमालीवरती, फुलराणी ही खेळत होती. गोड निळ्या वातावरणात, अव्याज-मने होती डोलत; प्रणयचंचला त्या भ्रूलीला, अवगत नव्हत्या कुमारिकेला, आईच्या मांडीवर बसुनी, झोके घ्यावे, गावी गाणी; याहुनि ठावे काय तियेला, साध्या भोळ्या फुलराणीला ? निरागस अल्लड बालिकेने मनाच्या अंगणात खेळ खेळावेत एक दिवस अचानक आई-वडिलांना आपली कन्या तारुण्याचा उंबरठा गाठून लग्नायोग्य उपवर झाल्याची जाणीव व्हावी, अशा भावनेमधून निसर्गाच्या एकेका पैलूचे निरीक्षण करून बालकवीच्या कवितेमधील अल्लड मालिकेच्या रूपात फुलराणी लग्न सोहळ्यातील वागदत्त वधू च्या स्त्री रूपात उभे राहून वाचकाला भुरळ घालते.**

त्यानंतर रविकर म्हणजेच रविकिरण असल्यापासून अगदी लग्न सोहळा पर्यंत स्त्रीमनाची स्पंदनात उपवर मुलीचे भावविश्व कवितेमधून उभे केले आहे ते त्र्यंबक बापूजी ठोंबरे म्हणजेच बालकवी यांनी,बालकवीचा जन्म धरणगाव येथे 13 ऑगस्ट 1890 रोजी झाला. आता ही फुलराणी म्हणजे खरोखरच एखादी लग्नोत्सुक कुमारिका आहे आणि तिच्या लग्नाचा सोहळा कवीने शब्दाचा चित्रित केला आहे किंवा नैसर्गिक उर्मीने कळीचे फूल होणे या घटनेला कवीने उपवर तरुणीच्या लग्नाची प्रतिमा देऊन वर्णन केले आहे याचा शोध वाचकांनी आपापल्या परीने घेतलेला जास्त योग्य, मात्र गाउ लागले मंगलपाठ, सृष्टीचे गाणारे भाट, अशा शब्दांमधून एखाद्या अल्लड निरागस पालिकेच्या लग्नात की अनुभूती घेतल्याशिवाय राहात नाही इतकी काव्य सजीवता बालकवींच्या कवितांमध्ये आढळून येते. मराठी कवितेमधील एक विलोभनीय काव्य दालन म्हणजे बालकवींची कविता, त्र्यंबक बापूजी ठोंबरे म्हणजेच बालकवी एक निर्मळ झऱ्याप्रमाणे खळाळती कविता म्हणजे बालकवींची कविता होय. फुलराणी सह जीवनातल्या अनेक टप्प्यांवर औदुंबर, पारवा, चाफेकळी, माझे गाणे, आनंदी आनंद गडे, श्रावणमासी या कविता साथसोबत करत असतात औदुंबर, पारवा, आनंदी आनंद गडे अशा एकापेक्षा एक अजरामर कवितांची नितांत सुंदर पर्वणी म्हणजे बालकवींची कविता होय. श्रावणमासी हर्षमानसी या कवितेमधून श्रावण महिन्याचे वर्णन करतानाही बाल कवीच्या लेखणीतून निसर्ग झिरपत राहतो वेगवेगळ्या नैसर्गिक प्रतीके आणि प्रतिमा यांच्या वापरामुळे विलोभनीय ठरणारी कविता शेवटच्या कडव्या मुळे होत जाऊन अतिशय देखणी आणि रमणीय होते ती त्यातील स्त्रीच्या सोज्वळ दर्शनामुळे, या कडव्यामध्ये बालकवी म्हणतात, सुंदर परडी घेऊनि हाती पुरपकंठी शुद्धमती, सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले-पत्री खुडती. देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात, वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत स्त्रियांच्या देव दर्शनाला जाण्याच्या मोहक आणि उत्साही वर्णन कवीने आपल्या शब्दातून केले आहे, हातामध्ये फुले वेचण्याची परडी घेऊन देवाला वाहण्यासाठी आणि केसात मारण्यासाठी फुले वेचणाऱ्या स्त्रियांचे जिवंत अनुभव देणारे चित्र बालकवींनी आपल्या या कवितेमधून उभे केले आहे. बालकवींच्या या शैलीमुळे त्यांचे निरीक्षण किती सूक्ष्म होते त्याचबरोबर श्रावण महिन्यामधील देवादिकांच्या आणि सणावाराच्या दिवसांमध्ये स्त्रियांमुळे समाजामध्ये कशी प्रसन्नता नांदते ? याचेही स्मरण त्यांनी करून दिले आहे असे जाणवते. गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी! काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ? तू तर चाफेकळी कवितेमधून बालकवींनी यमुनेच्या काठावर हरवलेले काहीतरी शोधणारी गोपिका आणि यमुनेच्या काठावर निसर्ग यांचा एक सुरेख मेळ घालून कविता लिहिण्याचा प्रयत्न केला मात्र का कुणास ठाऊक ? पण ही कविता अपूर्ण अवस्थेत राहिली. ती वनबाला म्हणे नृपाळा ;सुंदर मी हो खरी,-- या ओळींमधून आपल्या सौंदर्याचे केलेले वर्णन किती यथार्थ आहे ते राजाला सांगून मी सुंदर आहेच असे निक्षून सांगणारे स्त्री बालकवींनी या कवितेमधून उभी केली असली तरी तिचे पुढे काय झाले ? त्याचा सुगावा लागलेला नाही. मात्र फुलराणी - बालकवींच्या निवडक कविताया मध्ये या कवितेसंबंधी संपादकीय मध्ये कुसुमाग्रज यांनी बालकवींची कविता;अपूर्ण असली तरी ही अपूर्णता तिच्या रसास्वादाला बाधक होत नाही. कोठल्यातरी संकल्पित कथाकाव्याचा हा छोटा तुकडा आहे असे वाटते; असे मत मांडले आहे. नवनिर्मिती ही माती आणि स्त्री या दोघांनाही लाभलेली एक देणगी आहे. मातृत्व म्हणजे संपूर्ण स्त्रीत्व अशा धारणेतून समाज



स्त्रीयांकडे पाहत असतो, आपल्या कवितेमधून फुलाला सृष्टी चे तान्हेबाळ अशी उपमा देऊन सृष्टीला स्त्री रूपात शब्दबद्ध करून कवीने स्त्रीत्व आणि मातृत्व या दोन्हींचाही गौरव केला आहे. पुढे बाळाचे कौतुक पाहू कौतुकाने असणारी आई म्हणजेच मधु वंदना सृष्टी होय. हे फुल या उडत्या स्वर्गातील माणिक हे बाई झुलते आहे ! हे तान्हे सृष्टीचे गोजिरवाणे कौतुकली मधुवंदना हसली वदली- स्वच्छंदी फूलपांखरा ! आनंदी माधविका पाठविते तुज या लोका अशा शब्दांमध्ये निसर्गातील लहान मोठ्या घटकांना स्त्री रूपामध्ये प्रतिकात्मक आकार देत बालकवींची निसर्ग कविता बहरत गेली आहे. अप्सरांचे गाणे हीसुद्धा अशीच एक निसर्ग वर्णन करणारी कविता बालकवीच्या प्रतिभाशक्तीची ओळख करून देणारी आहे. अप्सरा म्हणजे अतिशय सुंदर , मोहक अशी स्त्री होय... या अप्सरेचे गाणे म्हणजे एक वर्णन आहे. सांभाळून उतरा बाई वेळ गडे! स्नानाची ही... अशा ओळींमधून नाजूक अप्सरांच्या पुष्करणीतील जलक्रीडेची आठवण व्हावी इतक्या तरलतेने ही कविता सुरू होते, मग स्नान करणाऱ्या यौवना आणि फुलं झाडावरील कळ्या फुलांवर पडणारा पाऊस यांचे व्यामिश्र वर्णन बालकवींच्या शब्दातुन रसिकांना ओलेचिंब करीत राहते. जलकणिका त्यांच्या पडती! थंडगार अंगावरती, स्नान करू झडकरी बाई पूनीतही गंगामाई ... आंघोळ केल्यावर गंगास्नानाची पावन अनुभूती घेणाऱ्या ललना प्रमाणे पाऊस येऊन गेल्यावर वृक्षवेलीही पवित्र आणि ताजेतवाने होऊन बसतात अशा पद्धतीने एकमेकात ही प्रतीके आणि प्रतिमा गुंतलेली दिसतात. त्यानंतर रवी किरणांचे नवरंगी रम्य झगे घालून बसणारी, नवतरुण स्त्री की झाडावर शहारून बसणारी कलिका अशा विचारात वाचक गुंगून जातो. तारकांचे गाणे, संध्या रजनी, बहिणीकरिता गाणे..अश्या काही कवितांमधून बालकवींच्या कवितेतील स्त्रीचे रूप पाहायला मिळते. वयाच्या तेराव्या वर्षी पहिली कविता लिहिणारा हा बालकवी शंभर वर्षांपूर्वी फक्त अठ्ठावीस वर्षांचा असताना खानदेशातल्या रखरखत्या उन्हाळ्यात रूळात पाय अडकून मालगाडीच्या अपघातात यावा आणि 5 मे 1918 रोजी त्याचा मृत्यू व्हावा, ही फार मोठी शोकांतिका आहे. 1907 च्या मराठी साहित्यसंमेलनात अध्यक्षांनी त्यांना बालकवी ही पदवी द्यावी कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी ठोंबऱ्यांनाबालकवीही पदवी दिली हीदेखील एक काव्यमय घटना होय. ह्या बालकवीने त्या पदवीवर अवघ्या दहा वर्षांत साज चढवला, निर्झरास या कवितेमध्ये खळखळ वाहणाऱ्या झऱ्याचे त्यांनी जे वर्णन केलेले आहे ते त्यांच्या जीवनासाठी खऱ्या अर्थाने लागू होते, बालकवीची कविता खळखळणाऱ्या निर्मळ झऱ्याप्रमाणे प्रवाही होती. निर्झरास या कवितेत ते म्हणतात त्याप्रमाणे, दिव्य तयाच्या वेणुपरी, तूहि निर्झरा! नवलपरी गाउनि गे झुळझुळ गान, विश्वाचे हरिसी भान! गोपि तुझ्या हिरव्या वेली, रास खेळती भवताली! तुझ्या वेणुचा सूर तरी, चराचरावर राज्य करी... हिरव्या वेलींना गोपीची उपमा देऊन निसर्गातील ही रासक्रीडा तन्मयतेने मांडणाऱ्या ह्या बालकवीच्या

कवितेमधील स्त्रिया जणू यमुनेकाठी खेळणाऱ्या कृष्णसख्या आहेत असे वाटते. कितेक मानव झटती, करिती हाडाचेही पाणी अनंत वसुधा आजवरी हो परी मोजली कोणी!म्हणोत कोणी;आम्ही गणिला हा ग्रह- हा तारा, परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा ? अशी सृष्टीच्या विश्वरूपदर्शनाने स्तिमित होणारी कविताही बालकवींनी लिहिली तर कधी औदुंबर सारख्या गूढार्थ तून तपस्वी जीवन व्यक्त केले, पारवा, उदासीनता अशा कवितांमधून भग्न मनाचे प्रतिबिंबही त्यांनी रेखाटले, त्यांच्या बहुतांश कवितांमध्ये सृष्टीचे वर्णन करताना स्त्री विषयक प्रतीके, प्रतिमा वापरली गेली आहेत. मात्र त्यांच्या कवितेत स्त्री कोठेही आक्रस्ताळेपणे समोर येत नाही. कोणताही अन्याय अत्याचार झाल्याचे सांगत नाही. कदाचित 5 मे 1918 रोजी रेल्वेखाली मृत्यू झाल्याने कवीला लाभलेले अल्पायुष्य ह्यामुळे कवीला स्त्री जीवनाची ती बाजू पाहता आली नसावी. मात्र त्यांच्या कवितेमध्ये स्थिती लावण्यवती, मोहक, प्रणयोत्सुक पण सोज्वळ आणि सुशील0 अशी आहे हे आपल्या लक्षात येते. अगदी त्यांच्याच शब्दशैलीत सांगायचे तर अलवार कोवळे अंग, जशि काय फुलांची मूस इतकी नितळ आणि नाजूक अशी त्यांची कविता आणि त्यांच्या कवितेत स्त्री वर्णने होती. बालकवींच्या ह्या निस्सीम आणि नाद, लय, रुपगंध जागृत करणाऱ्या काव्यप्रतिभेला मनापासून सलाम!

**किरण शिवहर डोंगरदिवे, वॉर्ड न 5, समता नगर, मेहकर,**
**ता मेहकर, जि बुलढाणा पिन 443301**
**मोबा 7588565576**



# पराक्रमी सरदार कान्होजी जेधे

आधुनिक केसरी

तेव्हा शहाजीराजानी त्यांना अट घातली, की कान्होजी तुम्ही आता माझ्या शिवबाची चाकरी करावी. स्वराज्याला तुमची आता खरी गरज आहे. तुमच्यासारख्या शूर आणि लढवय्ये लोकांनी त्यांना स्वराज्यकार्यात मदत करावी. तुम्ही बारा मावळातील आपल्या देशमुखांना व देशपांडे यांना जमा करुन स्वराज्याची सेवा करावी, अशी त्यांना गळ घातली. पुढे त्यांनी आदिलशाही व निजामशाही विरुद्ध लढताना महाराजांना बऱ्याच लढाईत मदत केली. 16 जून 1659 रोजी कान्होजी जेधे यांना आदिलशाहने पत्र पाठवून शिवाजीराजांना शासन करण्यास सांगितले त्यात तो म्हणतो शिवाजीने अविचाराने शाही मुलुख व कोकणातील मुसलमानांना त्रास देऊन, लुट करून पातशाही मुलखातील, कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याचा पराभव करून निर्मळ फडशा पाडावा, असे त्यांनी फर्मान काढले होते. यावेळी कान्होजी मोठ्या अडचणीत सापडले. ते महाराजांना येऊन भेटले व झालेला सर्व प्रकार त्यांनी महाराजांच्या कानावर घातला. महाराज त्यांना बोलले, तुम्ही तुमचे वतन सांभाळा,हे बोलणें त्यांच्या जिव्हारी लागले.ते म्हणाले "राज तुमचं कार्य मोठं,देव,देश,आणि धर्माचं,त्यासमोर,ह्या टीचभर वतनाच, आणि आदिशाहीच्या धनदौलतीच, आम्हास काय मोल, त्यांनी लगेच तुळसीपत्र हातावर घेऊन, महाराजांच्या पायावर पाणी सोडले व ते म्हणाले राज आजपासून वतनावर मी पाणी सोडतो, पण या स्वराज्याला व राजाना कुठलीही तसूभरही इजा होऊ दिली जाणार नाही.

हे ऐकून महाराज गहिवरले,व म्हणाले कान्होजीराव तुमच्या सारख्या निधड्या छातीच्या, व बारामावळातील देशमुकांचा, जर आम्हांस बळ असेल तर, अफजलखानच काय या सर्व जुलमी पातशाह्या आम्ही गर्दीस मिळवू कान्होजीराव. पुढे कान्होजी आपले पुत्र व आपला सैन्याचा लवाजमा मिळवून महाराजास सामील झाले. बारा मावळाशी मसलती करून त्यांनी सर्वांना स्वराज्य कार्यात जोडले.

पुढे अफजलखान रूपाने स्वराज्यावर, फार मोठे संकट आले असतना ते महाराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी व त्यांच्या बांदल देशमुखांनी प्रतापगडाच्या युद्धात फार मोठा पराक्रम केला.सय्यद बंडाचा काळ ठरलेला जीवा महाले व अफजलखानाचे मुंडके छाटून आणणारा संभाजी कावजी हे त्यांचाच विश्वासातील माणसे.या पराक्रमामुळे महाराजांनी त्यांना तलवारीच्या पहिल्या पातीचा मान दिला.पुढे पन्हाळगडाच्या मोहिमेत महाराजांना सोडवण्यासाठी त्यांच्या बांदल देशमुखानी जिवाचे रान केले.

तिथे तीनशे बांदल देखमुख महाराजांच्या सुटकेसाठी धारातीर्थी पडले. यावेळी मोठ्या मनाने त्यांनी महाराज, केवळ बांधलांच्या पराक्रमामुळे आज तुमचे पाय आम्हाला दिसत आहेत. तेव्हा आम्ही आनंदाने पहिल्या पानाचा मान सोडतो. तो आम्ही बांधलाना देत आहोत. कान्होजीने आपला मान कृष्णाजी यास देऊन आपल्यात असणारा निस्वार्थपणा दाखवून दिला, त्याचा उल्लेख शाहिरांनी केलेला आहे. //जैसे श्रीरामास, हनुमंत/तैसे शिवाजीस जेधे //अशा या थोर स्वामिनिष्ठ सेनानीचा व स्वराज्य रक्षकांनचा, 1960 झाली मृत्यू झाला त्यांचा हा पराक्रम स्वराज् व इतिहास कधीही विसरू शकणार नाही.

# मुलांचे मोबाईलचे व्यसन चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मोबाईल फोन आता लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. विशेषत: स्मार्टफोन हा नित्यक्रमाचा भाग बनला आहे. कारण मोबाइल मुळे मिळणाऱ्या सुविधा आपण रोज वापरतो. स्मार्ट फोन केवळ फोनवर बोलण्यापुरते मर्यादित नाही, तर दररोज बातम्यांचे अपडेट तपासण्यासाठी, सामन्यांचे स्कोअर किंवा थेट सामने पाहण्यासाठी, चित्रपट पाहण्यासाठी किंवा व्हिडिओ कॉलिंगसाठी वापरले जात आहे. जितक्या जास्त सुविधा मिळतात, तितक्याच समस्या वाढत आहेत आणि हे सर्वात जास्त तरुण मुलांमध्ये दिसून येत आहे, जिथे फोन एक व्यसन बनत आहे. लहान मुलांच्या चांगल्या विकासासाठी, त्यांनी खेळासारख्या शारीरिक हालचाली करणे खूप महत्वाचे आहे.**

मात्र, आजकाल बहुतांश मुलं मोबाइल फोनच्या व्यसनाला बळी पडली असून, त्याचा परिणाम मुलांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीवरही होत आहे.. स्मार्टफोनचे व्यसन हे वडिलधाऱ्यांपासून लहान मुलांपर्यंत सारखेच आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम प्रत्येक वयोगटासह लहान मुलांवर वर होत आहे, परंतु त्याचा मुलांवर होणाऱ्या परिणामाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कारण लहान वयातच मुलांच्या मानसिक आणि शारीरिक विकासाला वेळ लागतो आणि कोणतीही सवय किंवा छंद वळत नाही. व्यसनात गंभीर परिणाम होतात. लहान मुलांच्या हातात सहज उपलब्ध असलेल्या स्मार्टफोनचे अनेक तोटे आहेत-

राग आणि चिडचिड वाढणे- लहान वयात राग येणे किंवा चिडचिड होणे सामान्य आहे कारण त्या वयात गोष्टी समजून घेणे आणि त्यांचे विश्लेषण करणे सोपे नसते. स्मार्टफोनच्या व्यसनामुळे हे प्रमाण वाढत आहे. मुलाला फोन वापरण्यापासून रोखले तर त्यांच्यामध्ये राग येण्याची प्रवृत्ती वाढत आहे. यासोबतच यामुळे मुलांना पूर्वीपेक्षा जास्त चिडचिड होत आहे. उदाहरणार्थ, नेटवर्क नसताना किंवा फोनची बॅटरी संपल्यावर हा प्रकार अनेकदा लहान मुलांमध्ये दिसतो. फोनवरचे वाढते अवलंबित्व- तंत्रज्ञानावरील मानवाचे अवलंबित्व सातत्याने वाढत आहे. स्मार्टफोनच्या बाबतीतही तेच आहे. केवळ मनोरंजनासाठीच नाही, तर अभ्यास किंवा ऑनलाइन शॉपिंग किंवा इतर कोणत्याही कामाशी निगडित गोष्टींवरही सामान्य पद्धतींऐवजी स्मार्टफोनच्या वापरामुळे अवलंबित्व वाढत आहे आणि काही वेळा फोन नसतानाही ते अवघड होऊन बसते.

खेळात रस नसणे- घराबाहेर पडणे आणि पार्कमध्ये मित्रांसोबत क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन किंवा इतर अनेक प्रकारचे खेळ खेळणे हा बालपणातील महत्त्वाचा भाग आहे. यामुळे मुलांचा शारीरिक विकास तर होतोच, शिवाय त्यांचे वर्तन आणि मानसिकताही सुधारते, मात्र मोबाईल फोनवर वेळ घालवल्यामुळे मुलं महत्त्वाच्या गोष्टीपासून दूर जात आहेत. मनोरंजनासाठी फोनमधील गेम्सपासून ते चित्रपट आणि व्हिडिओंपर्यंत मात्र शारीरिक आणि मानसिक विकासात अडथळा निर्माण होत आहे.

घरातील सदस्यांपासून गुपचूप वापरणे- लहानपणी अनेक मुलं घरापासून लपून छोटी-छोटी कामे करतात, पण त्यातील बहुतांश गोष्टी अशाच असतात, मात्र स्मार्टफोनच्या जमान्यात हे प्रमाण अधिकच वाढले आहे. मग रात्री ठरलेल्या वेळेनंतरही



फोन वापरणे असो किंवा घरापासून लपवून फोन शाळेत नेणे असो. गैरकृत्यांचा वाढता कल- हा सर्वात मोठा पैलू आहे, ज्यामुळे पालकांना त्रास होत आहे. किरकोळ गैरकृत्यांकडून मोठ्या गुन्ह्यांकडे जाण्याचा मुलांचा कल वाढला आहे. अलीकडेच पंजाबमध्ये अशी दोन प्रकरणे समोर आली होती, ज्यात १६ आणि १७ वर्षांच्या मुलांनी आपल्या कुटुंबीयांपासून लपून पब मोबाईल गेममध्ये लाखो रुपये खर्च केले होते. याशिवाय २-३ वर्षांपूर्वी ब्लू व्हेल गेममुळे अनेक मुलांनी आत्महत्या केल्या होत्या, हे सर्वात धक्कादायक प्रकरण होते.

सायबर क्राईमचे बळी- आधुनिक युगात सायबर क्राइम हे सर्वात मोठे आव्हान ठरत आहे आणि लहान मुलांच्या बाबतीत ते अधिक धोकादायक आहे, कारण असे गुन्हेगार स्मार्टफोनमध्ये घुसून महत्त्वाची माहिती चोरू शकतात, ज्यामुळे मुलांच्या आयुष्याला आणि भविष्याला हानी पोहोचू शकते. आहे.

याशिवाय अशा अनेक समस्या आहेत, ज्या स्मार्टफोनमुळे मुलांमध्ये दिसून येत आहेत. मग त्याचा डोळ्यांवर होणारा परिणाम असो किंवा लक्षात ठेवण्याच्या आणि मोजण्याच्या क्षमतेवरही मोठा परिणाम झाला आहे, जो मुलांच्या भविष्यासाठी घातक ठरू शकतो. मुलांना फोनपासून दूर ठेवण्यासाठी पालकांना स्वतःला मोबाइलपासून दूर ठेवावे लागेल. खरं तर, मुले सर्व चांगल्या वाईट सवयी त्यांच्या पालकांकडून शिकतात. अशा परिस्थितीत लहान मुलांसमोर तरी मोबाईलचा वापर करणे टाळा. सहसा मुले गेम खेळण्यासाठी फोन वापरतात. अशा परिस्थितीत मुलांना खेळ खेळताना पाहून पालक लगेच त्यांना फटकारतात. मात्र, अशा स्थितीत गेम खेळताना मुलांना मारणे टाळा आणि फोन बाजूला ठेवल्यानंतर मुलांना प्रेमाने बसवून समजावून सांगण्याचा प्रयत्न करा.मुलाला स्मार्ट फोनचे तोटे सांगा. फोनच्या व्यसनाला बळी पडलेली बहुतेक मुले मोबाईलच्या तोटेबद्दल अनभिज्ञ राहतात. अशा परिस्थितीत फोनचा अतिवापर केल्याने होणारे दुष्परिणाम मुलांना सांगा. तसेच त्यांना समजावून सांगा की फोन वापरल्याने त्यांचे डोळे, त्वचा आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

# विविधांगी प्रहरांची गुंफण



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मराठी साहित्य समीक्षक, स्वतंत्र प्रतिभेचे कवी प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "कथाकाव्य हा एक प्रकारे संकीर्ण काव्यप्रकार ठरतो. कथेच्या मुख्य सूत्राने काव्याची अनेक अंगे गुंफलेली असतात. भावकवितेप्रमाणे त्यात कवीचा आणि कथेतील पात्रांचा उत्कट भावनाविष्कार अधूनमधून आढळतो. उत्कृष्ट कथालेखकाचे किंवा कादंबरीकाराचे कथाकथनाचे कौशल्य, त्यातील चित्तवेधकता व नाट्यपूर्णता हेही विशेष त्यात संभवतात.**

नाट्यकाव्यातील विविध पात्रांची मनोगतेही त्यातून परिणामकारकपणे व्यक्त होतात. केवळ वर्णनसौंदर्य, केवळ कल्पनासौंदर्य किंवा अलंकारसौंदर्य, केवळ सुंदर शब्दकळा, केवळ निसर्गवर्णन यांसारख्या घटकांनाही त्यात वाव असतो आणि हे विशेष पद्याच्या माध्यमातून प्रकट होत असल्याने त्यांना एक प्रकारचे काव्यानुकूल सौंदर्य प्राप्त होते.

सध्याच्या मुक्तछंद, यमक साधण्याच्या भाऊगर्दीत कथाकाव्य वाचावयास मिळत नाही. दीर्घकाव्य विपुल प्रमाणात उपलब्ध नाही. पण 'अभिरामप्रहर' या कवितासंग्रहाने ही परंपरा सुदृढ केली आहे. होय ! ज्येष्ठ कवयित्री भारती बिर्जे -डिग्गीकर यांचे 'अभिरामप्रहर' हा कवितासंग्रह वाचला आणि सकस , प्रगल्भ काव्याचा आस्वाद घेतल्याचे समाधान प्राप्त झाले. सृजनसंवाद प्रकाशनाने प्रकाशित केलेले 'अभिरामप्रहर' हे कथाकाव्य आहे. एका कथानकाच्या मूलतत्वावर संपूर्ण कथा काव्यरुपात आपल्यासमोर अवतरते. कथाबीज, घटनाक्रम, वातावरणनिर्मिती, काळ या कथेच्या घटकांसोबतच काव्यमय लय यात निर्माण होते आणि त्या काव्यसौंदर्यातून कथेचे सार उमगत जाते. कवयित्रीने त्या त्या परिस्थितीला साजेशी अशी शब्दयोजना केलेली आहे, की वाचताना काव्याचे भाषिक सौंदर्य दृष्टिस पडते. सोबतच आजुबाजुच्या सामाजिक वास्तवाची जाणीव होते.

'अभिरामप्रहर' या शीर्षकातून एक प्रकारे आत्मशोधाची व्याख्या अधोरेखित होते. या कथेची नायिका आहे 'देवी'. आई - बाबा , दोन भाऊ यांच्यासमवेत मुंबई या मायानगरीत राहणारी देवी, जन्मतः पायाने अधू आहे. ती स्वतः कवितेच्या माध्यमातून व्यक्त होते. देवीच्या अस्तित्वाची, मनातील कोलाहल, तिच्या स्वतःच्या मनाशी सुरु असलेले द्वंद्व या कथेचे सूत्र आहे. या कथाकाव्याची निवेदक 'ती'च्या माध्यमातून देवीची कहाणी उलगडत जाते. देवी लिहिते, या शब्दप्रयोजनातून देवीच्या संवेदना, तिच्या भावना कवितेच्या माध्यमातून कवयित्रीने व्यक्त केल्या आहेत.

देवीला रटाळ , एकाकी जीवन जगायचे नाही, तर जीवनाला अर्थ प्राप्त करून जगायचे आहे. एका अनपेक्षित घटनेमुळे स्वतःला दोषी मानणे, मनात अपराधीपणाची भावना घेऊन जगणाऱ्या देवीची व्यक्तिरेखा वाचकाला भावनिक करते तसेच विचारप्रवृत्तही करते. संवेदनशील असूनही आपल्या कुटुंबासाठी मन ख़ंबीर करून वाटचाल करणारी देवी अशी तिची विविध रुपं अनुभवायला मिळतात.

देवी जेथे नोकरी करते ते कार्यालय, तेथील सहकारी, मैत्रिणी, रोजच्या प्रवासात भेटणारी माणसं तसेच या महानगराचे विविध पदर या कथाकाव्यात विशद केले आहेत.

**'देवी देवी तुझं शहर ! पाहा उन्मन होऊन**
**विश्वरूप दर्शन देतं कोटी कोटी रूपं घेऊन'**

या ओळीतून हे जाणवते, की कथानक मुंबई महानगरात घडते आहे. त्यामुळे या महानगरातील एकूण जीवनशैली, साऱ्या विश्वाला सामावून घेण्याची क्षमता असणाऱ्या मुंबईचं दर्शन यात घडते. जेथे नकारात्मकतेचे चित्रही आहे आणि सकारात्मक ऊर्जाही आहे. विविधांगी जीवनदर्शन मुंबईच्या पदपथावर निदर्शनास येते. या कथाकाव्याला महानगरीय जाणीवेची व्यापक दृष्टी लाभली आहे.

**'मग लक्षात आलं की मागणं साधं नव्हतं**
**मनातली जागा शहरातल्या जागेइतकीच**
**मुश्किल मनातली रहदारी**

स्थानकातल्या गर्दीइतकीच सर्वव्यापी.

देवीच्या मनातील विवंचना, मनातील विस्फोट , तिच्या मनात सुरु असलेलं युद्ध हे विचारांचं युद्ध आहे. शहरातील गर्दीप्रमाणे मनातही विचारांची वर्दळ आहे. मनाचे व्यवहार कसे सांभाळू , हा प्रश्न तिला पडला आहे. या कथाकाव्यात घटनांची रचना उत्तमरित्या केली आहे, ज्यामुळे वाचक त्यात गुंतून जातो. वर्तमानातून निवेदक कधी भूतकाळात आपल्याला नेतो. हळूच पुन्हा वाचकाला पूर्वपदावर आणतो. वर्तमानातल्या स्थितीला भूतकाळातील जखमा कशा कारणीभूत ठरतात, याचा उहापोह यात केलेला आहे. वेगवेगळ्या मार्गावर देवीच्या आयुष्यात आलेल्या तरुण व्यक्तिरेखा, तिच्या प्रेमाची व्याख्या, अपेक्षा एकूणच तिचं जीवन निरस करण्यास कारणीभूत ठरतात का , याचं उत्तर शोधणं म्हणजेच आपल्या जीवनातील 'अभिराम' शोधणं आणि हा अभिराम ज्याला त्याला स्वतःच शोधायचा आहे. ही देवीच्या अस्तित्वाची लढाई आहे.




'अभिरामप्रहर' हा कवितासंग्रह जगण्याचा हेतू जाणून घेण्याची प्रेरणा देतं. 'मी' पणाचा प्रवास, त्यातून निर्माण होणारे विविध भावतरंग आणि कवयित्रीची प्रांजळ अभिव्यक्ती यांचा त्रिवेणी संगम म्हणजे हा कवितासंग्रह.

'अभिरामप्रहर' या कवितासंग्रहाला ज्येष्ठ कवयित्री, लेखिका प्रा. डॉ. प्रतिभा कणेकर यांनी यथार्थ प्रस्तावना लिहिली आहे. कवितासंग्रहाचे समर्पक मुखपृष्ठ प्रज्ञा हरणखेडकर यांनी साकारले आहे. आतील रेखाचित्रे आणि एकूणच संग्रहाच्या संपादनाची जबाबदारी गीतेश शिंदे यांनी उत्तमरित्या पार पाडली आहे. पुस्तकाची उत्कृष्ठ छपाई, उत्तम बांधणी यामुळे कवितासंग्रहाला वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे.

**( अभिरामप्रहर - कवितासंग्रह / कवयित्री : भारती बिर्जे - डिग्गीकर / प्रकाशक : सृजनसंवाद प्रकाशन / पृष्ठे : ७९ / मूल्य : २०० रुपये )**



# प्रेम म्हणजे प्रेम असते, तुमचे आमचे सेम असते..

आधुनिक केसरी

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो एकटा राहूच शकत नाही..जगण्याचा प्रश्न तर कोसो दूर.आपले शरीर मन व आत्मा यांनी बनलेले आहे.मनाचे मनाशी मिलन कधी होते...हे कोणीच स्पष्ट सांगू शकत नाही. कधी कोणाला कोण आवडेल काहीच सांगता येत नाही. निरपेक्ष प्रेम करणे म्हणजे तरी नेमके काय. तेथे प्रत्यक्ष भेटण्याचा संबंध येतच नाही. रूप,रंग, पैसा,नोकरी, घरदार, श्रीमंती, अंध, अपंग,बुटका, जाडा, बारीक, बहिरा.... अजून काय काय यात त्याचा काहीच संबंध येत नाही. प्रेम ही भावना अतिशय नाजूक आहे. तिचा मन सोडून इतर कोणत्याही गोष्टींशी काडीमात्राचांही संबंध नाही. प्रत्येक पदार्थ सूक्ष्म कणांचा बनलेला असतो.तसेच आपले शरीर ही नाना पेशींनी बनलेले आहे. त्यात मन व आत्मा विराजमान आहे म्हणून तो जिवंत आहे.आत्मा निघून जाईल तेव्हा त्याला काही किंमत राहत नाही.ते पार्थिव बनते..त्याला नष्ट करणे म्हणजे पुरणे, जाळणे हे अंतिम सत्य. जो पर्यंत आत्मा आहे तो पर्यंत मन ही जिवंत असते. मन हे चंचल पाखरू आहे.ते निरपेक्षपणे जेव्हा कोणाला आपले मनातून मानते तेव्हा ते उच्चतम पातळीवर जावून पोहचलेले असते. कधी त्या व्यक्तीला आमने सामने पाहण्याची बिल्कुल आवश्यकता नसते. कोणाच्या शब्दांवर कोणाच्या भाषेवर,कोणाच्या गाण्यावर,कोणाच्या बोलण्यावर,कोणाच्या हसण्यावर, कोणाच्या रागावर, कोणाच्या लिखाणावर, कोणाच्या स्पष्ट बोलण्यावर कधी कोणाला प्रेम होईल सांगता येत नाही. प्रेम हे कधीच बळजबरी होवू शकत नाही.ते लादून देणे किंवा घेणे खूप चुकीचे आहे खरं तर ते प्रेमच नसते. प्रेम हे नकळत घडते.हवचे अस्तित्व जसे आपल्याभोवती चौफेर आहे, तसेच प्रेमाचे ही. हवे शिवाय जगू शकतो का ? नाही ना ? मग, प्रेमाशिवाय तरी शक्य आहे का ? प्रेम म्हणजे जे आजकाल दाखवले जाते ते बिल्कुल नाही. जीवनात प्रत्येक जण कशांकशावर प्रेम करत असते. प्रेम करण्यासाठी मनुष्य च हवा असेही नाही ना ? प्रेम हे पुस्तकावर होवू शकते,भाषेवर होवू शकते, प्रेम हे गाण्यावर,सुरावर, अर्थावर, लयीवर, प्राण्यांवर,पक्ष्यांवर, आपल्या कामावर .... होवू शकते.

प्रेमाशिवाय जीवन अधुरे आहे. सुख दुःखाला हळुवार जपते ते प्रेम.कृष्णवेडी राधा आठवा.समजेल...प्रेम म्हणजे काय असते.... मिरा आठवा... अहो प्रेमाशिवाय प्रत्येक जीव अपूर्ण.छंद,आवड का जोपासतो.. आपण हे प्रेम जिवंत राहण्यासाठीच ना... खऱ्या अर्थी जीवन जगणे म्हणजे काय ? प्रेम हे प्रेम असते. ते कधी कोणावर होईल काहीच सांगू शकत नाही. ते मनाचे मनाशी मिलन असते. मन जुळली की झाले. त्याला प्रत्यक्ष भेटण्याची,पाहण्याची गरज नसते. ही भावनाच इतकी कोमल आहे की, ती शब्दात व्यक्त करणे महा कठीण. प्रेम हे फक्त जाणून घेणे महत्त्वाचे असते. त्यात मनाला प्रथम उच्च स्थान असते. बंधने असेल त्याला प्रेम म्हणताच येत नाही.

आजकाल प्रेमाच्या व्याख्या फार वेगळ्या झाल्या आहेत. त्याची व्याख्या ही होवूच शकत नाही..पण काही प्रेम वीरांनी तिला त्यात बंदिस्त केले.. तर काहींनी रुपावर,कोणी पैशावर ही प्रेम करू लागले आहे. अरेंज मॅरेज मध्ये ही खूप लग्न फसतात... लव मॅरेज मध्ये ही तसे घडते.प्रेम म्हणजे लग्न च करणे असे ही नाही ना. त्या व्यक्तीच्या स्वभाव वर, गुणांवर, सवयींवर, शब्दांवर,भाषेवर .... हे प्रेम होत असते. प्रेम ही निर्मळ, कोमल भावना आहे. ती निस्वार्थ असावी.मनाचा मनाशी संवाद घडला की जी ऊर्जा निर्माण होते ती अद्वितीय असते. प्रेम हे पाहून कधीच होत नसते...ते नकळत होते.

**सौ.प्रतिमा अरुण काळे**
**निगडी प्राधिकरण पुणे ,४४**

# तणावामध्ये पुन्हा एक दुसरा नवीन तणाव



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**तणाव मध्ये पुन्हा एक दुसरं तणाव या लेखाचा हा कसला विषय आहे कदाचित आपल्याला प्रश्न पडला असेल नाही .? साहाजिकच आहे. पण खास करून आजकाल नाहकच तणाव येण्यासारखी आजची परिस्थिती निर्माण झालेली आहे. हे सुद्धा तेवढेच खरे आहे. माणसाचं जीवन म्हटलं तर...सुखा, दुःखाचा संगम आहे त्यात सुख, दुःख अडीअडचणी, चिंता, मनस्ताप चिडचिडेपणा हे सर्व येतच असतात व समोरही ते येतच राहतील . ते, कोणालाही चुकले नाही आपण चांगल्याप्रकारे जाणूनच आहोत. पण, प्रत्येकांच्या जीवनात ह्या, सर्व गोष्टी काही कमी होत्या का. ..? पुन्हा , दुसऱ्या एका तणावाने नव्याने जन्म घेतलेला आहे तो, म्हणजेच मोबाईल होय.**

इथे मोबाईलची काहीच चूक नाही बरेच कामं एका सेंकदात होतात आणि अतिवापरामुळे डोळ्यांचे आजार वाढत असलेले दिसून येत असतात. याच मोबाईलमुळे दूर राहणाऱ्या नातेवाईकांसोबत दोन शब्द बोलणं होतच असते एवढेच नाही तर..एकमेकांना बघायला सुद्धा मिळत असते हि एक चांगल्याप्रकारे विज्ञानामुळे झालेली प्रगती आहे. याच विज्ञानामुळे आजचा माणूस कोसोदूर पोहचलेला आहे आपण बघितले असणार. ..पण, यात मात्र एक गोष्ट खास आहे ती, म्हणजेच की, माणूस म्हटल्यावर प्रत्येकांच्या अंगी कोणते,न कोणते लहान, मोठे सुप्त गुण असतातच व काही दिवसांनी हळूहळू ते गुण बाहेर दिसायला सुद्धा लागतात तेही फक्त, ह्याच मोबाईलच्या माध्यमातून सहजपणे ते इतरांच्या दृष्टीत पडत असतात. मग काही दिवसांनी हळूहळू ती व्यक्ती, अनेकांच्या लक्षात यायला लागते, त्याच्यातील कलागुण इतरांना आवडायला लागतात त्यामुळे मोबाईल मध्ये असलेल्या व्हाट्सअप वर आजकाल अनेक समूह दिसायला मिळत असतात व काही अशा अनेक संस्था सुद्धा असतात आणि आपल्या समूहात जोडून ठेवण्यासाठी समूह प्रमुख त्या प्रतिभावंत, व्यक्तींना तसेच थोडेफार त्यांच्यातील कलागुण पाहून समूहात घेण्यासाठी त्याला विचारत असतात व नंतर आपल्या समूहात सामील करुन घेतात काहीजण तर..न विचारताही सामील करतात याचा आपल्याला अनुभव आला असेल. ..

त्यामुळे अनेक साहित्यिकांचे दर्जेदार लिखाण सुद्धा वाचायला मिळत असतात व आपलेही लिखाण समूहात टाकायला संधी मिळत असते. एकमेकांच्या लिखाणाला कोणी छान, छान अभिप्राय देतात त्यामुळे कुठेतरी पुन्हा लिहिण्यासाठी प्रोत्साहन मिळत असते. व ह्याच मोबाईल मुळे कुठेतरी आज आपले दोन शब्द समाजापर्यंत पोहचत



असतात. याचा मात्र वेगळाच समाधान मनाला मिळत असतो.

एका अर्थाने बघितले तर.. हे, सर्व ठीक आहे पण, यात एक गोष्ट मात्र थोडी वेगळी आहे थोडी गमतीशीर आहे पण, एखाद्याची अडचण समजून न घेता जेव्हा, त्याच व्यक्तीबद्दल समूहात मागे पुढे लिहितात तेव्हा मात्र कुठेतरी तणाव येण्यासारखी गोष्ट असते ती म्हणजेच काहींचे मोबाईल नवीन असतात तर..काहींचे जुने झालेले असतात, काहींच्या मोबाईल मध्ये बिघाड असतो तर..कोणाच्या मोबाईलची वारंवार चार्जिंग संपत असते, कोणाकडे वेळ नसतो तर.. कोणी अजिबात लिहीत नाही. कोणाकडे नेटवर्क कमी असतो व कोणी समूहात असतात खरे पण, वर्षभर दिसत नाही. कोणी नाहकच एखाद्याची डिपी पाहून त्रास देतात तर..कोणी टाईमपास करण्यासाठी फोन करत असतात. अशाही काही लोकांना सांभाळणे सोपे नसते तरी सर्व समूह प्रमुख योग्य सूचना देऊन आपल्या समूहाकडे लक्ष देत असतात. कारण, एक प्रकारची त्यांच्यावर समूहाची जबाबदारी असते.पण,यात एक गोष्ट खास आहे ती म्हणजेच प्रत्येकांच्या मोबाईल मध्ये अनेक समूह असतात आणि त्यातील बऱ्याच समूहात नवोदितांना लिहिता यावे व शिकता यावे म्हणून दैनदिन उपक्रम घेत असतात काही समूहात स्पर्धा आयोजित केल्या जातात हे योग्य आहे पण,जेव्हा स्पर्धांचे व उपक्रमाचे सन्मानपत्र समूहात टाकतात तेव्हा, मात्र मोबाईल उघडून बघितल्यावर अंकल्ल काम करत नाही. जी महत्वाची पोस्ट असते तीही दिसत नाही, एवढे सारे रोज सन्मानपत्र क्लिअर करावे लागते किंवा डिलीट करावे लागते यात कमीतकमी एक घंटा जातो नाहीतर मोबाईल बंद पडत असते म्हणून अशा त्रासाला वैतागुन काहीजण कोणालाही आपली अडचण न सांगता समूहातून. स्वतःहून निघून जातात तर..काहीजण समूहात लिहून बाहेर पडत असतात. अशा वेळी, काही लोक नाहकच सत्य परिस्थिती जाणून न घेता त्या, व्यक्ती विषयी मनाला आले तसेही शब्द लिहितात, समूह सोडून का गेला. . ? हि विचारणा केली जाते. व अख्या गावभर गोष्ट पसरावी तसे ते शब्द सर्वांपर्यंत पोहचत असतात हे,सत्य आहे. पण,गोष्ट अशी की,तेच शब्द त्या व्यक्तीला माहीत होतात तेव्हा ती,व्यक्ती तणाव मध्ये येते. आणि म्हणते खाणा, घेना आपला पण, नाहकच या मोबाईल मुळे इतरांचे ऐकावे लागते एवढेच नाही तर... संधी साधून कोणी काहीपण लिहितात याचा त्याला खूप त्रास होतो व निराश होऊन जातो.

याच मोबाईलमुळे माणूस खूप काही शिकू शकतो पण, कधी, कधी नाहकच त्याला त्रास सहन करावा लागतो. असे, अनेकदा बऱ्याच जणांकडून ऐकायला मिळत असते. म्हणूनच हा एक प्रकारचा नवीन तणाव निर्माण झाला आहे असे, म्हणायला काहीच हरकत नाही.

तुकारामनीती
भाग -52

# तुका म्हणे विंचू सर्प नारायण ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी


**काळ कोणताही असो, खडतर, मध्यम वा चांगला, माणसाला त्याच्या काळातील जनमानसातून गेल्याशिवाय माणूस तावून सुलाखून निघत नाही! श्री राम, श्री कृष्ण, श्री बुद्ध, श्री ख्रिस्त, श्री पैगंबर, सॉक्रेटिस, ज्ञानोबा, तुकोबा, मीराबाई, ज्योतिबा-सावित्री, भगत सिंग, सुखदेव, राजगुरू, गांधीजी, डॉ.आंबेडकर, डॉ.कलाम, सिंधुताई ही माणसं समकालीन लोकजाळातून जाऊनच असामान्य झाली! काहीतरी करू शकली! त्यामुळेच सिंधुताई सपकाळ एका भाषणात म्हणाल्या होत्या, " बाबा, इथे मोठे व्हायचे असेल तर मरावे लागते!" मोठे मार्मिक आणि विचार प्रवण वाक्य आहे हे! माणसाला विचारांच्या खोल गर्तेत घेऊन जाते हे महावाक्य! ज्या समाजाच्या भलावणीसाठी जो तो अट्टहास करत असतो, मरमर करत असतो त्याला त्याचा समकालीन समाज आणि भोवतालची माणसं काय देतात? याचे उत्तर आपण जगाच्या इतिहासाची पानं चाळून पाहू शकता. लोकजाळातून निघालेल्या माणसांचीच उदाहरणे आहेत ही वरची माणसं आणि त्यांचा जीवनप्रवास! याला अपवाद तुकोबा तरी कसे असतील बरे? जगद्गुरू तुकोबांचा काळ मोठा खडतर! वर्णव्यवस्थेची कडेकोट, बलदंड चौकट! सगळीकडे परकीय, यवनांनी हाहाःकार माजवलेला. माणूस प्रचंड भेदरलेला, घाबरलेला! ना बोलायचे ना लिहायचे स्वातंत्र्य!**

सगळीकडे वर्णाची, धर्माची, सत्तेची प्रचंड दहशत! एकीकडे सुलतानी तर दुसरीकडे असमानी संकट सुद्धा तुकोबाच्या काळाला विषारी विळखा घालून बसलेले! सुदैवाने छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हळूहळू पाय रोवू लागले, एवढंच काय ते वाळवंटात मरुद्यान! असे असतांना सुद्धा तुकोबाराय आपल्या आंतरिक आवाजाला लोकाभिमुख करण्यासाठी डगमगले नाहीत.

कोणत्याही सृजनाची कलाकृती ही त्याच्या समकालीन घडामोडी आणि जीवनातील प्रसंगातून फुलून येत असते. त्याला तुकाराम कसे अपवाद असतील ? समज नव्हती त्या वयात व्यवहार करायची वेळ आली, समजायला लागले तेंव्हा संकटांची मालिकाच सुरु झाली. त्यात अभंग-भजन-कीर्तनाचे वेड लागले आणि सगळेच बदलले! व्यवहार करतानाचा लोकव्यवहार आणि अभंग-भजन-कीर्तन काळातील लोकव्यवहार तुकोबांना चांगलाच माहिती झाला होता. समाजातील, भोवतालची आणि घरातील माणसं त्यांनी खोलवर पचवली होती. आपल्याच घरातील माणसांचा आपल्यासोबत कसा व्यवहार असतो( ? ) याविषयी तुकोबांचा हा

स्त्रिया पुत्र कळत्र हें तंव मायावंत । शेवटींचा अंत नाहीं कोणी ॥१ ॥
यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणें ही घेती काढूनियां ॥२ ॥
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका
म्हणे ॥३ ॥ मार्मिक अभंग वाचल्यानंतर आपले डोळे खटकन उघडल्याशिवाय रहणार नाहीत! हा लोकव्यवहार त्यांनी चांगलाच पचवला होता. लोकांच्या लाठ्याकाठ्या, कुणी अंगावर गरम गरम पाणी टाकले तर कुणी मिरच्याच्या व्यवहारात सगळेच फसविले होते. अनेकवेळा कीर्तनात मार खावा लागला. भंडारा-भामनाथाच्या डोंगरावर किती दिवस-रात्री उपाशी गेल्या असतील( ? ) ते त्यांनाच माहित. मात्र याचा परिपाक असा झाला की तुकोबांच्या मुखावाटे निखळ, निके, चोवीस कॅरेटवाङ्मय बाहेर पडू लागले. यातून तुकोबा तावून-सुलाखून निघाले. आता ते कुणालाही दोष देत नाहीत. "तारी अथवा मारी" असा सर्वकाही भार पांडुरंगावर सोपवून आपल्या अंतर्मनाच्या गाभाऱ्यातील शब्दांना ते वाट मोकळी करून द्यायला आत्मनिर्भर झाले. प्रचंड आत्मबल आणि स्वसामर्थ्य अंगी आल्यामुळेच तुकाराम महाराज बेडरपणे लिहिते झाले. भूतकाळातील संत ज्ञानेश्वरादि भावडांना झालेला प्रचंड त्रास आणि शेवटपर्यंत आपल्याच माणसांकडून न मिळालेला सन्मान हा त्यांनी पदरी बांधून ठेवला होता. त्यांनाही यापेक्षा वेगळे अनुभव आले नाहीत. त्यांनी लोकव्यवहार जवळून पाहिल्यामुळे त्या विषयी अनेक अभंग लिहिले. त्यातील 'लोक जैसा ओक' हा अभंगही तेवढाच मार्मिक आहे. त्याचाच जोडीला तुकोबांना आणखी काही खडतर जनमाणसांचे अनुभव आले आणि त्यातूनच

जन देव तरि पायांचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥१ ॥
अग्नीचें सौजन्य शीत निवारण । पालवीं बांधोन नेतां नये ॥२ ॥
तुका म्हणे विंचू सर्प नारायण । वंदावे दुरुन शिवों नये ॥३ ॥
( १०७८ ) हा दृष्टांत सिद्धांतासह विचारप्रवण अभंग बाहेर पडला.



तुकोबांचा प्रत्येक अभंग आपण बारकाईने वाचायलाच हवा. वाचल्यानंतर बरीच डोक्यातली हवा निघण गेल्याशिवाय रहात नाही. तुकोबा जनमाणसांमध्ये ईश्वर पाहतात. त्यामुळे आपण जनदेवाच्या पाया पडावे, त्याचे दर्शन घ्यावे, परंतु लोकांचा स्वभाव बदलवण्यासाठी फार काही प्रयत्न करू नये. त्याचा फारसा काही उपयोग होत नाही. लोक लोकांचा मूळ स्वभाव बदलायला तयार नाहीत, त्यामुळे त्यांचिया स्वभावे चाड नाही. त्या वचनाला तुकोबाराय अप्रतिम दृष्टांताची सुंदर पुष्टी देतात. अग्नीचे वैशिष्ट्ये म्हणजे थंडी घालवणे जरी असले तरी अग्नी किंवा इंगळ पालवात म्हणजेच कपड्यात बांधून नेता येतील का ? इथे तुकोबाराय पालव हा अस्सल नांगरी भाषेतील शब्द वापरतात. पालव म्हणजे शेतकरी जुन्या-पुराण्या कपड्यात शेतात भाकरी बांधून घेऊन जातो त्याला पालव म्हणतात. या अभंगात शेवटी तुकोबा

जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा।।

या संत ज्ञानेशांच्या ओवीप्रमाणे विंचू आणि साप हे ईश्वराचेच रूप असले तरी त्यांना दुरूनच नमस्कार करावा, वंदन करावे. ते देवरूप आहेत म्हणून त्यांना स्पर्श करू नये आणि तसे केल्यास काय होईल ? हे सांगण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत अभंगात जगद्गुरू तुकोबाराय जनमानसाच्या स्वभावचे दर्शन घडवतात. हाच माणसाला समाज पायाखाली तुडवतो आणि मेल्यावर त्याला डोक्यावर घेऊन मिरवतो. त्यामुळे समाजापासून फार काही अपेक्षा धरू नये. आपण आपले कार्य इमाने-इतबारे करत रहावे. लोकांच्या प्रतिक्रियांची वाट पाहणे म्हणजे वांझ झाडाला फळ येण्याची वाट पाहण्यासारखे आहे. लोकमनाच्या जवळ जाण्याचा अट्टहास करूच नये. जनमानस हे इंगळ आणि साप-विंचवासारखे आहेत. त्यांच्या जवळ गेले की इंगळासारखे पोळणारच, किंवा साप-विंचवासारखे दंश केल्याशिवाय ते तुम्हाला सोडणार नाहीत. तेंव्हा या जनमानसरुपी इंगळ-साप-विंचू यापासून निरपेक्ष आणि अंतरानेच राहण्याचा अनुभवातून सल्ला देतात.

लोकव्यवहार तुकोबांनी जवळून अनुभवला होता. त्याची त्यांना झळ लागली होती. त्यांच्या बऱ्याच अभंगातून लोक आणि त्यांच्या वर्तनाविषयी लिहून व्यक्त झाले आहेत. लोकांचे हे व्यवहार आजचे नाहीत. मानव समूहाने राहतो तेंव्हापासून हे सुरूच आहे. लोकांनी कुणालाच सोडले नाही. महापुरुष, राष्ट्रपुरुष, देशप्रेमी, त्यागी व्यक्तींना सुद्धा लोकांनी निर्दोष सोडले नाही. हा समाजाचा एक भागच म्हणावा लागेल.

सज्जनांनो, आज काळ मोठा खडतर आहे. आज सगळीकडे मीडियाने माणूस ग्रस्त आणि व्यस्त झाला आहे. माणूस चिंतन-मनन करत नाही. चोवीस तास मीडियावर असलेला आणि विविध समूहातून आज आपल्याला लोकव्यवहार पाहायला, अनुभवायला मिळत आहे. एखाद्या संदेशावर मिळणारी प्रतिक्रिया, कमेंट हा सुद्धा आज महत्वपूर्ण झाला आहे. आभासी जगाच्या व्यवहारात माणूस गुरफटून गेला असतांना त्यावर सुद्धा थोडे काही समाधानकारक, लोककल्याणकारी बाब आपल्याला मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी तुकाराम नीती या सदरातून तुकोबांच्या अभंगातील असलेले विविध पैलू आपण वाचावे आणि त्या आधारे आपल्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल करून घ्यावेत. प्रस्तुत अभंगातून आपण बोध घ्यायला हवा. जनामनाचे अवलोकन करतांना आपण लोकांच्या प्रत्येक बऱ्या-वाईट प्रतिक्रियेला प्रतिसाद देऊ नये किंवा कुणी आपल्या एखाद्या चांगल्या क्रियेला सुद्धा प्रतिसाद अथवा कमेंट करत नसेल तर त्याकडे फार गांभीर्याने पाहू नये. लोक चांगल्या बाबीचा उल्लेख अथवा वाहवा करत नसतात. अंतर्गत असूया हा मानवी स्वभाव असल्यामुळे आपण अपेक्षा ठेवू नये. आज जो तो आपापल्या अडचणींनी त्रस्त, व्यस्त असतांना दुसऱ्याच्या चांगुलपणाकडे पाहायला माणसाला वेळ नाही. त्यासाठी जनमाणसांच्या प्रतिक्रियेवर आपण फार काही लक्ष देऊ नये. असे झाल्यास खऱ्या अर्थाने तुकोबांच्या या अभंगाचे सार्थक होईल. आपल्या व्यापातून आपण बाहेर येऊन आपला वर्तमान आनंदी व्यतीत करायचा असेल त्याने तुकोबांच्या अभंग गाथ्याचे नियमित वाचन करायला हवे. त्यातून आपल्या वर्तमान काळात सकारात्मक बदल करून घेऊन स्वच्छंदी-आनंदी रहावे. असे होणे आज काळाची गरज आहे. आपण जर लोकांच्या प्रत्येक प्रतिक्रियेला मनावर घेतले अथवा प्रत्येक बाबींवर प्रतिक्रिया द्यायचे ठरवले तर आपले व्यवहार ठप्प होतील. माणसाला काहीच सुचनार नाही. तेंव्हा आपण सर्वांनीच आजघडीला या अभंगाचे अवलोकन-अनुकरण करून जीवन कृतार्थ करावे हीच विनम्र प्रार्थना! जय तुकोबाराय!

# प्र.ई. सोनकांबळेंच्या विचारांचा वारसा जोपासणारं दांपत्य: डॉ.अश्विन व डॉ.पूर्णिमा

आधुनिक केसरी

**आठवणीचे पक्षी प्रसिद्ध आत्मकथनाचे लेखक प्रा. प्र.ई. सोनकांबळे यांचे चिरंजीव डॉ.अश्विन यांचा ०७ मे, रोजी ५० वा .जन्मदिवस औरंगाबाद येथे त्यांच्या मूळ घरी आप्ताच्या मेळ्यात साजरा होत आहे. ते मुंबई येथील जे.जे हॉस्पिटलमध्ये एम.डी पदावर कार्यरत असूनही मूळ आपल्या गावी येऊन आपला जन्मदिवस साजरा करत आहेत यातून त्यांच्यावर झालेले सरांचे आपलेपणाचे संस्कार दिसून येतात. डॉ. पूर्णिमा मॅडम, डॉ. अश्विन सर आणि त्यांची मुलं रोहक-रोहिका हे सर्व कुटुंब प्र.ईं सोनकांबळे सरांच्या समता आणि नम्रतेच्या छायेत वाढलेले असल्यामुळे त्यांचं साध वागणं, बोलणं, सहजपणे इतरांशी जुळवून घेणं मनाला भावतं. ज्ञान, बुद्धी आणि संपत्ती याचा बडेजावा न करता शक्य होईल तितकं सामान्याशी जोडलं जाणं त्यांचा हातखंड आहे.**

इतरांवर जीवापाड प्रेम करणं, महानगरात राहूनही येणाऱ्या प्रत्येकाला मायेची उब देणं त्यांच्या रोजच्या जगण्याचा भाग आहे. हे दांपत्य आपल्या परीने प्र.ईं च्या पावलांवर पाऊल ठेवून त्यांच्या विचारांचा वारसा चालताना दिसून येतं. याचा प्रत्यय मला त्यांच्या घरीतील एका मुक्कामातून आला. त्याची आठवण या लेखानातून मी सांगत आहे.

माणसे जन्मतात-मरतात संपतात. सारं सारं असत्याचं नसतं होऊन जातं त्यांचं. काही असतात भली माणसं त्यांच्या आठवणी उरतात उरात श्वासागत, तर काही असतात त्यांच्या जगण्याला नसतोच काहीच अर्थ विसरून जातो आपण त्यांना क्षणात. मग ते त्यांच्या असण्या नसण्याच्या कोणत्याच मापात बसत नाहीत. ते आले आणि गेले त्यांच्या जन्ममरणाचा कोणालाच काहीच नसतो कळवळा. आपली- आपली म्हटली जाणारी माणसं, त्यांच्या दृष्टीने आपण असतो गौण खाणीतल्या निरुपयोगी खनिजासारखे बाजूला फेकलेले. सारखीच अधळापट जन्मोजन्माची.चांगली माणसं असतात थोडी-थोडकीच, सणावाराला मिळावी पुरणाची पोळी तशी भेटतात कधी-मधी वाईटांच्या गर्दीत.कोळशाच्या खाणीत सापडावा हिरा तशी दुर्मिळ. त्यांचा सहवासही दुर्मिळच हवा असतो आपल्याला मग कधीतरी मिळतो ,आणि होऊन जाते आपलेही सोने परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे व्हावे तसे. म्हणून आपण कोण आहोत ?कोठून आलेलो आहोत ? कोठे जायचे आहे ? हे जरी आपल्याला माहीत नसले, तरी चांगल्या माणसांच्या सहवासाला आपण हापापलेलो असलो पाहिजे .त्यांच्या सहवासाने- स्पर्शाने सापडते जगण्याला नवी दिशा. त्यांच्या पाऊलखुणांवर चालणं नवा मार्ग दाखवून जातं जरी त्यांचे जगणे कठीण-अवघड असले ,तरी दुःखाच्या वाळवंटा नंतर सुखाची हिरवळ येतच असते की, तसच असतं चांगल्या माणसांचं जगणं. म्हणून आपल्या जीवनात हिरवळ फुलवण्यासाठी आपणही दुःखाच्या तप्त वाळवंटावरून चाललं पाहिजे हे मात्र नक्की.

परवा शब्द परिवाराचं' विश्व मराठी साहित्य संमेलन', नेपाळ काठमांडू येथे संपन्न झालं. त्या संमेलनात साधनव्यक्ती म्हणून मला निमंत्रित करण्यात आलं होतं .आता निमंत्रित करण्यात आलं होतं, म्हणजे कोणीतरी गावातलं आपल्या सोबत असावं म्हणून त्या संमेलनाचे अध्यक्ष दादा( मा. दगडू लोमटे ) यांनी मला बळच घोड्यावर बसवलं होतं .आणि माझं नाव पत्रिकेत टाकलं होतं .मलाही भलतीच हाऊस मी निघालो,' गाड्या बरोबर नळ्याची जत्रा 'कशी असते ते संमेलनावरून घरी आल्यावर मला कळलं. या प्रवासात एक मात्र नक्कीच घडलं या संमेलनातून काही मिळालेलं नसलं ,तरीही प्रवासादरम्यान मुंबई येथे एक मुक्काम प्र.ई. सोनकांबळे यांच्या घरी झाला तो मात्र मला बरच काही देऊन गेला. जगण्याला नवी दिशा- नवी उमेद आणि नवी ऊर्जा .

मुंबई ते नेपाळच्या मार्गाने जाणारे विमान सकाळी पाच तीस वाजता असल्यामुळे आणि लातूरहून मुंबईला जाणारी ट्रेन व बस सकाळी वेळेवर पोहोचू शकत नसल्यामुळे मी आणि दादा पहिल्याच दिवशी सकाळी मुंबईला ट्रेन ने पोहोचलो. दादानं टॅक्सी बोलावली आणि मला म्हणाला," बसा जाऊत आपल्या घरी. मला वाटलं होतं जवळच लॉजवर आपला मुक्काम असेल, पण दादांनी आपल्या घरी जावूत म्हटलं तेव्हा,' हा माणूस कोणाच्या घरी आपल्याला घेऊन जाणार' ? हा प्रश्न मला पडला होता. कारण मुंबईसारख्या मायावी महानगरात चतकोर संस्कृतीत वाढलेली माणसं गावाकडून आलेल्या माणसांना सहजासहजी स्वीकारतील असं होत नाही, खरं तर सगळेच वाईट असतात असही नाही ,मात्र सर्रासपणे असे प्रसंग येतात .कोणीतरी गावाकडून आलं तर फोनवरच सांगतात ,'आम्ही मुंबईत नाही' किंवा 'आम्ही कोणत्यातरी कामात-अडचणीत आहोत'. आणि टाळाटाळ सुरू होते. पण दादा हा साहित्य-संस्कृती आणि समाजकारणातला 'दादा' माणूस. त्याला हजारो लोक सहजपणे ओळखतात. कदाचित त्यातला जिव्हाळ्याचा एखादा माणूस असेल असं मला वाटलं आणि मी गप गुमान गाडीत बसलो. गाडी सरळ एका उड्डाण पुलावरून खाली उतरली आणि उजव्या हाताला वळून सरळ जे .जे. हॉस्पिटलच्या प्रांगणात घुसली. मी दादाला म्हणालो,"इथेच राहतात का ते ?"

"होय, हो. ते इथेच डॉक्टर आहेत दोघेही नवरा-बायको डॉक्टर आहेत. तुम्हाला माहित नाहीत का प्र.ई. सोनकांबळे ? त्यांचा मुलगा अश्विन आणि सूनबाई पूर्णिमा आहेत ते. इथेच राहतात. तुमच्याच गावाकडचे आहेत ते. तिकडं अहमदपूरच्या बाजूला हडोळती आहे का तिकडचेच आहेत ते".

प्र.ईं .चं नाव काढताच माझ्या अंगावर काटा आला आणि आठवायला लागलं "आठवणीचे पक्षी"आणि त्यातल्या एका-एका पानावरचा एक -एक प्रसंग आठवून डोळे भरून आले .



दुःख- वेदना काय असते ? उपेक्षितपणाचं जगणं म्हणजे काय असतं ? जात-धर्म आणि शूद्र म्हणून नाकारलेलं जगणं काय असतं ? वाळलेलं-कुजलेलं आणि संदर्भहीन जगणं म्हणजे काय असतं ? मुतारीच्या कडेला हिबाळलेली भाकर धुऊन खाताना भूक म्हणजे काय असते ? हितभर पोटाची टिचभर खळगी भरण्यासाठी माणसाला किती हाल- यातना सहन कराव्या लागतात. आणि या यातना सहन करूनही शिकण्याची चिकाटी. मैलोन-मैल नागव्या पायांनी तापलेला फुपाटा तुडवित कॉलेजला जाण्याची जिद्द काय असते ? याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे प्र.ई. सोनकांबळे. त्यांना मी कधीच प्रत्यक्षात पाहिल नाही, मात्र त्यांच्याविषयी भरपूर ऐकलं आणि कॉलेज जीवनात वाचलं. त्यामुळे आम्हा ग्रामीण भागातल्या सर्व मुलांचे ते प्रेरणास्त्रोत होते. हाल- अपेष्टा सहन केल्यानंतर शिक्षणामुळं मोठं होता येतं, ज्ञानी होता येतं हे प्र.ई. सोनकांबळे यांनी आम्हाला शिकवलं. त्यांचं दुःख वाचून आमचं दुःख आम्ही हलकं करत होतो. त्यामुळे मी त्यांना," हो चांगलंच ओळखतो". म्हणालो आणि गप्प बसलो. मनात एकच काहूर होतं आपण त्यांना कधीच भेटलो नसलो ,तरीही त्यांच्या घरी जात आहोत त्यांचा मुलगा,सून नातवंडं सर्वांना भेटणार आहोत त्याचा आनंद आणि कुतूहल होतं. मात्र दुसऱ्या बाजूला मनात भीतीही होती इतक्या मोठ्या महानगरात दोघेही एमडी जे .जे. हॉस्पिटल सारख्या नावाजलेल्या दवाखान्यात आहेत, त्यामुळे त्यांची लाईफस्टाईल राहणं -वागणं- बोलणं प्रचंड पुढारलेला असेल. महानगर आणि प्रचंड पगाराच्या नोकऱ्या म्हटलं ,की चंगळवाद आलाच. जुन्या पिढीतील विद्वान माणसं अनेक आपण पाहतो त्यांचं जगणं-वागणं-बोलणं आणि त्यांची राहणी ती कोणत्याही काळात बदलली नाही .मग ते महानगरात वास्तव्यास असले, तरीही त्यांनी आपलं जुनेपण सोडलेलं नाहीत, पण अलीकडे त्यांची पुढची पिढी मात्र त्यांचं सारंच जगनं विसरून जात आहे. त्यांचं त्यांना काहीच पटतही नाही .त्यांच्या विरोधी ते जगत आहेत. मग यांचं काय ? हे कसे असतील ? खरंच प्र.ई.च्या आपलेपणाच्या पाऊलखुणा जपत असतील का ? दुःखाच्या खाईतून स्वतःचं जीवन फुलवणाऱ्या प्र.ईं.नी यशाच्या शिखरावर पोहोचल्यावर सुख पायाशी लोळत असतानाही "सुखाच्या राजदरबारी, जीते मरणे नको मजला" या सुनिल तांबेंच्या गझलेच्या मुखडया प्रमाणे आपलं जीवन सामान्य माणसासारखं शेवटपर्यंत जगत राहिले. मात्र यांचा अंदाज करणं माझ्यासाठी कठीण होतं.

घरात गेलो वाटलं होतं,सारा झगमगटात असेल. आपल्याला तेथे अवघडल्यासारखं होईल, पण तसं काही घडलं नाही. उलट तेथे सारं काही निराळच पाहायला मिळालं. आपण आपल्याच घरात आलो आहोत असाच मला भास झाला. घरात जाताच ताई लगबगीने समोर आली, आणि म्हणाली," या आत. मध्ये या. ठेवा इथेच बॅगा हातपाय धुवा बसा इथे". ताईंची आत-बाहेर लगबग चालू होती. सरांचं मात्र शांत शांत. ते हळुवारपणे दादांशी बोलत होते", गाडी वेळेवर निघाली का ? गर्दी होती का ?".

दादा मात्र नेहमीप्रमाणेच 'गतिमान सरकार, वेगवान विकास' या सरकारच्या या जाहिरातीप्रमाणे दोघांनाही बोलत होता . "मुलगा पुण्याला शिकतो आहे. मुलगी इथेच शिकते. शाळेला जाण्यासाठी तयार होते आहे. तीही पुढच्या वर्षी पुण्याला जाणार आहे. शाळा खूप उत्तम आहे बर का, मुलं आपल्यापासून दूर राहिले की स्वालंबी बनतात. नाहीतर घरात टीव्ही, मोबाईल आणि चिडचिड हे सगळं त्यांचं चालतं. आता तो खूप शांत झाला आहे. अनेक नव्या-नव्या गोष्टी तो आम्हालाच सांगतो . महिन्यातून एकदा आम्ही भेटायला जातो.."

दादांनं माझा परिचय करून दिला. मी तुटक- तुटक बोलत होतो. माझं सारं लक्ष ताई आणि सरांच्या बोलण्याकडे होतं, आणि नजर मात्र विश्वास न बसणाऱ्या साऱ्या घरांवर भिरभिरत होती. किती हा साधेपणा ? बोलण्या- वागण्यात ,राहण्यात आणि घरातल्या प्रत्येक कानाकोपऱ्यातल्या वस्तू- वस्तूतला. खरोखरच प्र.ई.च्या वारसाला शोभावा तसाच. खरंच इतक्या मोठ्या महानगरात राहणारे आणि नामांकित हॉस्पिटलमध्ये नामांकित डॉक्टर म्हणून काम करणारे हे दोघेही किती साधेपणाने जगतात. हे मी लिहून ठेवलं तरी वाचकांना विश्वास बसेल ,की नाही यावर मलाच शंका वाटते. भल्या- भल्यांना वाटेल की," आजकाल लेखकं असं काहीतरी लिहितात, आणि वाचकांच्या भावनेला हात घालतात, असं कुठे असतं का ? 'उशाला तळंन,घशाला कोरड'. खरंच आहे शहरातच काय, आजकाल गाव-खेड्यातही इतकं साधेपणानं कोणीच जगत नाही अगदी टिनपत्राच्या घरात सुद्धा टीव्ही, फ्रिज ,झोपायला बेड-गादी, बसायला सोपासेट, खुर्च्या आणि अनेक वस्तूंचा झगमगट घरात दिसतो, पण या घरात मला यातलं काहीच दिसलं नाही. हॉल, किचन, बेड असं काहीसं होतं पण या रिकाम्याच खोल्या असाव्यात असंच होतं .त्यात कुठेच भौतिक वस्तूंचा जंजाळ दिसत नव्हता. जे होतं ते अंथरून- पांघरून जाग- जागी लावून ठेवलेलं सहज साधं आणि नीटनेटकं .एक साधा तीन माणसं बसतील इतकाच जुना दिवाण हॉलमध्ये कडेला ठेवला होता. तीन-चार खुर्च्या बाकी पूर्ण हॉलभर मोठी सतरंजी पसरलेली होती. इतका साधेपणा घरभर पसरलेला होता.

ताई आणि सरांची ड्युटीवर जान्याची लगबग चालू होती. चहा-नाष्टा आम्ही सर्वांनी एकत्र घेतला.. "आराम करा. जेवण तयार आहे, आंघोळी करून जेवण घ्या. बाहेर फिरायला जाणार असाल, तर चावी समोर द्या आणि दुपारी बरोबर दोनला परत या आम्ही येतो. दुपारचं जेवण घरीच करूयात. नॉनव्हेज करते " म्हणत ताई घराबाहेर पडली सरही घराबाहेर पडले. जाताना मात्र कोठे काय ठेवलेलं आहे, ते सारं सांगून गेले. आम्ही तयार होऊन बाहेर पडलो .गेटवे ऑफ इंडिया परिसर फिरून आलो .तोपर्यंत ताई-सर दोघेही घरी आले होते. दुपारच्या वेळी दादानं सुनील तांबे या गझलकार मित्राला घरीच बोलावला होतं, सारे एकत्र जमलो पुन्हा घर गजबजून गेलं होतं. आमच्या गप्पा रंगात आल्या होत्या, तेव्हा ताईनं जेवणाची जमावा-जमव सुरू केली .हॉलमध्ये ताटं लागली. आम्ही सारे गोल अंगत-पंगत करून बसलो. कसलाच संकोच वा कमीपणा नाही. सर- ताई, त्यांची मुलगी आणि आम्ही तिघं एकाच कुटुंबातले आहोत, इतकं सहज दुरडीतल्या कापडातली भाकर घेऊन खात होतो. साहित्य-कला-राजकारण आणि कोरोना किती तरी, भरभरून गप्पा चालू होत्या. अनेक वर्षांचा ऋणानुबंध आमच्यात आहे असंच मला वाटत होतं . काळ्या तिखटातला चिकन-रस्सा ,भाकरी चवीनं मी खात होतो. ताई भरभरून वाढत होत्या. आग्रह करत होत्या मला तर माझ्या 'माय'ची आठवण झाली.' माय'चं समोर बसून वाढणं, प्रत्येकाच्या ताटाकडे लक्ष ठेवणं हे सारं गावातच होतं नगरात शक्यच नाही हा माझा गैरसमज धुळीला मिळाला आणि आमचे जेवणं झाली. पुन्हा जुन्या आठवणींना उजाळा सुरू झाला .मी घरात भिंतीवर असलेला प्र.ईं चा ब्लॅक अँड व्हाईट फोटो नेहाळून पाहिला. कोणीतरी मध्येच प्र.ई.ची आठवण काढली, आणि मीही बोलता झालो ."खरंच आहे सरांच्या आठवणी आजही साऱ्या मराठवाड्यात दररोज निघतात. आम्ही तर वर्गात शिकताना आणि शिकवताना आजही सरांच्या आठवणी काढतो. शिकताना कितीही संकटं आले, वाईट परिस्थितीचा सामना करावा लागला, तरीही हिमतीने लढलं पाहिजे. हे आम्हाला सरांनी शिकवलं. परिस्थितीच्या उन्हात भाजल्याशिवाय सुखाची हिरवळ जीवनात अनुभवता येते नाही, हा अनुभव आम्ही सरांच्या लेखनातून घेतला.सर शेवटपर्यंत जसे होते तसेच राहिले. मोठ्या नगरात, कॉलेजमध्ये प्रोफेसर झाले म्हणून व सुखासीन जीवन जगणे शक्य होते, म्हणून ते बदलले नाहीत .त्यांच्या वागण्या- बोलण्यात आणि वावरण्यात कसलाच फरक पडला नाही. आजही लोक त्यांना 'संतत्व पावलेला सज्जन माणूस' असेच म्हणतात. माझ्या बोलण्याने वातावरण गंभीर होत होतं तेव्हा दादानं विषय बदलून देशातील विविध प्रश्नांवर चर्चा सुरू केली. आणि पाहता-पाहता चर्चेने मूड बदलला कविता- गझल रंगात आली.

मैफिल चांगलीच रंगात आली होती . गझलकार आपलं काम ,कौटुंबिक दर्द, आणि गजलेचे खुमासदार प्रसंग सांगत- सांगत," सुखाच्या राजदरबारी, जिते मरणे नको मजला.."ही दर्दभरी गझल सादर होता . पुन्हा -पुन्हा फर्माईश हात होती तो सादर करत होता .घरातली सर्व मंडळी गोल बसून या गजलांचा आनंद घेत होती ताई व्हायरलनं फणफणत होत्या, तरीही त्या आमच्यापासून शेवटपर्यंत दूर गेल्या नाहीत. उलट त्यांची मध्ये- मध्ये कॉफी-चहाची विचाणा चालूच होती. किती साधं, मनमोकळे, मनाला भावणारं कुटुंब असतं त्याचा उत्तम नमुना मला पाहायला मिळला. 'सुखाच्या राजदरबारी, जिते मरणे नको मजला... 'खरोखरच प्र.ईं. च्या घरातल्या वातावरणाला आणि एकूणच जीवन जगण्याच्या वारसांच्या शैलीला शोभणारी ही गझल माझ्या मनात कायमच खोल रुतून बसली. आपण प्राध्यापक आहोत, आपणही सुखाशिन जगलं पाहिजे, इतरांपेक्षा वेगळं दिसलं- वागलं पाहिजे .अशा अविर्भावात आपण राहतो. पण आपण कुठून आलो आहोत ?, आपल्याला काय करायचं आहे ?, आणि कोठे जायचं आहे ? ते हळुवार विसरत जातो. बेगडी बनत जातो. अशा या स्टेजवरती माझं जगणं चालू असताना या प्रसंगाने मला पुन्हा जमिनीवर आणलं. आणि कितीही सुखी- समाधानी जगता येत असलं तरीही आपण इतरांचे दुःख नजरेत भरून त्यांच्या जीवनात सुख पेरण्याचं काम केलं पाहिजे. त्यासाठी त्यांच्यासारखच जगलं पाहिजे .हे सहज सादं जगणं माणसं जोडण्याचं प्रमुख साधन आहे. हे माझ्या लक्षात आणून देऊन माझ्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचं काम या कुटुंबानं केलं. रात्रीला आराम करून पहाटेच विमानतळावर पोहोचलो धुक्यामुळे विमान उशिरा आलं आणि आम्ही उशिराच नेपाळला पोहोचलो. पुन्हा घरी जाण्याचं ठरलं होतं, पण नेहमीप्रमाणे पुन्हा परत येताना विमान मुंबईला उशिरा पोहोचलं आणि सरळ आम्ही रेल्वे स्टेशनला गलो. घरी जाण्याचा पुन्हा योग आला नसला ,तरी त्या एका दिवसाच्या शिदोरीने मला जगण्याचा मौल्यवान ठेवा मिळाला. जमिनीवर राहण्याची शिकवण मिळाली हे मात्र नक्कीच घडलं, त्यामुळे या कुटुंबाला माझा सलाम... हे सर्व घडण्यामागे- घडवण्यामागे डॉ. पूर्णिमा ताईंचा खूप मोठा वाटा आहे हे कोणालाही नाकारता येत नाही. मला इतकी मोठी साधेपणाने जगण्याची शिदोरी ताईंनी दिली त्याबद्दल त्यांचे आभार, आणि डॉ. अश्विन सरांचा आज जन्मदिवस त्यांना लाख लाख शुभेच्छा...

प्रा. डॉ. देविदास खोडेवाड
खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई.
मो.नं. ९७६४२१०३१३.

---

आधुनिक केसरी

# खरं सौंदर्य

बाळ जन्माला येते तर सर्व प्रथम तो मुलगा की मुलगी पाहिलं जात मुलगी असेल तर ती दिसायला गोरी की काळी या कडे लक्ष दिल जात.



दिपा सदाशिव चिंचकर
संपर्क 9284900969

तिथून सुरवात होते तिच्या दिसण्याच्या कसोटीला ती मुलगी जसजशी मोठी होते तसतस तिच्या रंगावरून तिला टोमणे दिले जातात तिची तुलना गोर्या मुली बरोबर केली जाते तितेही काळ्या रंगाची तुलना थांबत नाही नृत्य आणी वेगवेगळ्या कलांमध्ये पारंगत असली तरी तिला तिच्या रंगामुळे तिला मागेच उभे केले जाते डान्स कितीही छान य येऊदे तिच्या रंगामुळे तिच्यावर अन्याय हा होतोच. ती काळी मुलगी कितीही छान नटली तरी तिचा काळेपणा तिच्या सौंदर्याच्या आडवा येतोच.तिचं लग्नाचं वय होत पण तिला मुलगा बघताना गोर्या रंगाच्या बहिणीला लपवलं जात किंवा तिला लग्नासाठी नाकार दिला जातो. पण त्या वेळी तिच्या मनाला काय वेदना होत असतील याचा मात्र कोणीच विचार करत नाही. लोक काळ्या रंगाच्या देवासमोर पाया पडतील पण काळ्या रंगाची बायको कोणालाही नको असते. प्रत्येकालाच गोरी मुलगी बायको म्हणून हवी असेल तर समाजातील काळ्या मुलींचे काय ?त्याचा विचार कोणी



करतच नाही तिचे लग्न झाले आणि काही वर्षानंतर जर तिला बाळ झाले सर्वप्रथम नशीब ते बाळ आईसारखं दिसायला काळ झाल नाही अस त्या मुलीच्या तोंडावर बोलल जात. आपला समाज कितीही सुधारला प्रगत झाला तरीही काळा आणी गोरा हा भेद कधी नाहीसा होणार आहे हे माहित नाही.म्हणूनच शेवटचं सांगेन कोणत्याही मुलीच्या बाह्यारूपाला तिच्या रंगाला महत्व देण्यापेक्षा तिच्या अंतर्मनाला तिच्या गुणांना महत्व दया बघा ती काळी मुलगी तुमचं आयुष्य किती सुंदर करेल.

# विसावा...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**निस्तब्ध अशा एका शांत वेळी विचाराधीन मन, माहित नाही का? पण माझ्याच वहीची पाने फडफडून लक्ष वेधून घेत होती. उठले वही घेतली नि... आणि हरवलेल्या त्या भूतकाळाच्या वेलीवर भविष्याची कळी उमलू पाहत असते. कधीतरी केंव्हातरी मैत्रीच्या प्रेमाने भारावलेली अन् मैत्रीची साक्ष देणारी निर्माल्यतली ती पाकळी अजून तिथेच असेल का? नवे रूप घेऊन बहरलेल्या त्या झाडांच्या कळीच्या रूपात हिरव्यागार पानांच्या आडून डोकावताना दिसेल का? किंवा मग फुलाच्या त्या पाकळ्या पाकळ्या तून पुन्हा नव्याने भेटण्यासाठी आसुसलेली असेल का? तो दिवस आजही आठवतो.**

दहावीच्या निरोप समारंभा नंतर सर्व मैत्रिणींनी हातवर हात ठेवून " पुन्हा भेटूच" असे बोलता बोलता शेजारी असलेले मैत्रीची साक्ष देणारे ते अशोकाचे झाड आणि त्याच्या शेजारी असलेले त्या गुलमोहरच्या झाडाची ती पाकळी अचानक डोळ्यासमोर आली.

माहित नसते कोण कोणासाठी, चुकून पडतात ऋणानुबंधाच्या गाठी. कित्येक दिवसांनी नव्हे नव्हे कित्येक वर्षांनी काल सहज फोन ची रिंग वाजली. आणि ..जीवनाच्या वाटेवर कित्येक गोष्टी मागे टाकून आपण किती पुढे निघून गेलेलो असतो,हे आपले आपल्यालाही कळत नाही. नव्वदच्या दशकाचा तो काळ, एक एक क्षण मागे टाकत,वेळ निघून जाते. मनपटलावरच्या काही खुणा धूसर होत जातात.आणि मग केव्हातरी.... माहित नाही कोण कोठे ? कोण कोठे ? कधीतरी काळ, वेळ, नियती, निसर्ग आणि या साऱ्या निसर्गाच्या कालचक्रात अडकलेले आपण ..! कसे ना ही सारी निसर्गाचीच किमया. सुखद क्षणाच्या असंख्य आठवणी मनात साठवून ठेवत टक टक करत त्या दोन तीन पायऱ्या उतरले. दोन चाकी ला किक मारली. सोबतीला मावळतीला चाललेला रविराज होताच आणि झाडांच्या दूरवर विसावलेल्या त्या सावल्या आणि त्याला आलेली शितलाई खूप काही सांगू पाहत होती. आणि विचाराधीन मन हरवलं, आज कित्येक नव्हे नव्हे तब्बल २७ वर्षानंतर त्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. आज वयाच्या या वळणावर असताना ..तोच हात आणि तीच गळाभेट इथे नाही बंगला, नाही गाडी, नाही कोणी इंजिनिअर,नाही कोणी वकील नाही कोणी डॉक्टर नाही .होता ती फक्त माया आपुलकी आणि मैत्रीचे हळवे बंध थोड्या वेळासाठी परकेपणा अर्थात तो असणारच. पण साधना वनिता यापेक्षा "ये साधने" "ये वने" "ये संगे" अशी अनेक नावे आहेत पण शब्दांनाही कोडं... ? साधे सरळ बोलताना म्हणजे कोणाची जबरदस्ती नाही.आणि नव्हती पण म्हणतात स्वतःहून स्वीकारलेल्या नात्यातच फक्त हे असू शकते.

ये हे अशा नका हाका मारू आपण पहिले होतो तशाच हाका मारा. याच्या पेक्षा खऱ्या मैत्रीचे आणखी काय उदाहरण देणार. मोठ्या मनाने आणि खरया अर्थाने एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होण्यासाठी मनापासून झालेली चर्चा याचाच खरं अर्थ स्नेह मेळावा होय. का ? कशासाठी ? कोणासाठी ? म्हणण्यापेक्षा मनाची ती हळवी गुंतवणूक आणि तो आधाराचा एक हात त्याला मिळालेला बोनस म्हणजे म्हणायचे आहे की एकमेकांच्या सुख दुःखाची जाणीव विचार पूस करणे यालाच तर गेट टुगेदर असे म्हणतात. खरा स्नेह मेळावा होय. काही कालावधीनंतर माणसे बदलतात असे म्हणतात. पण सारा सार विचारा नंतर म्हणजे निव्वळ काही वर्षानंतर ची सुध्दा अगदी निखळ मैत्री पाहून म्हणजे मैत्रिणीं बद्दलची ( स्त्रियांबद्दल ची ) आदराची वागणूक त्या प्रत्येक मुलांमध्ये दिसत होती. निखळ मैत्रीची ती भावना अग हे घ्या मुलींनो आग्रहाने खाण्याचा तो आग्रह काय हवय काय नको बघता बघता पाचवी सहावीत ली ती मुले



डोळ्यासमोर आली.आणि वाटले. खरचं ही आहेत तशीच आहेत. नाही बदलली आणि ते सर्व काही मनापासून होते चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होती.उगाच वाहवा करायची म्हणून नाही करत आहे. ती जाणीव इतकी प्रकर्षाने जाणवली की अभिमानाने मान ताठ झाली आणि आपसूक ओठावर शब्द आले. ही ही ना ही आमची १० th बॅच. ह्या रविवारी पहिल्या बॉलमध्येच सिक्स मारणार, असे कित्येक शनिवारी म्हणणारा संजू कित्येक रविवारी पहिल्या बॉलमध्येच आउट होत असे.पण आता बघाच पुढच्या रविवारीअसे गेलेले कित्येक रविवार आजही स्मरतात. नि....मग हसून हसून लाल होणारे गाल किती कुठे कसे या साऱ्या तला तो निखळ आनंद आजही एका क्षणाला किती सुख देवून जातो, हे शब्दात सांगणे कठीणच " लवकर या रं, सगळ्यांनी. विटू दांडू ,बॅट बॉल, खराब झालेली सायकलची चाके, गुर ढोर बघत बघत दिवसभर नुसता धुडूगुस. सुरपारंब्या खेळता खेळता , फुटलेला हाताचा कोपर, रक्ताळलेल्या गुडघ्यावर लावलेली माती नि मग हाल्या हं...करत करत फिरणारी सायकलीची चाके सारे नजरेसमोरून एका क्षणर्धात तरळून गेले. सायकलचे ते चाक फिरत फिरत....काळाच्या चक्रात अशी काही अडकून गेली की... त्या एका रविवारी मारलेला तो बॉल टप्पी खात खात इतक्या दूरवर गेला की ..ती सायकल ची चाके काळाच्या गतीने पुढे गेली. वाटा वळणा वळणाने वळल्या त्या शेवटी वळणासाठीच होत्या. वळण वाटेवर कधीतरी चढ लागून जेवढ्या गतीने पुढे गेलेले चाक तेवढ्याच गतीने रिव्हस नी मागे यावे असेच काहीसे झाले....

झाडाच्या पानांची पान गळ होऊन नविन पालवी फुटते.नवी फुले फळे येऊन नव्याने पुन्हा नविन बीज निर्मिती होते. सूर्य उगवून अस्ताला जातो.असे कित्येक सूर्य उगवले नी अस्ताला गेले. कधी झाडाच्या सावलीत एकत्र तर कधी सिमेंटच्या नि गाड्यांच्या जंगलात हरवून गेले. डिजिटलाच्या जगात एकत्र कसा का असेना एकमेकांचा हात मात्र हातात होता. आज अजूनही आहे. पण परिवर्तन हा काळाचा नियम आहे. वाटा वाटा ना ही काळाचे वेध लागतात.

दहा दिशांना वळलेली ती पाऊले दरवर्षीच्या उन्हाळ्यात आणि दिपावलीच्या सुट्टित एकत्र येत होतीच, सुख दुःखाच्या चार गोष्टी करत होती.मागे राहिलेल्या हाताना हातात घेऊन पुढे सरत होती. पण त्यात वेगळेपण होते. निरोपाचा क्षण यायचा अन् पाऊला खालची धूळ वाटा वाटा नी पांगायची. प्रवाहाचा तो ओघ ..कधी त्यातल्या एका पायाला रुतलेल्या काट्याची कळ त्या प्रत्येक पायांना यायची. कळवललेल्या मनाची फुंकर अन् मदतीचा हात मागे पडलेल्या त्या हाताला खेचून आणयचा. मनाच्या त्या अतूट धाग्याने बांधलेल्या एकीच्या त्या बळाला कधीतरी यशाची फळे लागणारच. क्षण पळे स्थिरावतात.मनाच्या गाभाऱ्यात लावलेल्या झाडांना काही वर्षांनी गोड फळे येणारच.आणि त्याचा एक विशाल वटवृक्ष होणार हे निश्चित च... असे कर्तबगार हात आणि पुढच्या पिढीसाठी काहीतरी करण्याची ती धडपड पाहते तेव्हा स्वाभिमानाने मान ताठ होते. याच्यापेक्षा मैत्रीत काय आहे. मैत्री ही खऱ्या अर्थाने मैत्री आहे. या सुंदर तरल नात्यात दूरवरून कानी घुमणारा तो टन टन चा आवाज आजही कानी घुमतो आहे. जिथं या साऱ्याची मूळं रुजली. ती.... ती माझी शाळा आज अभिमानानं गावाच्या मध्यावर साऱ्याकडे लक्ष ठेवून उन्हा पावसात आजही उभी आहे. तो चंद्रसवैरा .. जणू तिच्याच व्हरांड्यात टणटणत टाळ्या वाजवणारी ती .....अगदी स्वत:च्या लेकराचं एखाद्या आईनं ओरडून ओरडून कौतुक करावन् अगदी तसचं, कितीही दूर असो कधीही केव्हा केव्हा, कसोटिच्या त्या क्षणात हे हात एकत्र येतील तेव्हा तेव्हा कितीदा ही अन् केव्हा केव्हा भेटू या वळणावर तेव्हा तेव्हा

काही गोष्टींना मर्यादा असतात.येणारी वेळ निघून जाणारच असते. स्वाभाविक हे नैसर्गिक च आहे.शेवटी काय.. ? दूर देश मनात हुरहूर होऊन नाचू लागला...हाताचे ते पालव .. सर्रकन उडालेली धूळ.. वेगवेगळ्या वाटानी पांगली..! तेव्हाच्या क्षणांची ती अपूर्वाई सुखाच्या क्षणांची साक्ष देई. स्मृती गंधातील आनंदी क्षणांचे चांदणे शिंपीत जणू अंगणी उतरून येई. नदीच्या काठा वरची मंद वाऱ्याची झुळूक यावी आणि मनाला सुखावून जावी. अन् हरवलेल्या त्या क्षणात स्वतःला स्वतः त शोधताना हरवून जावी. **क्रमशः**

# आईच्या भावविश्वाची सफर घडविणारा काव्यसंग्रह : 'आई तू'



भगवान राईतकर
संपर्क क्र. 9730332151

आधुनिक केसरी

**'आई ' या शब्दाचा उच्चार करताना प्रत्येकाच्या मनामध्ये प्रत्येकाची आई आणि आई विषयक भाव याची जाणीव होत असते. आई म्हणजे चालते - बोलते भगवंताचे रूप होय. आई म्हणजे प्रत्येकाच्या जीवनामधील प्रथम गुरु. आई म्हणजे प्रत्येकाच्या जीवनातील हक्काचं , प्रेमाचं आणि रागावण्याचं ठिकाण होय. आईच्या आभाळमायेत प्रत्येकजण स्वतःला परिपूर्ण समजत असतो. परंतु, आईच्या जाण्याने माणसाच्या जीवनामध्ये अपूर्णता कशी येते ... तिचं अस्तित्व आपल्याला जागोजागी कसे जाणवते... तिच्याशिवाय आपले जीवन आणि आपली दुनिया कशी सुनी - सुनी होते... या आणि अशा प्रकारच्या आई विषयक जाणीवा 'आई तू...' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून संवेदनशील आणि हळव्या मनाच्या कवयित्री सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे- चोपडे , परभणी यांनी मांडलेल्या आहेत.**

आई असताना आईवर लिहिणे आणि आई नसताना आईवर लिहिणे या मधला जो फरक असतो. जो, शब्दाला मायेचा ओलावा देतो... शब्द कसे भावनेला साथ देतात... शब्दच कसे आईपासून दुरावलेल्या लेकराला आपुलकीचा आणि स्नेहाचा हात देतात... अशा प्रकारचा आशय 'आई तू...' हा काव्यसंग्रह वाचतांना प्रत्येक वाचकास येईल, असे वाटते. आई तू...या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून कवयित्री सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे- चोपडे यांनी आई , आई विषयीच्या भावना , आईच्या भावना , आई गेल्यानंतर धाकट्या भावांसाठी त्यांची कुटुंबातील भूमिका , मुलगी झाल्यानंतरची आई , माहेराविषयीची ओढ, नातवंडांना आजीचे प्रेम मिळावे, हा व्यापक दृष्टिकोन ... यासारख्या अनेक भावना 'आई तू...' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी मांडल्या आहेत.

आई तू... या काव्यसंग्रहातील आई तू ...कविता वाचतांना आईविषयी कवयित्रीच्या दाटून आलेल्या भावना व्यक्त होतात... आणि त्या म्हणतात की, आई तुझ्या महतीचे वर्णन करताना शब्द अपुरे पडतात. हे सांगताना त्यांचे डोळे आसवांनी पान्हावतात ...

**आई तुझ्या महती पुढे**
**शब्द अपुरे जाणवले**
**माझ्याही नकळत माझे**
**डोळे आज पाणावले**

आई जाण्याचे दुःख प्रत्येकाला असते. परंतु, आईच्या त्या घरामधील मुलगी मोठी असेल तर, तिला मात्र त्या दुःखाची तीव्रता प्रामुख्याने अधिक जाणवत असते. कारण, आई जाण्याचे दुःख असताना इतर भावंडांना आपल्या मायेच्या पंखाखाली भावनेची ऊब देण्याचे काम मोठी बहीण करीत असते. परंतु, तिच्यावरील मायेची झाकण मात्र, उडून गेल्यामुळे ती उघडी पडल्याचे दुःख कवयित्रीने 'आई तू...' या काव्यसंग्रहातील एका कवितेमध्ये व्यक्त करताना म्हटले आहे की,

सारेच म्हणतात मला
तुझ्यामुळे भाऊ झाकलेले दिसतात
पण मी मात्र उघडीच वाटते मला
तू गेलीस म्हणून....

आईमुळे प्रत्येकाच्या जीवनाला पूर्णत्व येते. आई गेली की मात्र, जीवन हे अपूर्ण वाटते. जेंव्हा, कवयित्रीची सासरी जाण्याची वेळ येते तेंव्हा, त्यांचे मन आणि भिरभिरलेली नजर फक्त आईचा शोध घेत राहते . पाठवणी या कवितेत त्या म्हणतात,

**सासरी मी जाईन तेंव्हा**
**आई तू मला दिसशील का ?**
**चाललीस का लाडके**
**म्हणून मला पुसशील का ?**

सासरी जाताना आईने समोर असावं व चाललीस का ?म्हणून विचारवं , ही एका लेकीची भावना कवयित्रीच्या मनात दाटून आलेली आहे.पुढे कवयित्री लिहीते....

**सारा आनंद असतानाही**
**उदास मी असेल गं**
**भरलेल्या मांडवात मला**
**उणीव तुझीच भासेल गं**
**अशावेळी समोर माझ्या**
**येऊन आई बसशील का ?**

पाठवणीच्या वेळी सारा मांडव भरलेला असूनही कवयित्रीला जेंव्हा आई दिसत नाही. तेंव्हा, तिची उणीव तिला भासते, अशावेळी आईने समोर येऊन बसावं , असे कवयित्रीला वाटते.

सासरी जाणाऱ्या प्रत्येक स्त्रीला माहेराची ओढ असतेच. तशीच कवयित्रीलाही आहे. परंतु, माहेरात सारे काही असूनही फक्त आई नसल्यामुळे माहेरपणाची ती ऊब कवयित्रीला मिळाली नाही. ती प्रत्येकीला मिळावी अशी भावना कवयित्री माहेरपण या कवितेत व्यक्त करतात.

प्रत्येकीच्या नशिबी
माहेरपण असावं
चार दिवस हक्कानं
खुशाल जाऊन बसावं
प्रत्येकीलाच असावी
आतुरलेली माय
हरखून जावी पाहताच
दुधावरची साय

लेकी बरोबरच लेकीच्या लेकरांचे म्हणजेच नातवंडांचे सुद्धा गोड- कौतुक माहेरी केले जाते. नातवांना पाहतात आजी हरखून जाते. तशी आजी प्रत्येकच नातवंडांना लाभावी व त्यांचेही कौतुक व्हावे. अशी व्यापक भावना कवयित्रीने इथे व्यक्त केलेली आहे.

कवयित्री अनेकदा आई गेल्याचे दुःख विसरण्याचा प्रयत्न करते... परंतु, त्यांच्यासमोर जेंव्हा एखाद्या मैत्रिणीची मायाळू आई येते. तेंव्हा त्यांचा कंठ दाटून येतो.

**हो, मी विसरले असते**
**आई तुझं अवेळी जाणं**
**अन् स्वीकारला असता**
**तुझा मृत्यू**
**पण जेंव्हा समोर दिसते**
**माझ्याच एखाद्या मैत्रिणीची**
**काळजी घेणारी आई**
**अगदी तुझ्याच सारखी**
**तेंव्हा दाटून येतो गं माझाही कंठ**
**अन् कितीही आवरला तरीही**
**आवरत नाही**
**कसाबसा बांधून ठेवलेला**
**बांध माझ्याच आसवांचा**

आईची आठवण आणि आईचा सहवास हा प्रत्येकाला जगण्याची एक नवीन उमेद निर्माण करून देत असतो , याची आठवण वाचकांना कवयित्री 'आई तू...' या काव्यसंग्रहातील एका कवितेच्या माध्यमातून करून देतात की,

**तुझ्यामुळे जीवनास**
**पूर्णत्व आले**
**तुझ्या विना जीवन**
**अधुरे झाले**
**तरीही जगण्याची**
**उमेद नवी**
**माझ्या**
**मनाला**
**देतेस तू**

**आई......**

आई जाण्याचे दुःख उरी असताना कवयित्री जेंव्हा आई होते तेंव्हा, तिच्या मुलीची आई होण्याच्या आनंदाच्या भावना व्यक्त करताना कवयित्री म्हणतात की,

**नव्हती बहीण**
**,नव्हती मावशी,**
**नव्हती मला आई**
**लेक होऊन फुलली**
**माझ्या अंगणात जाई**

कवयित्रीच्या बालपणी सोडून गेलेली आई... जणू काही, मुलीच्या रूपामध्ये पुन्हा त्यांना भेटावयास आली, असे त्यांना वाटते. असा प्रत्यय त्यांच्या कवितेच्या पुढील ओळीतून येतो..

**कधी -कधी वाटतं मला**
**आईच माझ्या पोटी आली**
**बालपणीच दुरावलेल्या**
**आईची पुन्हा भेट झाली**




एकंदरीत कवयित्री सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे- चोपडे यांच्या 'आई तू...' या काव्यसंग्रहामधून वाचकाला आई , आईचे भावविश्व , आई आणि सैनिक आणि माहेर या विषयाशी संबंधित असलेल्या कविता वाचनाचा आनंद मिळतो. काही कविता काळजाला स्पर्शून जातात.

कवयित्रीचे काव्य लेखन व शैली ही सोपी आणि सरळ पद्धतीची असून , आईविषयीचा शुद्ध भाव प्रगट करणारी आहे. सर्व मराठी साहित्य वाचकांनी आणि आईविषयी प्रेम असणाऱ्या प्रत्येक लेकरांनी हे पुस्तक वाचावे आणि संग्रहित ठेवावे, असे आहे. कवयित्री सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे- चोपडे यांच्या 'आई तू...' या प्रथम काव्यसंग्रहास आणि भावी लेखनासाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

# लोकनेते राजर्षी शाहू महाराज



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**राजर्षी शाहू महाराज या नावाची अख्ख्या महाराष्ट्राला ओळख आहे. त्यामुळे त्यांची नव्याने ओळख करून देण्याची गरज नाही, पण खंत ही आहे की आजची तरुण पिढी त्यांना केवळ नावाने ओळखते. त्यांची कार्ये, त्यांनी मांडलेले विचार यांची त्यांना म्हणावी तितकी माहिती नाही. वाळीत टाकल्याप्रमाणे जगणाऱ्या दलित समाजाच्या त्या काळी खंबीरपणे पाठीशी उभ्या राहणाऱ्या या लोकनायकाची, जाती पातीच्या अंधाऱ्या जगात पुन्हा अडकत जाणाऱ्या महाराष्ट्र देशाला आज पुन्हा नव्याने ओळख करून देण्याची गरज आहे.**

छत्रपती शिवाजी महाराज सोडले तर अनेक राजांचा इतिहास अन्याय-अत्याचार व जुलमी राजवटीचा आहे. एकाधिकारशाहीचा, हुकूमशाहीचा आहे; परंतु छत्रपती राजर्षी शाहू महाराज मात्र याला अपवाद आहेत. हा राजा लोकशाहीचा, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा आहे, एकवेळ गादी सोडीन; पण बहुजन समाजाचा उद्धार करण्याचे कार्य सोडणार नाही'' या त्यांच्या वक्तव्यावरून लक्षात येते.
राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागलचे जहागीरदार जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील, राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई यांनी १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले. इ.स.१८८५ मध्ये त्यांना शिक्षणासाठी राजकोट येथे पाठविण्यात आले. तेथे त्यांनी चार वर्षे शिक्षण घेतले. त्यानंतर ते कोल्हापूरला परतल्यावर धारवाड येथे शिक्षणासाठी गेले. तेथे सर एस.एम. क्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभार, इतिहास, इंग्रजी भाषा इत्यादी विषयांचे शिक्षण घेतले. धारवाड येथे शिक्षण घेत असतानाच लक्ष्मीबाई यांच्याबरोबर एप्रिल १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह झाला. शिक्षणक्रम संपल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे येताच त्यांनी पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानातील प्रजेच्या हलाखीची पाहणी केली. संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प, मागासलेला समाज, अप्रवाही, जातीपातींनी दुभंगलेला व जातीयवादाने फार पोखरलेला होता. शेकडो वर्षे अस्पृश्य समाज, बहुजन समाज ज्ञान, सत्ता, संपत्ती, शिक्षण अशा अनेक गोष्टींपासून वंचित राहिला होता. चातुवर्णव्यवस्थेमुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात मागे होता. अस्पृश्य, गरीब, शेतकरी, मजूर यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. सामान्य जनता भयानक दारिद्र्य, अज्ञानाच्या, अंधश्रद्धा, रूढींच्या खाईत बुडाली होती. शिक्षण क्षेत्रात बहुजन समाज बोटावर मोजता येईल इतकाच होता.
पाणी, रस्ते, शेती, व्यापार, कला अविकसित होत्या, म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग या रंजल्या- गांजलेल्या लोकांसाठी केला, हे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्वाची भूमिका बजावली. महाराजांना राजर्षीही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली.
**सक्तीचे व मोफतप्राथमिक शिक्षण :** राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. शिक्षणाशिवाय सुधारणा होणार नाही म्हणून त्यांनी शिक्षणाला महत्व देऊन १९०७ मध्ये मिस क्लार्क बोर्डिंग नावाचे वसतिगृह उघडले. शिक्षणाचा प्रचार- प्रसार व्हावा म्हणून १९१६ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून शाळा, महाविद्यालये, बोर्डिंग, शिष्यवृत्त्या सुरू केल्या. तसे आदेश त्यांनी जारी केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. स्त्रीमुक्तीची सुरुवातही महाराजांनी आपल्या घरापासूनच केली. महाराजांनी आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना अकाली वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना शिक्षण दिले. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन राजाराम कॉलेजमध्ये मुलींना फी माफी दिली. स्त्रियांना शिक्षण दिले. धर्माच्या नावाखाली मुले-मुली वाहण्याची अघोरी प्रथा बंद केली. वाघ्या-मुरळी प्रतिबंधक कायदा केला. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणा-या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक ाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. **आरक्षणातून प्रगती :** चातुर्वर्णव्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणावर बोकाळलेली असल्यामुळे आणि प्रत्येकाला जातीनुसार काम वाटून दिले असल्यामुळे अस्पृश्य समाजात प्रगती होत नव्हती. शिक्षण नव्हते. खालच्या वर्गातील माणूस वरच्या वर्गात जाऊ शकत नव्हता. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला.
**गुन्हेगारीचे निर्मुलन :** तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना



परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले. **स्पृश्योद्धाराचे कार्य :** १८९९ साली कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाचा स्फोट झाला. कोल्हापूरातील ब्राह्मण वर्गाने शाहू महाराजांचे क्षत्रियत्व नाकारून त्यांना शूद्र लेखले. राजालाच जर अशी वागणूक मिळत असेल तर प्रजेच काय ? असा विचार शाहू महाराजांनी त्यावेळी केला. वैयक्तीक अपमानाकडे सुद्धा व्यापक दृष्टिकोनातून बघणारा हा राजा होता. वेदोक्त प्रकरणातील अनुभवावरून, भिक्षुकशाहीच्या जाळ्यातून मुक्त झाल्याशिवाय उच्चवर्णियांची धार्मिक व सामाजिक मक्तेदारी नष्ट होणार नाही, अशी शाहूंची धारणा झाली होती. परिणामी ते म.फुल्यांच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. त्यांनी उघडपणे त्यांचे अनुयायीत्व स्वीकारले नसले, तरी सत्यशोधक तत्वांना त्यांचा पाठिंबा होता. त्यांच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन झाले. पारंपरिक भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी त्यांनी कोल्हापुरात ब्राह्मणेतर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी 'श्री शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना केली आणि मराठ्यांसाठी स्वतंत्र 'क्षात्रजगद्‌गुरूपद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले (१९२०). धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत हा एक अभिनव प्रयोग होता. अस्पृश्य समाजातील व इतर गरीब समाजातील लोकांना सरकारी नोकऱ्या दिल्या. वकिलीच्या सनदा दिल्या. जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करून त्यांना मान सन्मानाचे जीवन दिले. आज देशात वाढत असलेली जातीयता, हतबलता ही आजच्या राज्यकर्त्यांनी लक्षात घेऊन शाहू महाराजांचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे.
**राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना इंग्लंडमधील शिक्षण पूर्ण करण्यासाठी शिष्यवृत्ती देवून त्यांनी आर्थिक सहकार्यही केले होते. छत्रपती शाहू महाराजांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी खूप आदर आणि अभिमान होता. म्हणून ते स्वतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी मुंबई येथे त्यांच्या घरी गेले. त्यांचा सत्कार केला. डॉ.बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक ३१ जानेवारी १९२० ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्यांना तत्काळ आर्थिक मदत केली.
**आंतरजातीय विवाहाला मान्यता :** स्त्रियांच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. १९१८ साली त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. स्वतःच्या घरात धनगर घराण्याची नाते जुळवून कृतीत उतरवून आणला. जातीयता कमी व्हावी म्हणून त्यांनी स्वतः काही आंतरजातीय विवाह घडवून आणले. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. हा राजा स्त्रियांचा सच्चा पाठीराखा होता. आज देशात होत असलेल्या स्त्रियावरील अन्याय, अत्याचारावरून आजच्या राज्यकर्त्यांचे डोळे उघडणे गरजेचे आहे. **व्यापार, कला, क्रीडा, साहित्य व इतर कलांना मदत :** छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना व्यापार, कला, नाट्य, संगीत या विषयीही आवड व आदर होता. राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत , चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. अल्लादिया खान यांच्यासारख्या गायकाला, बाबूराव पेंटरला आश्रय दिला. नाटक कंपन्या सुरू केल्या.
राजर्षी शाहू महाराजांनी व्यापारी क्षेत्रात गरुड झेप घेऊन सूतगिरण्या, कापडगिरण्या वाढविल्या. शेतीसाठी, शेतकऱ्यांसाठी बंधारे बांधले. शेतीसाठी कर्ज, शेतीच्या विकासासाठी संशोधन, नाविन्यता आणि तंत्रज्ञानाच्या वापरास चालना, भविष्यात दुष्काळाला सामोरे जावे लागू नये यासाठी राधानगरी सारख्या धरणांची बांधणी असे उपक्रम त्यांनी यशस्वीरित्या राबविले. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिसळणारे, सामान्यांसाठी झटणारे राजा होते. त्यांच्या सर्वाभिमुख विकासाच्या दृष्टिकोनामुळे इतिहासकारांनी त्यांची नोंद लोककल्याणकारी राज्यकर्ता म्हणून केली आहे. ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. आपल्या २८ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी शिक्षण, कृषी, उद्योग, कला क्रीडा व आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान आणि चालना दिली. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजांचे मोठेपण हे लक्षात यायला लागते. आज मात्र आम्ही व आमच्या राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श बाजूला ठेवला आहे. त्यांचे नाव घेऊन आम्हीही त्यांचेच आहोत म्हणणारेही त्यांच्या विचाराने वागत नाहीत उलट आपल्या सत्तेचा गैरवापर करताना दिसतात. शेतक-यांसाठी पाणी, वीज आणि बियाणांची उपलब्धता, आपत्तीग्रस्तांना मदत करावी. मोफत लसीकरण, गरीब-वंचित विद्यार्थ्यांना स्मार्टफोनचे वाटप, इंटरनेटची प्रभावी व्यवस्था, ऑनलाइन अध्यन-अध्यापन-मूल्यांकन प्रभावी आणि परिणामकारक करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे. वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्था न काढता सर्व मागासलेल्या जाती-जमातींसाठी एकच संस्था असावी. आज त्यांच्या विचारांची, आचारांची व कृतीची देशाला गरज आहे. प्रत्येक मानवाने त्यांच्या

# मनाला सकारात्मकतेचा संदेश : 'उजेडाच्या वाटा'




अशोक व्यवहारे

आधुनिक केसरी

**जो नेहमी समाजाचा व भोवतालाचा विचार करतो,त्याची संवेदना जागृत असते. सभोवताली तोच सतत उघडा डोळ्यांनी न्याहाळत असतो व मनाला जे वाटते, भावते.मनात जे साचतं,बोचतं त्यावर तो सतत विचार करून व्यक्त होतो. अशा जाणीवांची माणसं विरळच. पण आशिष निनगुरकर या नवोदित लेखनाच्या वाटेवर चालणाऱ्या लेखकाने आपला भवताल पाहिला व जे मनात आले त्यावर तो व्यक्त झाला व त्यातूनच आकारास आले 'उजेडाच्या वाटा' हा चिंतनशील लेखसंग्रह. 'आयुष्य काळोखाने माखलेले असताना काही माणसे आपले जगणे विसरून इतरांच्या आयुष्यात उजेड पेरतात अशा देवमाणसांना' अशा अर्थपूर्ण शब्दांत अशी अर्पणपत्रिका वाचूनच आपण या लेखसंग्रहाकडे आकर्षित होतो.**

पाथर्डीचे कवी-कथा-कादंबरीकार, समीक्षक डॉ. कैलास दौंड यांची विवेचनात्मक प्रस्तावना या पुस्तकाला लाभली असून ती वाचूनच आपण या पुस्तकाच्या वाचनास आणखी आतुर होतो. कारण त्यांनी समर्पक शब्दांत लेखसंग्रहाच्या अतरंगाचा वेध घेतलेला आहे. त्यातील विषय आपणाला आपल्या सभोवतालचे न वाटता आपल्या संबंधितच वाटतात. यातच या लेखसंग्रहाचे विशेष यश आहे. भावविश्व अंतर्गत लेखकाचा परिचय वाचतांना अत्यंत कमी वयात लेखकाने जाणीवपूर्वक साहित्य क्षेत्रात प्रवेश केला असे दिसते. त्यांच्या परिचयातच त्यांची धडपड स्पष्ट जाणवते. विविधांगी व बहुरंगी असलेले आशिष निनगुरकर यांना माणसे जमवणे,भेटणे,संवाद साधने,चर्चा करणे,व्यक्त होणे व मत मांडणे ही त्यांची उपजत आवड आहे असे आपणास दिसते.
पंधरा लेखांनी परिपूर्ण असा हा संग्रह अनुक्रमणिकेतही आपले विविध विषयांवरील विविधांगी आस्तिव दाखवतो.जीवनाशी संबंधित वेगवेगळे विषय लेखकाने मोठ्या खुबीने एकत्र गुंफले आहेत. त्यात आर्थिक सुधारणा, भविष्याची ध्येयधोरणे,पोस्टकार्ड व एकांत हे विषय देखील आले आहेत.लेखक प्रत्येक विषय हा आपल्या जीवन जगण्याची कला व त्याच्या प्रलग्भतेची जाणीव करून देतो. मुळात आशिष निनगुरकर यांचा पिंड धडपड्या व संशोधन वृत्तीचा आहे.त्यातूनच जीवनाचे नाते सांगणारे व गहिरे विषय ते मांडू बघतात हे जाणवते. त्यातूनच त्यांना अनेक विषय सुचत गेले असावेत असे वाटते.त्यांची लेखनशैली व ग्रंथसंपदा पाहिली तर कवितासंग्रह,चित्रपटविषयक, कोरोनाविषयक लेखन व लघुकथा-घुपट,कथा,पटकथा,संवाद,गीते,अभिनय, चर्चासत्र,निर्मिती,दिग्दर्शन,पत्रकारिता, पत्रलेखन व प्रबोधन अशा चौफेर विषयात लेखकाने आपला ठसा उमटवला आहे व आपल्या जीवनाला स्वतःच एक आकार दिला आहे.यावरून 'तुच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार' याची प्रचिती येते.अशी व्यक्तीमत्वे फारच वेगळी व तुरळक असतात व आशिष निनगुरकर यांच्या रूपाने ती आपणास भेटत राहतात. वास्तविक पाहता सरकारी कार्यालयात नोकरी करणारी बरीचशी माणसं खिन्न, उदास दिसतात किंवा भासतात. कारण त्यांनी कधी नीटसा संवाद साधलेला नसतो किंवा हसतमुख चेहऱ्याने नागरिकांचे स्वागत किंवा काम करताना काही लोक दिसत नाही. पण आशिषजी याला अपवाद आहेत.त्यांचा हसतमुख स्वभाव, सहकार्याची वृत्ती, नागरिकांशी संवाद,सेवेप्रती समर्पण भावना, ओळखी वाढवणं व त्यांना जपणे. माणसं आपलीशी करून, त्यांना ओळख देणे,त्यांचे कामे करून देणे. यामुळे ते सतत नवनवीन विषयांच्या संपर्कात येतात व त्यातून त्यांना लिखाणाची प्रेरणा मिळते.पोस्ट विभागात नोकरी करत असताना ते शिक्षणावर व्यक्त होतात.आजचा शिक्षक, शिक्षणाची वास्तवता, जगातील पहिली आजींची शाळा याद्वारे ते आपल्या मनातील घालमेल व्यक्त करतात. विचारांनी व्यक्त होऊन त्यांना आपल्यासमोर सादर करतात व नवा विषय, नवा आशय वाचकांना वाचत असतांना विचार करण्यास प्रवृत्त करतात. शिक्षण व शिक्षकविषयक त्यांचे प्रकटीकरण वाचनीय आहे. या विषयावरील त्यांचे लेख वाचनीय आहेत. आज-काल नवव्यवस्थेच्या विरोधात कोणी भाष्य करत नसताना त्यांचे हे धाडस वाखाणण्याजोगे आहे. यातूनच त्यांची देश, विद्यार्थी,शिक्षण व समाज याविषयीची तळमळ दिसून येते. खरा लेखक असाच असतो,जो समाजहिताला प्राधान्य देतो. लेखक पालकांबद्दलही व्यक्त होतात कारण घर ही पहिली शाळा असते. पालक व आपल्यामधील हरवत चाललेला संवाद व पालकांची नकारात्मकता यावर ते लिहितात. पालकांनी मुलाला समजून घेऊन वाढवले पाहिजे. मुळात आज पालकच समाजात चुकीची भूमिका घेत असल्याने मुलेही गोंधळून जातात व एखाद्या नको त्या प्रसंगांत सामील होतात किंवा वाहवत जातात, कारण पालकांकडे मुलांना देण्यासाठी चांगलं काही सापडत नाही. पैसे भरा व चांगल्या शाळेत दाखल करा एवढेच पालक करत असतात तर पालकांनी मुलांना आलेल्या परिस्थितीला तोंड द्यायला सक्षम बनवले पाहिजे. त्यांना नवीन काहीतरी करण्यास प्रेरणा दिली पाहिजे. यासाठी पालकांना मानसिक शिक्षणाची गरज असल्याचे लेखकाने व्यक्त केले आहे. लग्नाचे होणारे इव्हेंट,त्या इव्हेंट वर होणारा खर्च, तसेच आपला परिस्थितीनुरूप बदलत जाणारा स्वभाव व येणारा राग या गोष्टी लेखकाच्या नजरेतून सुटत नाहीत.प्रत्येकाला त्यातून 'मी' पणा जपायचा आहे. यावर लेखक म्हणतात की, प्रत्येकाने 'मी'च्या पलीकडे जाऊन स्वतःला समजून घेतले पाहिजे व त्याच्याशी संवाद साधला पाहिजे. अगदी पंधरा-वीस वर्षांपूर्वी पत्रसंवाद खूप महत्त्वाचा होता. तोच धागा पकडून




लेखक पोस्टाच्या सोनेरी आठवणींना उजाळा देतात व पोस्टकार्डाचे महत्व अधोरेखित करतात. त्या काळात पोस्टकार्ड वाचण्याचा, लिहिण्याचा आनंद वेगळाच असायचा.त्या आनंदाची बरोबरी आजच्या मोबाईल युगाशी होऊ शकत नाही.कोरोना सर्व जगाला हादरवून गेला ,तर मानवाला विज्ञानाचे महत्त्व दाखवून गेला. अशा भीषण दोन वर्षाच्या काळात माणसं भांबावली असताना, कुलपात बंद असतांनाचा एकांत सकारात्मक रीतीने घेऊन लिखाण केले. कविता लिहिल्या, लघुपट केला.त्यातून वेळेचा उपयोग कसा उत्तमरीत्या केला. तसेच नव- निर्मितीसाठी, मानवी मूल्ये जपण्यासाठी काय-काय करता येऊ शकते हे दाखवून दिले.विविध विषयातून जीवनाचे अनेक रंग उलगडून दाखवणारा हा लेखसंग्रह वाचकांना, युवकांना निश्चित आवडेल यात तिळमात्र शंका नाही.आपणही हा संग्रह वाचून प्रेरणा घेऊन चिंतन करून लेखनक्षेत्रात आपल्या मनातील विचार कागदावर उतरवल्यास ते बहुमूल्य ठरेल असे मला वाटते. लेखक आशिष निनगुरकर यांच्या सकारात्मक ऊर्जा देणाऱ्या या लेखसंग्रहाला मनापासून सलाम.

**नवे पुस्तक- उजेडाच्या वाटा, लेखक- आशिष निनगुरकर**
**पुस्तक प्रकार- लेखसंग्रह, प्रकाशन- तेजश्री प्रकाशन**
**पृष्ठे- १४८, किंमत- २०० रुपये**

## पंख



गरुडाचे पंख तुला बहु शोभती
आकाशाचे ध्येय तुझ्या सोबती.
पाखराचे पंख तुला बहु शोभती
फुलांपरी नाजूक ध्येय सोबती.
पंख पाहता जटायू मनात
स्मरतो श्रीरामासी सीतेचा संकेत
तो सांगतो. रावणाचे डंख
साहुनी खग बोलतो मैत्रीच्या
रेशीमबंधास तो जागतो.
पंखांनी उड्डाण विहग
ऐसे करीती आकाशातुनी धरेची
आरती गाती.
स्वर्लोकीचे अमर पुष्प
वर्षाविती विहग जपती धरा-
स्वर्गाची नाती. धरा प्रभाती
सुवर्ण वस्त्र लेवूनी
पक्ष्यांचे मधुर किलबिल ऐकते.
फुलपाखरु संदेशांचे वहन
करुनी आसमंतात हळुवार पिंगा
घालते. या पंखांच्या अस्तित्वाचा
आधार
करीतसे मनोरम मनोरथ साकार
सहकार्य सतत जशी श्रावणधार
वदतसे साच मानसीचा सहकार
चंद्रहास मनास लावूनी सुपंख
अंबरी शोधितसे जेव्हा सप्तरंग
प्रकृती गाते मैत्रीचे सहज अभंग
पदविन्यासी होऊनी पूर्ण
पूर्ण दंग
- डॉ. चंद्रहासशास्त्री
सोनपेठकर

## लावणी : मराठी

तरणीताठी नार शेलाटी, बोलते मी मराठी
लावणी सादर करते, मराठीच्या प्रेमासाठी ।ध्रु।

जरी केले आहे परकीय भाषेने आक्रमण
माय मराठीला आताशा आले अच्छे दिन
गर्जतो शाहिरी बाणा भाषा सकला ओठी
लावणी सादर करते, मराठीच्या प्रेमासाठी ।१।

किती वर्णू महती बाई मधाळ हीची दिठी
साहित्य संतांचे अमर, भरून वाहते कोठी
नवरसांनी भरले भांडार हीची परंपरा मोठी
लावणी सादर करते, मराठीच्या प्रेमासाठी ।२।

नऊवारी साज पैठणी, नाकात घालून मुरणी
मराठी लावणीवर नाचते आज महाराष्ट्र दिनी
अटकेपार लावू झेंडा जरी आली आडकाठी
लावणी सादर करते, मराठीच्या प्रेमासाठी ।३।

- विलास कुलकर्णी ( आप्पा महाराज )
मीरा रोड, मुंबई ७५०६८४८६६४



## महाराष्ट्र माझा



नररत्नांची खाण आहे, महाराष्ट्र माझा...
भारतभूची शान आहे, महाराष्ट्र माझा...
शिवरायांचे स्वराज्य आहे, महाराष्ट्र माझा...
जिजाऊंचा अभिमान आहे, महाराष्ट्र माझा...
धर्मवीरांच्या बलिदानाचा आहे, महाराष्ट्र माझा...
ताराराणींच्या पराक्रमाचा आहे, महाराष्ट्र माझा...
सह्याद्री गिरीशिखरांचा आहे, महाराष्ट्र माझा...
गडकोट, जलदुर्गांचा आहे ... महाराष्ट्र माझा...
वेरूळच्या लेण्यांचा आहे, महाराष्ट्र माझा...
गोदेच्या पाण्याचा आहे, महाराष्ट्र माझा..
गोरोबा अन् तुकोबांचा आहे, महाराष्ट्र माझा...
जनाई अन् मुक्ताईंचा आहे, महाराष्ट्र माझा...
गाडगेबाबांच्या ग्रामस्वच्छतेचा , महाराष्ट्र माझा...
संतांच्या पदस्पर्शाने पावन, महाराष्ट्र माझा...
अहिल्याबाईंच्या राजनिष्ठेचा आहे,
महाराष्ट्र माझा.... शब्दप्रभूंनी समृद्ध केला ,
महाराष्ट्र माझा... लतादीदींची मधूर तान आहे,
महाराष्ट्र माझा... माय मराठीचा स्वाभिमान आहे,
महाराष्ट्र माझा.. फुले ,शाहू ,आंबेडकरांचा
महाराष्ट्र माझा... बहुजनांचा प्राण आहे,
महाराष्ट्र माझा... महाराष्ट्र माझा...
सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे
-चोपडे, परभणी ९८२३०६६६०६

## प्राण्यांचे गेट टुगेदर.....

एकदा सगळ्या प्राण्यांचा
वनराईत भरला मेळा,
एक एक करत सगळे प्राणी,
होऊ लागले गोळा.
हत्ती आला डुलत डुलत,
मान आणि सोंड हलवत हलवत.
जिराफ आला उंच करून मान,
झाडाच्या फांदीवर टेकून घेतला तान.
लांडगा आला चालत चालत तिकडून,
नातेवाईकांना शोधू लागला
तिकडून इकडून.
काळया पांढऱ्या रंगाचा शर्ट
घालून झेब्रा आला.
क्रॉस चेक पाहता पाहता, उभ्याउभ्याच झोपून गेला.
थोड्या वेळात पळत पळत
हरीण तिथ आलं.
खूपचं होत घाबरलेलं सगळ्याना त्यानं सांगितल.
त्या तिकडे ऐकली मी वाघाची डरकाळी,
तसं कोल्ह्यानं केल कुई कुई,
सगळ्याना थोडी झाली, पळता भुई.

© वैशाली चंद्रकांत महाडिक
मो.-९७६७४३७९२३

## आयुष्य वाटतांना...

आयुष्य वाटतांना देव चुकल्यासारखा वाटतो.
जन्म घेऊन मी चुकल्यासारखे वाटते,
नाती-गोती सारी परकीच वाटते.
मित्र-मैत्रिणीची मैत्री ही खोटीच ठरते,
बेकार हे आयुष्य मज वाटते.
जिवार करत हे बंधिस्त जीवन रोज जगणे
आता मला नको वाटते.
मी ज्या वाटेवर गेले रस्ताच चुकीचा होता
सांगणारे, समजवणारे खूप होते,
दिशा दाखवणारेही खूप होते ,
पण खंबीरपणे साथ देणारे ,
समजून घेणारे मात्र माझे कुणीच नव्हते.
आधार मी शोधला,
पण तो ही ठरला निराधार
भेटले जे सोबती ते ही घातकी ठरले.
आयुष्य माझे मला शत्रू समान झाले,
आयुष्य वाटताना देव चुकल्यासारखा वाटतो.
-निकिता अंकुशराव गाडेकर
कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

## रंग तुझा



रंग तुझा
माझ्यात होई लुप्त
करण्यास मज तृप्त
उभारे शब्दांची शिल्प
आर्त हाक तुझी येई कानी
जीव होता कासावीस
सख्या,तुजला आळविले
देत साद
रमला तूही संसारात
दोघांचे झाले चार हात
थाटला नेटका संसार
संसार वेलीवर फुलली
दोन नाजूक फुले
संगोपन करण्यात
गेले दिवस मजेत..
तुझी कार्बन कॉपी
जणू आपली सानुनी
साक्ष देतेय प्रेमाची
माझी प्रतिमा तेजात
वसली हुबेहूब
चौकटी संसार नेटका
लागो ना कोणाची दृष्ट
निती झाली सारी भ्रष्ट
सावरून पिल्लांना
गोकुळ आपले फुलवू
स्नेहाची,ममतेची बाग
नित्य चिरतरुण भासेल
स्वप्न मनीचे पुर्णत्वास
साथ अनमोल हवी
विश्वासाच्या फांदीवर
घरटे आपले बहरेल
वेली नाना फुलाफळांनी

-सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे,४४

## सांजवेळ

मावळतीच्या सूर्या तुजला
करतो आम्ही प्रणाम
करूनी नित्य काम आपुले
चालला करण्या आराम..
किरणे सोनेरी जगा देऊनी
निघालास तू सांज खुलवूनी
ढगांना फुलवीत चालला
आसमंतात फुले उधळुनी..
धरती हिरवी मखमली ती
सायंकाळी नवरी सजली
हळद लावूनी अंगावरती
नवी नवेली धरती नटली..
झाड बिचारे रुसून बसले
गमन पाहुनी सूर्यदेवाचे
सूर्य सांगतो आज तयाला
महत्व कर्मयोगाचे..
जीवन म्हणजे युद्धच हे
जिंकणे हरणे नित्याचे
जन्म लाभता फडकावे
झेंडे नभी या कीर्तीचे..
सांगे सूर्य पुन्हा एकदा
दाटून आलेल्या नभाला
मी देतो जीवन तुम्हा
पाजा अमृत धरतीला..
आणि सांगे पणतीला
जरी चाललो अस्ताला
तूच होऊनी सूर्य आता
दे प्रकाश या जगताला....
मी येईन पुन्हा सकाळी
उजेड देण्या या विश्वाला
तो पर्यत जळत रहा
अन जागे ठेव प्रकाशाला....
- ज्ञानेश्वर गायके. कन्नड



## मी जिथे जाते तिथे...

कोण जाणे कोणत्या भ्रमात
असतो तो अगं ,मला पाहताच
कोमात असतो तो.
किती राजबिंडा मुखडा जणू चंद्र
पौर्णिमेचा भारीच दिसतो जेव्हा
चारचौघात असतो तो.
तशीमी शक्यतो फार थोड्या
लग्नात जाते पण, मी जिथे जाते
तिथे लग्नात असतो तो. हल्ली
सूर्यही ओकतोय उन्हाच्या झळा
फार मला सावली देण्या ,अगं
उन्हात असतो तो. तसा त्याचा
विषय नाही बरं इंग्लिशबिंग्लिश
मला बघण्यासाठी फक्त वर्गात
असतो तो. लोक फक्त रात्रीच
गुंफतात प्रेयसीला स्वप्नात इथे
दिवसाही माझ्यासंगे स्वप्नात
असतो तो. एकदा म्हणे, नाही
भाळणार कुणावरही मी मी
दिसली की मग चक्क प्रेमात
असतो तो. धर्म सगळेच जपतात गं
आपलाआपला माझ्या खुशीसाठी
सदासत्कर्मात असतो तो.
जा ना मैत्रिणींनो कुणीतरी
सांगाना त्यालाही हा देह माझा
पण,आत हृदयात असतो तो.

® *रज्जाक शेख श्रीरामपूर
9665778558



## हिरवळ

हिरव हिरव कसं सजलया रान
चिंब चिंब कसं भिजलया सारं
पाखऱ्यांच्या चोचीत रान गाणं
मंजूळावानी वाहत चौफेर वारं
झाडं झुडपे सारी बहरुन आली
आगळ्यावेगळ्या रंगात रंगूनी गेली
डोंगराच्या कुशीत
निजल्या दऱ्या..खोऱ्या..
खळखळून वाहे रान गाणं गात
पक्षी प्राण्याचं जग शृंगारल
थाटामाठामधी नटल थटल
हिरव्या झालरीत घर दिसे
गोजिरवाणी मनाचा आनंद गगनात
मावेनासा होई
- लक्ष्मण वाल्डे-कन्नड,
जि.संभाजीनगर



## प्रेम

वेगळीच भाषा मी शिकत आहे
आवारात तुझ्या येउनी ! भान हरवले माझे सगळे
छंद वेगळा घेउनी ! एकटे पणाची साथ सोडुनी
सहवास तुजा बाळगतो मी ! सुरवतीचें क्षण वेचूनी
वाटचाल ही करतो मी ! प्रसंग आपले आठवुनी
नाजुक गालात हसतो मी ! मनात माझ्या शब्द साठवुनी
विचार करत बसतो मी ! स्पष्ट रितीची शिकवन घेउनी
कर्म मनात रुजवतो मी ! पूर्ण जगाचे शब्द वाचुनी
अर्थ तुझ्यात शोधतो मी ! पांढरे शुभ्र आभाळ पाहुनी
चित्र तुझे रेखाटतो मी ! प्रवासात या शांत बसुनी
वाट तुझी ही बघतो मी !
- अक्षय बसवंते, नांदेड

## माझा संघर्ष

माझा संघर्ष आजही चालू आहे
सत्याच्या वाटेवर चालताना
तरीही मी जगत आहे हसत
काट्या, गोट्यातून वाट काढताना
संघर्ष माझा गुरू झाला
मार्गदर्शन करत असतो मजला
म्हणून मी जगत आहे आजही
नमन करते माझ्या गुरूला
संघर्ष माझा संपणार नाही
त्याच्याच आधारावर मी जगतो आहे
मला जीवन जगण्याचा अर्थ कळला
तोच मला हिंमत देत आहे
मी संघर्षातून जगणार आहे
मी स्वतःला ओळखणार आहे
कोणी कितीही छळले, निंदले तरी
त्यांचाही मी आदर करणार आहे

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

# छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जि.प.प्रार्थमिक शाळेत दि.६/५/२३ शनिवार रोजी सर्वसामान्य बहुजन समाजाला स्वाभिमानाचे नवजीवन देणारे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचा आज स्मृतिदिन त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीला मानाचा मुजरा करून यांची १०१ व्या पुण्यतिथी निमित्त पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळेस
केंद्रीय प्रमुख तथा मुख्याध्यापक एम.डी.सोनेने शालेय व्यवस्थापन समितीचे जब्बार डी तडवी, वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही.पी.राजपूत व सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भागवत गायकवाड यांनी केले सर्व प्रथम प्रतिमेला अभिवादन करून केंद्रीय मुख्याध्यापक एम.डी.सोनेने यांनी शिक्षणमहर्षी, लोककल्याणकारी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला छत्रपती शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते.ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित ( अस्पृश्य ) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात. असे सांगून आपले मनोगत केंद्रीय मुख्याध्यापक एम.डी.सोनेने यांनी व्यक्त केलं यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही.पी.राजपूत,शाळेतील शिक्षक सतीश ढोणे, गजानन गवयी,निता हिरास मॅडम,
जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, पत्रकार जब्बार डी तडवी,तथा पत्रकार बंन्धू व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# मुख्याध्यापक कैलास ससे यांचा वेरूळ येथे पदसंस्था व संचालक मंडळ यांच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सोमवार दि. 1 मे रोजी जय जनार्दन स्वामी समर्थ शिक्षण पतसंस्था यांच्यातर्फे मुख्याध्यापक कैलास ससे हे दिनांक 31 जुलै रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. त्या निमित्त पतसंस्थेच्या वतीने सर्व संचालक मंडळ आणि पतसंस्थेचे चेअरमन साहेब शिंदे सर सचिव आणि उपाध्यक्ष आणि संशोधक मंडळ यांच्या हस्ते कैलास ससे पाटील यांचा शिंदे सर यांच्या हस्ते कैलास ससे यांचा सत्कार करण्यात आला. मी माझ्या वतीने सगळ्या पतसंस्थेचे सभासद आणि संचालक मंडळ पतसंस्थेचे चेअरमन उपाध्यक्ष आणि सचिव साहेब यांचे आभार व्यक्त केले.





# पालिकेच्या आवारात गुराने लावली झाडांची विल्हेवाट!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका आवारात मोकाट गुरांचा वावर दिसून आला आहे. धुळे येथील महानगरपालिकेच्या आवारात भर दिवसा एका गाईने मोठ मोठ्या झाडांचे नुकसान केले आहे या ठिकाणी पालिकेचे गेट उघडे असल्याने मोकाट जनावरे उदासपणे आत शिरून धुमाकूळ घालतात. असाच एक प्रकार शनिवारी दुपारी पालिकेच्या आवारात सुशोभीकरणाचे झाडे खाल्ल्याचा प्रकार दिसून आला या ठिकाणी सुशोभीकरणासाठी लाखोचा खर्च करण्यात आला असून त्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक येथे दिसून येत नाही त्यामुळे कित्येकदा नुकसान होत असते. काही दिवसांपूर्वी शेकडो वृक्ष पालिकेच्या आवारात पडलेली होती त्यामुळे दै आधुनिक केसरीच्या बातमीच्या माध्यमातून पालिकेच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले त्यामुळे झाडांना ताबडतोब नागरिकांना वाटप करण्यात आले. परंतु पालिकेच्या आवारात लावलेल्या झाडांची कित्येक वर्षापासून चांगली वाढ होताना दिसून येत होती परंतु मोकाट गुरांनी आत शिरून त्या झाडांची विल्हेवाट लावली यासाठी कोण जबाबदार राहील असे प्रश्न निर्माण होत आहे.

# शिवाजी विद्यालयात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथी निमित्त शंभर सेकंद स्तब्ध राहून अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** येथील शिवाजी विद्यालयात सावळत 12 येते शिक्षण संस्था संचालित छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा येथे सर्वसामान्य बहुजन समाजाला स्वाभिमानाचे नवजीवन देणारे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचा आज स्मृतिदिन त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीला मानाचा मुजरा करून यांची १०१ व्या पुण्यतिथी निमित्त पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळेस संस्थेचे अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते सचिव रत्नाबाई नारायण कोलते प्राचार्य एन. आर. कोलते व सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पंजाबराव शेळके यांनी केले. सर्व प्रथम प्रतिमेला अभिवादन करून प्राचार्य नारायण कोलते सर यांनी शिक्षणमहर्षी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला छत्रपती शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते.ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित ( अस्पृश्य ) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात. असे सांगून आपले मनोगत व्यक्त केलं. यावेळी शाळेतील शिक्षक विकास पाटील, विजयसिंग राजपूत, भास्कर ससाणे,संजय जोशी, विनोद जाधव, श्रीकृष्ण सोनवणे, मुकुंदा व्यवहारे, सुदाम राठोड, भास्कर खमाट, पोपटराव सोनवणे, ज्ञानेश्वर राठोड, भूषन देसले प्रा पंजाबराव शेळके प्रा. जयराम घोती, अजय रबडे, योगेश, थोठे, दीपक शीसोडे,योगेश शेळके, किशोर चोपडे, हिरालाल सोनवणे, गणेश सत्रे, बाबासाहेब कोलते, राहुल बडक, जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, तथा पत्रकार बंन्धू व विद्यार्थी व पालक उपस्थित होते अशी सविस्तर माहिती जीवन कोलते यांनी दिली.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# वैद्यकीय अधिकारी डॉ.निलोफर अंजुम यांना पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राचा जिल्ह्यात द्वितीय क्रमांक आले असुन ते वैद्यकीय अधिकारी डॉ. निलोफर अंजुम मॅडम यांनी स्वीकारले असुण वैद्यकीय अधिकारी यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन स्वागत होत आहे.

सुंदर माझा दवाखाना या मोहिम अंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यांतून अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांनी सहभाग घेतला होता. यात येथील आरोग्य केंद्रात स्वच्छता अभियान राबविण्यात आले तर वॉल पेंटींग्ज, लहान मोठ्या वाहनांसाठी वाहनस्थळ, आरोग्य केंद्रात स्वच्छता रखरखाव, स्लोगन, विविध विभागांचे नांवे व प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ओपीडी औषधी वाटप, केंद्रांतर्गत स्टेशनरी व्यवस्थीत, वार्ड कॉट स्वच्छता कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया आदि विविध कार्य व्यवस्थित याची जिल्हा गुणवत्ता अध्यक्ष जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पाण्डेय यांनी काही दिवसा पुर्वीच प्रथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी करून सुचना केल्या होत्या त्या सूचनेचे पालन जि. प. प्राथमिक आरोग्य केंद्रांनी करुन जिल्ह्यात दुसरा क्रमांक आहे. पटकावले त्या संदर्भात दि. एक मे रोजी औरंगाबाद येथे पोलिस आयुक्त देवगिरी मैदानावर महाराष्ट्र दिन व कामगार दिना निमित्त प्रशिस्तपत्र व सत्कार करत मा. पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते व जिल्हाधिकारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकार विकास मिना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर तथा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रशिस्तपत्र स्वीकारले. आरोग्य केंद्राला जिल्ह्यात द्वितीय कमांक पटकावले असल्याने वैद्यकीय अधिकारी डॉ निलोफ्फर अंजुम यांचे तालुक्याभरातून सर्वत्र कौतुक व अभिनंदन सत्कार होत आहे.

# आज लायन्स पुरस्काराचे वितरण व उन्हातलं चांदणं नाटकाचा प्रयोग

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** लायन्स क्लब आँफ लातूर सिटी व भारती गित्ते ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती आणि सामाजिक संस्थाना लायन्स -2023 गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच कौटुंबिक नाटक "उन्हातलं चांदणं"या नाटकाचा प्रयोग आज संध्याकाळी पाच वाजता आयोजन करण्यात दगडोजीराव देशमुख सभागृह मार्केट यार्ड येथे होणार असल्याची माहिती संयोजक अनिल पुरी यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन डाँ विठ्ठल लहाने यांच्या हस्हे होणार असुन.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लायन्यचे माझी प्रांतपाल डाँ मन्मथप्पा भांताब्रे हे असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी.अतिरिक्त पोलीस अधिक्षक डाँ अजय देवरे.भाजपचे राज्याचे माध्यम प्रमुख नवनाथ बन.लायन्स क्लब आँफ लातूर सिटीचे अध्यक्ष डाँ धर्मवीर भारती आदी प्रमुख उपस्थिती असणार आहे. लायन्य - 2023 गौरव पुरस्काराने.बी.बी.ठोंबरे,रवि बापटले,पत्रकार विलास बडे,अँड शैलेश गोजमगुंडे,डाँ.विश्रांती भारती,डाँ शाम सोमाणी,डाँ अजय पुनपाळे,पोलीस अधिकारी अमोल भारती.यांचा गौरव होणार आहे तर आदर्श कार्य सामाजिक संस्था म्हणून.समर्पण फाउंडेशन,दिशा प्रतिष्ठान,ग्रीन लातूर वृक्ष,रिलिजन टुरिस्पाँसीबीलीटी.सर्वोत्तम चँरिटेबल ट्रस्ट या संस्थेना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित गेले जाणार आहे तरी या सोहळ्यास उपस्थित राहाण्याचे आव्हान लायन्स क्लब आँफ लातूर सिटीच्या वतीने करण्यात आले आले.



# खामगाव येथे गौतम बुद्धांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील खामगाव येथे बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजू प्रधान भारतीय राष्ट्र समिती गंगाधर काटकर पोलीस पाटील खामगाव तसेच उपसरपंच जगन्नाथ शटे मंगळे गुंजाळ भगवान मस्के सुभाष पवार सचिन ढोले, भीमराव मस्के सचिन मस्के रोशन थोरात गोरख काटकर इतर सर्व मान्यवर उपस्थित होते.

# रवींद्र पोतगंट्टीवार यांची भाजप प्रदेश कार्यकारिणीत निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** भारतीय जनता पक्षाने नुकतीच प्रदेश कार्यकारणीतील विशेष निमंत्रित सदस्याच्या निवडीची घोषणा केली असून यामध्ये भाजपचे धर्माबाद तालुका अध्यक्ष रविंद्र पोतगंटीवार यांची वर्णी लागली आहे.पक्षाशी इमान राखून निष्ठेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला संधी मिळाल्यामुळे त्यांच्या चाहत्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे. रवींद्र पोतगंट्टीवार हे मागील दोन दशकापासून संघाच्या माध्यमातून भाजपशी जोडले गेले आहेत. त्यांनी पहिल्यांदा भाजपच्या तिकिटावर धर्माबाद नगर परिषदेची नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविली. पुढे त्यांनी आपल्या सुनेला नगराध्यक्षच्या पदासाठी उभे केले.त्यांना आजपर्यंत निवडणुकीच्या रिंगणात यश मिळाले नसले तरी त्यांनी नेहमी पक्षांसाठी अहोरात्र परिश्रम घेतले आहेत. त्यांच्या या कामाची पावती म्हणून त्यांना नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पदी, पुढे धर्माबाद तालुका अध्यक्षपदी काम करण्याची संधी पक्षाने



दिली.त्यांचे पक्षातील अनेक बड्या नेत्यांशी असलेल्या आपल्या नेत्यांशी मधुर असून या संबंधचा उपयोग करत त्यांनी धर्माबाद शहरातील असो किंवा तालुक्यातील अनेक प्रश्न तडीस नेण्याचा प्रयत्न केला.मग रेल्वे चे प्रश्न असो किंवा शेतीची, रोडचे असोत अथवा दवाखान्याचे त्यांनी मुंबई व दिल्ली दरबारी प्रभावीपणे मांडले.
हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या शेतीशी व मातीशी नेहमी इमान राखले. आपल्या शेतात ते नेहमी वेगवेगळे प्रयोग करीत असतात. सेंद्रिय शेतीवर त्यांचे प्रेम आहे. भारतीय किसान संघाच्या माध्यमातूनही त्यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सेंद्रिय शेतीला चालना दिली. अर्थात हे बहुयामी व्यक्तिमत्व आहे. त्यांची वैचारिक निष्ठा पक्की आहे. याचीच दखल त्यांच्या पक्षांनी घेतली असून भाजपच्या विशेष निमंत्रित सदस्य म्हणून त्यांची प्रदेश कार्यकारणीवर निवड झाली आहे. त्यांचे व नांदेडचे खासदार प्रतापराव पा. चिखलीकर यांचे सख्य असून त्याचा लाभ तालुक्यातील जनतेला होईल अशी अपेक्षा आहे. मात्र त्यांची वाट सोपी नसून त्यांच्यासामोरं अनेक आव्हान आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषदेच्या निवडणुका जाहीर होतील. या निवडणुकीत त्यांचा कसं लागेल. इतकेच नसून त्याना पक्षाबाहेरील लोकासोबत पक्षातील लोकांशी त्यांना लढावं लागेल.त्यांचे व आमदार राजेश पवार यांचे संबंध सर्वश्रुत असून या आव्हानाला ते कसे हाताळतात यावर बरेच गणित अवलंबून असणार आहेत. खरं म्हणजे रविंद्र पोतगंटिवार यांची कोणती राजकीय पार्शवभूमी नाही.त्यांनी जे मिळविले आहे.ते त्यांनी त्यांच्या कष्ठातून व पक्षांनी दिलेल्या संधीतून मिळविले आहे. तूर्तात त्यांची निवड झाल्यामुळे त्यांचे समर्थक गणेशराव पा. करखेलीकर, पिराजी पाटील,अशोक पाटील, शिवराज पाटील गाडीवान,संजय पवार,नारायण पा. पवार, माधव पाटील समस्ते, बाबू गंदेलवारं साईनाथ शिरपूरे, ललेश पा. मंगनाळीकर,सुदर्शन गुर्जलवाड, यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मोबाइल हिसकावणारे चोरटे गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पादचाऱ्यांचे मोबाइल संच हिसकावणाऱ्या चोरट्यांना गुन्हे शाखेने पकडले. चोरट्यांनी मोबाइल हिसकावण्याचे सहा गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यांच्याकडून सहा मोबाइल संच आणि दुचाकी जप्त करण्यात आली. आदित्य प्रशांत साळवे (वय १९, जयविजय चौक, बोपोडी), सचिन अशोक केंगार (वय १९, रा. कमळाबाई बहिरट चौक, सम्राटनगर, बोपोडी) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. त्यांच्या बरोबर असलेल्या एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपींनी बाहेरगावाहून येणारे प्रवासी तसेच पादचारी नागरिकांचे मोबाइल संच हिसकावून नेले होते. या प्रकरणी शिवाजीनगर, खडक, विश्रामबाग, मुंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी साळवे, केंगार चोरलेले मोबाइल संच विक्री करण्यासाठी बुधवार पेठेतील तपकीर गल्लीत असलेल्या मोबाइल मार्केटमध्ये येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी अभिनव लडकत यांना मिळाली.

# 'बोलेरो' पुलावरून कोसळली; वृद्धा ठार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** प्रवाशांना घेऊन जाणारी 'बोलेरो' पुलावरून कोसळल्याने एक वृद्ध महिला ठार तर दोघे जण गंभीर जखमी झाले. तसेच तिघे किरकोळ जखमी झाले. जळगाव जामोद तालुक्यातील निमखेडी फाटा नजीकच्या पुलावर आज शुक्रवारी ही दुर्घटना घडली. यात कलावती टेकाडे (वय ८५, राहणार कदमापूर, तालुका खामगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. या शिवाय दोन प्रवासी गंभीर जखमी झाले असून तिघेजण किरकोळ जखमी झाले. जखमींना नजीकच्या रुग्णालयात भरती करण्यात आले आहे.





# मानवतेचे तत्त्वज्ञान कृतीतून जगणारे छत्रपती शाहू महाराज

## उमेश जगताप : स्वा. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शासन परिपत्रकाप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहु महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त स्वा. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा. उमेशजी जगताप यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, राजर्षी शाहु महाराजांचे कार्य हे प्रेरणादायी होते व सामाजिक कार्यांचे प्रेरणास्थान होते. कोल्हापुर संस्थानाचे राजे राज्यकारभार करताना लोकहितांची कामे त्यांनी केली. शिक्षणाची गंगोत्री सर्व सामान्य लोकांपर्यत त्यांनी पोहचवली. बहुजन समाजातील विषमता दूर करणे, वसतिगृह निर्माण करणे, उच्चशिक्षणासाठी महाविद्यालय स्थापन करणे, प्रशिक्षित शिक्षक निर्माण करणे, कुस्ती आखाडे, अस्पृश्यता निर्मूलन, मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्ती अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी दुरदृष्टीने कार्य केले. खऱ्या अर्थाने मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा राजा म्हणजे छत्रपती शाहू महाराज आहेत असे गौरवोद्गार जगताप यांनी काढले.
यावेळी शै. वर्ष 2022-23 चा इ 5 वी ते 9 वी व 11 वी वर्गाचा विद्यालयाचा निकाल जाहीर करण्यात आला. मुल्यमापन विभाग माधव राऊत व प्रा. कल्याण मोदाळे यांनी निकालाचे वाचन केले.
शिष्यवृत्ती परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. अध्यक्षीय समारोप करताना शालेय समिती अध्यक्ष मा. प्रमोदजी कुलकर्णी यांनी सांगितले की, विषमतेकडुन समानतेकडे व गुणवंत धारकांचे कौतुक असे या दिनाचे महत्व होय. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनदंन त्यांनी केले. यावेळी व्यासपीठावर विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप, शालेय समिती अध्यक्ष मा. प्रमोदराव कुलकर्णी मुख्याध्यापक विजेंद्र चौधरी, पर्यवेक्षक दत्तात्रय तांबारे, विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब साळवे हे उपस्थित होते. सुत्रसंचलन सौ.गौरी डावखरे यांनी केले. यावेळी कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी पालक शिक्षक यांची उपस्थिती होती.



# अलिबाग येथील अजित हरवडे शिक्षक समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक शिक्षण परिषदेतील मुनवली ( अलिबाग ) येथील गुणवंत शिक्षक म्हणून अजित हरवडे यांची निवड करण्यात आली होती. शिक्षण संस्थेच्या प्रमुख समारंभप्रसंगी भाग्यलक्ष्मी सभागृह, अलिबाग येथे शिक्षक समाजभूषण पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष गौरविण्यात आले. याप्रसंगाची दखल घेत त्यांच्या निवासस्थानी ग्रामपंचायत सदस्य विजय भगत, माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य वस्सीम कूर, जगदीश सावंत, जगदीश बारे, अनंत सकरे, गुळेकर, सुनिल अनमाने राजेश परब, इलियास हाफिज, अजित घरत इत्यादी मान्यवरांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच शैक्षणिक विभागातील सर्व सहकारी शिक्षक तसेच त्यांच्या विद्यार्थ्यांनी भावी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या गुणवंत विद्यार्थीनी सौ.प्रांजळ प्रदीप बडदे व त्यांचे साहित्यिक मित्र कवी/पत्रकार मा.प्रदीप बडदे यांनी देखील त्यांच्या यशात सहभागी होत त्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.
सन्मा.श्री. अजित हरवडे सर यांची उत्तरोत्तर प्रगती होत राहो त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीतील पुढील आव्हाने पेलण्यासाठी बळ प्राप्त होवो तसेच सर्व विद्यार्थीमित्र आणि कुटुंबातील सदस्यांवर आपले प्रेमपूर्वक आशिर्वाद राहोत याच सदिच्छा.

# कथ्थक नृत्यांगना प्राची शाह पंड्या यांच्या हस्ते सूर्यदत्त नॅशनल स्कूलच्या सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्सचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** प्रख्यात अभिनेत्री आणि भारतीय कथ्थक नृत्यांगना प्राची शाह पंड्या यांच्या हस्ते सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये सेन्टर फॉर परफॉर्मिंग आर्ट्सचे उद्घाटन झाले. याप्रसंगी सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, सहायक उपाध्यक्ष स्नेहल नवलखा, सूर्यदत्त नॅशनल स्कूलच्या संचालक शीला ओक आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना पंड्या यांनी कत्थकच्या काही टिप्स दिल्या आणि नृत्य करवून घेतले. प्राची शाह पंड्या यांना नुकताच 'सूर्यदत्त स्त्री शक्ती राष्ट्रीय पुरस्कार २०२३' प्राप्त झाला असून, पंड्या यांनी 'कोशिश-एक आशा', 'कुंडली','कहीं दिया जले कहीं जिया...', 'पिया का घर', 'भाभी','रंगोली', 'ये प्यार ना होगा कम', 'इस प्यार को क्या नाम दूँ- फिर एक बार' अशा अनेक टीव्ही मालिकांमध्ये काम केले आहे. 'हे राम' या तमिळ चित्रपटातून प्राची यांनी मोठ्या पडद्यावर एन्ट्री केली. 'इसी लाईफ में', 'स्टूडंट ऑफ द इयर','राजा नटवरलाल', 'एबीसीडी २', 'जुडवा २','लक्ष्मी' आणि नुकताच आलेला 'हम दो हमारे दो' या चित्रपटात त्यांनी काम केले आहे. 'इचार ठरला पक्का' या मराठी चित्रपटातही त्यांनी काम केले आहे. प्राची यांना कथ्थकची विशेष, तसेच तानपुरा वाजवण्याची आवड आहे. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नृत्य, गायन, संगीत रुची जपण्यासाठी आणि कला क्षेत्रातील त्यांच्या विकासासाठी सेंटरचे उद्घाटन होत आहे, ही महत्वपूर्ण बाब असल्याचे सुषमा चोरडिया यांनी नमूद केले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी चोरडिया यांनीप्राची शाह पंड्या यांचे स्वागत केले.

# पुणे विद्यार्थीगृहाचा मुद्रणातील भरीव कामगिरीबद्दल 'टेकफोरडी' शैक्षणिक प्रदर्शनात सन्मान

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** नवी दिल्ली येथे २८ ते ३० एप्रिल २०२३ या कालावधीत इंडिया एक्स्पो सेंटरमध्ये झालेल्या 'टेकफोरडी' शैक्षणिक प्रदर्शनात पुणे विद्यार्थी गृह संस्थेला मुद्रण क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल गौरवचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. खासदार डॉ. महेश शर्मा यांच्या हस्ते संस्थेचे कार्याध्यक्ष सुनील रेडेकर, कुलसचिव अमोल जोशी, प्रभारी प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी संयोजक कमल छात्रा आणि महाराष्ट्र पॅव्हेलियनचे भुवनेश कुलकर्णी, सुजीत नाईक, रणजित मयंगबाम उपस्थित होते. पुणे विद्यार्थी गृहातर्फे डॉ. कल्याणी कुलकर्णी, प्रा. मधुरा महाजन, पुणे व नाशिक येथील प्राध्यापक अंकुश पवार, चेतन पाटील, संतोष सरोदे, सोनाली काळे, आरती पिंगळे व आठ विद्यार्थी सहभागी झाले होते. भविष्यात अनेक विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, नवीन अभ्यासक्रम, शैक्षणिक स्तर श्रेणी पद्धती, प्रवेश परीक्षा यासारख्या असंख्य गोष्टींमध्ये बदल होणार आहेत. विद्यार्थ्यांना मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यादृष्टीने प्रदर्शनामध्ये नामांकित व्यक्तींची व्याख्याने आयोजिली होती. पहिल्या दिवशी अकॅडमिक संदर्भात चर्चासत्र झाले. दुसऱ्या दिवशी भारतातील उद्योग संस्थांचे प्रतिनिधी यांचे विचार तसेच तिसऱ्या दिवशी स्टार्टअपच्या संबंधित विषयावर चर्चा झाली.
सुनील रेडेकर म्हणाले, "शिक्षणाचा मुख्य हेतू प्रत्येक विद्यार्थी आत्मनिर्भर होण्यासाठी असावा. आत्मनिर्भर भारत, स्टार्टअप्स स्टार्ट इन इंडिया, मेक इन इंडिया यासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. ११३ वर्षांचा शैक्षणिक इतिहास असलेल्या पुणे विद्यार्थी गृहाने प्रदर्शनामध्ये सहभाग घेतला.
नवनवीन अभ्यासक्रम, स्टार्टअप, मुद्रणातील १९२६ पासून संस्थेचे कार्य आणि संशोधन यासह संस्थेच्या इतर शाखामधील शैक्षणिक सुविधांची माहिती प्रदर्शित करण्यात आली.लवकरच पुणे विद्यार्थी गृहामध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियनच्या मदतीने व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (एसपीपीयू) येथील रिसर्च फॉर फाऊंडेशनच्या सहयोगाने भारतातील पहिले डिजीटल ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. तसेच संस्थेच्या वतीने व 'एआयसीटीई'च्या सहयोगाने नवीन शिक्षण धोरणावर संस्थांसाठी चर्चासत्र आयोजित केले जाणार असल्याचे रेडेकर यांनी सांगितले. चार सामंजस्य करार तीन दिवसांच्या प्रदर्शनात भारतातील प्रमुख शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठे, दहा आंतरराष्ट्रीय विद्यापीठांनी भाग घेतला. वीसपेक्षा अधिक सहकारी प्रतिनिधी यांनी हजेरी लावली.
सुमारे वीस हजार विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. ऑस्ट्रेलिया, मलेशिया आणि इंग्लंड देशांच्या प्रतिनिधीसोबत पुणे विद्यार्थी गृह संस्थेने सामंजस्य करार केल्याने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. तसेच भारतातील बेंगलोर, दिल्ली, चेन्नई आणि अहमदाबाद येथील ट्रीपल आयटी या शासकीय विद्यापीठाशीही सामंजस्य करार करण्यात आल्याचे रेडेकर म्हणाले.

# लय भारी सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

## नामदेवराईस

आधुनिक केसरी

मला मुळात भात खुप आवडतो. वरण भात , मेतकूट भात, खिचडी, दूधभात, साखरभात, नारळीभात, मसालेभात, पुलाव, बिशीबेळे अन्ना, चित्रांन्ना, दहीभात, निलंगा राईस, पिठलं भात..... अगदी नुसता भात जरी खायला दिलात तरी.... भाताडी म्हणालात तरी वावगं ठरणार नाही... परवा what'sapp वरच्या ग्रुपवर माझी नणंद सौ .प्राजक्ता वांगीकर हिने विचारलं "नामदेवराईसची" रेसिपी माहिती आहे का ? मग लक्षात आलं.... विदर्भातील खास अशी "नामदेवराईस"ची रेसिपी..... तयारी केली.....राईस केला....फोटू काढला ...पण त्याला "नामदेवराईस" का म्हणतात हे मात्र माहिती नाही..... असो .
पण खुप चविष्ट,तिखट, चमचमीत, लवकर होणारा नामदेवराईसची रेसिपी घ्या लिहून साहित्य आणि कृती आणि करा आणि कळवा....

**साहित्य –** एक वाटी तांदूळ, अर्धी वाटी तूर डाळ, अर्धी वाटी मसूर डाळ, दोन मिडीयम साईज चे कांदे, एक टोमॅटो पाच सहा हिरव्या मिरच्या, आलं लसूण पेस्ट अर्धा चमचा, भरपूर लसूण, अर्धा चमचा गरम मसाला, अर्धा चमचा काळा मसाला, धण्याची पूड, हळद हिंग, तिखट, फोडणीसाठी तेल मोहरी जिरे चवीनुसार मीठ आणि धूवुन बारीक चिरलेली कोथिंबीर.

**कृती–** दोन्ही डाळी ,तांदूळ स्वच्छ धुऊन वेगळ्यावेगळ्या डब्यात शिजवून घ्या . डाळी एकत्र केल्या तरी चालतील डाळीत शिजवताना हिंग हळद घालून आणि भातात नेहमीप्रमाणे पाणी घालून पण भात मोकळा व्हायला हवा एवढ्या प्रमाणात पाणी घाला. कुकरला चार-पाच शिट्ट्या करून घ्या. आता कांदा, टोमॅटो, मिरच्या,लसुण बारीक चिरून आणि आले लसूण पेस्ट अशी सगळी तयारी करून घ्या. आता कढईत तेल जरा व्यवस्थित घालून जिरे ,मोहरी घालून नेहमीप्रमाणे फोडणी करा .त्यात बारीक चिरलेला लसूण, हिरव्या मिरच्या ,आले लसणाची पेस्ट , बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो घालून चांगलं परतून घ्या.
त्यात धण्याची पूड ,काळा मसाला, गरम मसाला, तिखट, हळद, हिंग, घालून परत परता आता त्यात शिजलेला घट्ट वरणाचा गोळा( वरणात पाणी अजिबात राहिलं नाही पाहिजे ) आणि भात घालून मिश्रण एकसारखं हलवून घ्या. फार घट्ट वाटत असेल तर पाण्याचा एक शिपका मारायचा वरून तुपाची धार सोडा बारीक चिरलेली कोथिंबीर घालून गरमागरम सर्व्ह करा "तिखट चमचमीत नामदेवराईस". मग करून बघा आणि नक्कीच कळवा.

